रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 3
Part XII Section 3
भाग बारा अनुभाग ३

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 3] | नई दिल्ली, अगस्त 7-13, 2025/श्रावण 16-22 (शक) 1947 | [ खंड 22 |
| No. 3] | NEW DELHI, AUGUST 7-13, 2025/SHRAVAN 16-22 (SAKA) 1947 | [Vol. 22 |
| अं. ३] | नई दिल्ली, ऑगस्ट ७-१३, २०२५/श्रावण १६-२२ (शके) १९४७ | [ खंड २२ |

सर्व संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**विधि और न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि इंस्टिट्यूट ऑफ टिचिंग अँड रिसर्च इन आयुर्वेद ॲक्ट, 2020 ; (2) दि भारतीय साक्ष्य अधिनियम, 2023 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 ( 1973 का 50 ) की धारा 2 के खण्ड़ (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

**MINISTRY OF LAW AND JUSTICE**

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (*1*) The Institute of Teaching and Research in Ayurveda Act, 2020; (*2*) The Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

**विधि व न्याय मंत्रालय**

( विधायी विभाग )

नवी दिल्ली,

( १ ) दि इंस्टिट्यूट ऑफ टिचिंग अँड रिसर्च इन आयुर्वेद ॲक्ट, २०२०; ( २ ) दि भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ ( केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ ( १९७३ चा ५० ) याच्या कलम २ च्या खंड ( क ) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX



| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था अधिनियम, २०२०<br>The Institute of Teaching and Research in Ayurveda Act, 2020 | ५ |
| २ | भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३<br>The Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023 | १७ |

# भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३

## (२०२३ चा अधिनियम क्रमांक ४७)

[ २३ एप्रिल, २०२५ रोजी यथाविद्यमान ]

[२५ डिसेंबर, २०२३.]

निःष्पक्ष न्यायचौकशी करण्यासाठी साक्षी पुराव्याच्या सर्वसाधारण नियमांचे व तत्वांचे एकत्रीकरण करण्यासाठी व तरतूद करण्यासाठी अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, संसदेद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### भाग एक

प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, प्रयुक्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमाला, भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३ असे म्हणावे.

(२) तो, लष्करी न्यायालयांसह कोणत्याही न्यायालयातील किंवा न्यायालयासमोरील सर्व न्यायिक कार्यवाहींना लागू असेल, परंतु, कोणत्याही न्यायालयास किंवा अधिकाऱ्यास सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांना किंवा लवादासमोरील कार्यवाहींना लागू असणार नाही.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास [१] अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार, अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "न्यायालय" यामध्ये, सर्व न्यायाधीश व दंडाधिकारी यांचा, आणि लवादांखेरीज, साक्षीपुरावा घेण्यास विधितः प्राधिकृत केलेल्या सर्व व्यक्तींचा समावेश होतो;

(ख) "निर्णायक पुरावा" याचा अर्थ, जेव्हा एक तथ्य हे, दुसऱ्या तथ्याचा निर्णायक पुरावा असल्याचे या अधिनियमाद्वारे घोषित केले जाते तेव्हा, न्यायालय, एका तथ्याच्या पुराव्यावरुन, दुसरे तथ्य शाबीत झाल्याचे समजेल, आणि ते नाशाबीत करण्याच्या प्रयोजनार्थ दिल्या जाणाऱ्या साक्षीपुराव्यास मुभा देणार नाही;

(ग) एखाद्या तथ्याच्या संबंधात, "नाशाबीत" याचा अर्थ, जेव्हा आपणापुढील बाबींचा विचार केल्यानंतर, न्यायालयाचा एकतर एखादे तथ्य अस्तित्वात नाही असा समज होतो किंवा व्यवहारदृष्टी असलेल्या माणसाने ते अस्तित्वात नाही अशा समजुतीने त्या विशिष्ट प्रकरणाच्या परिस्थितीत जसे वागायला हवे इतके त्याचे नास्तित्व न्यायालयाला संभवनीय वाटते तेव्हा, ते "नाशाबीत" झाले, असा आहे;

(घ) "दस्तऐवज" याचा अर्थ, कोणताही मजकूर अभिलिखित करण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्याचे उद्देशित असतील किंवा वापरता येतील अशी अक्षरे, आकडे / आकृत्या किंवा चिन्हे या साधनांद्वारे किंवा अन्य कोणत्याही साधनांद्वारे अथवा त्या साधनांपैकी एकापेक्षा अधिक साधनांद्वारे कोणत्याही पदार्थांवर अभिव्यक्त केलेला किंवा वर्णन केलेला किंवा अन्यथा अभिलिखित केलेला कोणताही मजकूर, असा आहे आणि त्यात, इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेखांचा समावेश होतो.

### उदाहरणे.

(एक) एखादे लिखाण हा दस्तऐवज आहे;

(दोन) मुद्रित, शिळामुद्रित किंवा छायाचित्रित केलेले शब्द हे दस्तऐवज आहेत;

(तीन) एखादा नकाशा किंवा आराखडा हा दस्तऐवज आहे;

---

१. अधिसूचना क्रमांक स्था. आ. ८४९ (इ), दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४ द्वारे १ जुलै, २०२४ पासून अंमलात आला, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, खंड ३ (दोन) पहा.

(चार) धातूच्या पत्र्यावरील किंवा दगडावरील कोरीव लेख हा दस्तऐवज आहे;

(पाच) एखादे विडंबनचित्र हा दस्तऐवज आहे;

(सहा) इमेलवरील इलेक्टॉनिक अभिलेख, सर्व्हर लॉग, संगणकावरील, लॅपटॉपवरील किंवा स्मार्टफोनवरील दस्तऐवज, मेसेज (संदेश), संकेतस्थळे, स्थाननिश्चयन पुरावा व डिजिटल साधनांवर पाठवलेले ध्वनीसंदेश (व्हाईस मेसेज);

(ङ) "पुरावा" याचा अर्थ,-

(एक) चौकशीतील तथ्यविषयक बाबीसंबंधी त्याच्यासमोर जी कथने करण्यास न्यायालय साक्षीदारांना परवानगी देते किंवा आवश्यक करते त्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात दिलेल्या कथनांसह सर्व कथने, असा आहे आणि त्यात, त्यांचा समावेश होतो, आणि अशा कथनांना तोंडी पुरावा असे म्हटले जाते;

(दोन) न्यायालयाच्या निरीक्षणार्थ हजर केलेल्या इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेखांसह सर्व दस्तऐवज, असा आहे आणि त्यात, त्यांचा समावेश होतो, आणि अशा दस्ताऐवजांना, 'लेखी पुरावा' असे म्हटले जाते;

(च) "तथ्य" याचा अर्थ,-

(एक) इंद्रियगोचर होणारी कोणतीही वस्तू, वस्तूची स्थिती किंवा वस्तूंमधील संबंध;

(दोन) कोणत्याही व्यक्तीला जिचे भान होऊ शकते अशी कोणतीही मानसिक अवस्था, असा आहे, आणि त्यात, त्यांचा समावेश होतो;

**उदाहरणे.**

(एक) विवक्षित पदार्थ विवक्षित जागी विवक्षित क्रमाने मांडलेले आहेत हे तथ्य आहे.

(दोन) एखाद्या व्यक्तीने काही ऐकले किंवा पाहिले हे तथ्य आहे.

(तीन) एखाद्या व्यक्तीने विवक्षित शब्द म्हटले हे तथ्य आहे.

(चार) एखादी व्यक्ती विवक्षित मत बनविते, तिचा विवक्षित उद्देश आहे, ती सद्भावपूर्वक किंवा कपटीपणाने वागते, किंवा ती विशिष्ट शब्द विशिष्ट अर्थाने वापरते किंवा तिला विशिष्ट वेळी विशिष्ट संवेदनेचे भान असते किंवा झाले होते हे तथ्य आहे;

(छ) "वादतथ्ये" याचा अर्थ, जे तथ्य निव्वळ तेच तेवढे किंवा इतर तथ्यांच्या जोडीने लक्षात घेतल्यास त्यातून कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत ठामपणे सांगितलेला किंवा नाकबूल केलेला हक्क, दायित्व किंवा निःसमर्थता यांचे अस्तित्व, नास्तित्व, स्वरूप किंवा व्याप्ती अपरिहार्यपणे निष्पन्न होते असे कोणतेही तथ्य असा आहे, आणि त्यात, त्यांचा समावेश होतो;

**स्पष्टीकरण.–** जेव्हा केव्हा दिवाणी प्रक्रियेच्या संबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याच्या तरतुदींखाली कोणतेही न्यायालय तथ्य विषयक वाद प्रश्न नमूद करते तेव्हा, अशा वादप्रश्नाच्या उत्तरादाखल जे तथ्य ठामपणे सांगावयाचे किंवा नाकबूल करावयाचे ते वादतथ्य असते.

**उदाहरणे.**

'क' वर 'ख' च्या खुनाचा आरोप आहे. त्याच्या न्यायचौकशीत पुढील वाद तथ्ये असतील :–

(एक) 'क' ने 'ख' चा मृत्यू घडवून आणला.

(दोन) 'ख' चा मृत्यू घडवून आणण्याचा 'क' चा उद्देश होता.

(तीन) 'ख' कडून 'क' ला गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारण मिळाले होते.

(चार) ज्या कृतीमुळे 'ख' चा मृत्यू घडून आला ती कृती करताना 'क' हा मनोविकलतेमुळे त्या कृतीचे स्वरूप जाणण्यास असमर्थ होता;

(ज) "गृहीत धरता येईल".– न्यायालयाला एखादे तथ्य गृहीत धरता येईल असे जेव्हा जेव्हा या अधिनियमाद्वारे तरतूद केलेले असेल तेव्हा, न्यायालय असे तथ्य नाशाबीत झाले नाही तर व तोपर्यंत ते शाबीत झाले असल्याचे मानू शकेल, नाहीतर त्याचा पुरावा मागवू शकेल;

(झ) "बिनशाबीत".– जेव्हा एखादे तथ्य शाबीतही झालेले नसते आणि नाशाबीतही झालेले नसते तेव्हा ते "बिनशाबीत" राहिले असे म्हटले जाते;

(ञ) "शाबीत".– जेव्हा आपल्यापुढील बाबींचा विचार केल्यानंतर, एखादे तथ्य अस्तित्वात आहे असा न्यायालयाचा समज होतो किंवा व्यवहारदृष्टी असलेल्या माणसाने ते अस्तित्वात आहे अशा समजुतीने त्या विशिष्ट प्रकरणाच्या परिस्थितीत वागायला हवे इतके त्याचे अस्तित्व न्यायालयाला संभवनीय वाटते तेव्हा, ते "शाबीत" झाले असे म्हटले जाते;

(ट) "संबद्ध".– एखादे तथ्य हे, या अधिनियमाच्या तरतुदींमध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारांपैकी कोणत्याही प्रकारे दुसऱ्या तथ्याशी संबंधित असते तेव्हा, ते त्या दुसऱ्या तथ्याशी संबद्ध आहे असे म्हटले जाते;

(ठ) "गृहीत धरील".– न्यायालयाने एखादे तथ्य गृहीत धरावे असे जेव्हा जेव्हा या अधिनियमाद्वारे निर्देशित केलेले असेल तेव्हा, न्यायालय असे तथ्य नाशाबीत झाले नाही तर व तोपर्यंत, ते शाबीत असल्याचे समजेल.

(२) यात वापरलेले व व्याख्या न केलेले, परंतु, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) व भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) यांमध्ये वापरलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, उक्त अधिनियमात व संहितांमध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

## भाग दोन

प्रकरण दोन

### तथ्यांच्या संबद्धतेविषयी

**वादतथ्यांचा व संबध्द तथ्यांचा पुरावा देता येईल.**

**३.** कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत प्रत्येक वादतथ्याच्या आणि जी तथ्ये संबद्ध असल्याचे यात यापुढे घोषित केलेले असेल अशा अन्य तथ्यांच्या अस्तित्वाबद्दल किंवा नास्तित्वाबद्दल पुरावा देता येईल, मात्र इतरांच्याबद्दल नाही.

**स्पष्टीकरण.–** दिवाणी प्रक्रियेसंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याच्या कोणत्याही तरतुदीद्वारे जे तथ्य शाबीत करण्याचा एखाद्या व्यक्तीचा हक्क काढून घेतला गेला असेल त्याबद्दल पुरावा देण्यास या कलमाच्या आधारे तिला शक्य होणार नाही.

**उदाहरणे.**

(क) 'ख' चा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने त्याला दंडुक्याने मारहाण करून त्याचा खून केल्याबद्दल 'क' ची न्यायचौकशी करण्यात आलेली आहे.

'क' च्या न्यायचौकशीत पुढील वादतथ्ये आहेत :–

'क' ने 'ख' ला दंडुक्याने मारहाण करणे;

अशी मारहाण करून 'क' ने 'ख' चा मृत्यू घडवून आणणे;

'ख' चा मृत्यू घडवून आणण्याचा 'क' चा उद्देश.

(ख) वादपक्षकार, ज्या बंधपत्रावर विसंबून आहे ते त्याने त्या खटल्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी आपल्याबरोबर आणलेले नाही व हजर करण्यासाठी तयार ठेवलेले नाही. कार्यवाही नंतरच्या टप्प्यात असताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) द्वारे विहित केलेल्या शर्तींनुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा बंधपत्र हजर करणे किंवा त्यातील मजकूर शाबीत करणे या कलमाच्या आधारे त्याला शक्य होणार नाही.

### निकट संबंधित तथ्ये

**एकाच घडामोडीचा भाग असणाऱ्या तथ्यांची संबद्धता.**

**४.** जेव्हा काही तथ्ये, जरी वादनिविष्ट नसली तरी, ती तथ्ये ही एकाच घडामोडीचा भाग होऊ शकतील अशा रीतीने ती त्या वादतथ्याशी किंवा संबद्ध तथ्याशी संबंधित असतात तेव्हा, ती संबद्ध असतात, -मग ती एकाच वेळी व स्थळी घडलेली असोत किंवा निरनिराळ्या वेळी व स्थळी घडलेली असोत.

**उदाहरणे.**

(क)'ख' ला मारहाण करून त्याचा खून केल्याचा 'क' वर आरोप आहे. मारहाणीच्या वेळी किंवा त्याच घडामोडीचा भाग होईल इतके थोडे पूर्वी किंवा त्यानंतर 'क' ने किंवा 'ख' ने किंवा बघ्यांनी जे काही म्हटले किंवा केले ते संबद्ध तथ्य आहे.

(ख) एका सशस्त्र उठावात भाग घेऊन भारत सरकारविरुद्ध युद्ध पुकारल्याचा 'क' वर आरोप आहे. त्यात मालमत्तेचा नाश झाला आहे, सैन्यदलांवर हल्ले झाले आहेत व तुरुंग फोडून खुले केले गेले आहेत. यांपैकी सर्व तथ्ये घडून आली त्यावेळी 'क' उपस्थित नसला तरी, ही तथ्ये घडून येणे हे एकंदर घडामोडीचा भाग म्हणून संबद्ध आहे.

(ग) एका पत्रव्यवहाराचा भाग असलेल्या पत्रातील बदनामीकारक मजकुराबद्दल 'क' हा 'ख' च्या विरुद्ध दावा लावतो. ज्याच्यातून बदनामी उद्भवली त्या विषयासंबंधीची आणि बदनामीकारक मजकूर अंतर्भूत असलेल्या पत्रव्यवहाराचा भाग असलेली पत्रे ही संबद्ध तथ्ये आहेत,- मग त्यांमध्ये प्रत्यक्ष तो मजकूर नसला तरी हरकत नाही.

(घ) 'ख' कडून मागवलेला विवक्षित माल 'क' कडे पोचवण्यात आला होता किंवा कसे हा प्रश्न आहे. माल मधल्या अनेक व्यक्तींकडे पोचवण्यात आला होता. प्रत्येक पोचवणी हे संबद्ध तथ्य आहे.

**वादतथ्ये किंवा संबद्ध तथ्ये घडून येण्याचा प्रसंग, कारण किंवा परिणाम असलेली तथ्ये.**

**५.** जी तथ्ये, संबद्ध तथ्यांचा किंवा वादतथ्यांचा निकटपणे किंवा अन्यथा घडून येण्याचा प्रसंग, कारण किंवा परिणाम असतील, अथवा ज्या स्थितीत ती घडून आली किंवा जिच्यामुळे ती घडून येण्यास किंवा ती घडवून आणण्यास संधी मिळाली त्या स्थितीची घटक असतील ती तथ्ये संबद्ध असतात.

**उदाहरणे.**

(क) 'क' ने 'ख' ची जबरी चोरी केली किंवा कसे हा प्रश्न आहे. जबरी चोरी होण्याच्या थोडे आधी 'ख' स्वतः जवळ पैसे बाळगून जत्रेला गेला होता व ते त्याने त्रयस्थ व्यक्तींना दाखवले होते किंवा आपणाजवळ ते आहेत या तथ्याचा त्याने उल्लेख केला होता, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(ख) 'क' ने 'ख' चा खून केला किंवा कसे हा प्रश्न आहे. जेथे खून झाला होता त्या ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास झटापटीमुळे जमिनीवर झालेल्या खुणा ही संबद्ध तथ्ये आहेत.

(ग) 'क' ने 'ख' वर विषप्रयोग केला किंवा कसे हा प्रश्न आहे. विषप्रयोगाशी ज्यांचा संबंध जोडण्यात आला ती लक्षणे दिसून येण्यापूर्वीचे 'ख' चे प्रकृतिमान आणि 'क' ला माहीत असलेल्या 'ख ' च्या ज्या सवयींमुळे विषप्रयोग करण्यास संधी मिळाली त्या सवयी, ही संबद्ध तथ्ये आहेत.

**हेतू, पूर्वतयारी आणि पूर्वीचे किंवा नंतरचे वर्तन.**

**६.** (१) जे कोणत्याही वादतथ्याच्या किंवा संबद्ध तथ्याच्या हेतूचे किंवा पूर्वतयारीचे दर्शक किंवा घटक असते असे कोणतेही तथ्य संबद्ध असते.

(२) कोणत्याही दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या संदर्भात, अथवा त्यातील एखाद्या वादतथ्याच्या किंवा त्याच्याशी संबद्ध अशा तथ्याच्या संदर्भात, अशा दाव्यातील किंवा कार्यवाहीतील कोणत्याही पक्षकाराने अथवा कोणत्याही पक्षकाराच्या कोणत्याही अभिकर्त्याने केलेल्या वर्तनाचा, आणि जिच्याबाबत घडलेला एखादा अपराध हा एखाद्या कार्यवाहीचा विषय आहे अशा कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनाचा, जर अशा वर्तनाचा, कोणत्याही वाद तथ्यावर किंवा संबद्ध तथ्यावर प्रभाव पडत असेल किंवा कोणत्याही वादतथ्याचा किंवा संबद्ध तथ्याचा अशा वर्तनावर प्रभाव पडत असेल तर, ते वर्तन, संबद्ध असते,- आणि मग असा प्रभाव, पूर्वी पडलेला असो किंवा नंतर पडलेला असो.

**स्पष्टीकरण १.–** या कलमातील "वर्तन" या शब्दात, कथनांचा समावेश होत नाही, मात्र ती कथने ही जर कथनांव्यतिरिक्त अन्य अशा कृती करत असताना केलेली असतील व त्या कृतींचा खुलासा करणारी असतील तर गोष्ट वेगळी; परंतु, या खुलाशामुळे या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही कलमाखालील कथनांच्या संबद्धतेवर परिणाम होणार नाही.

**स्पष्टीकरण २.–** जेव्हा कोणत्याही व्यक्तीचे वर्तन हे संबध्द तथ्य असते तेव्हा, तिच्याकडे केलेले किंवा तिच्या समक्ष व तिला ऐकू येईल अशा तऱ्हेने केलेले जे कोणतेही कथन अशा वर्तनावर परिणाम करते ते संबद्ध तथ्य असते.

**उदाहरणे.**

(क) 'ख' चा खून केल्याबद्दल 'क' ची न्यायचौकशी करण्यात येत आहे. 'क' ने 'ग' चा खून केला, 'क' ने 'ग' चा खून केला हे 'ख' ला माहीत होते व आपल्याला असलेली माहिती जाहीर करण्याची धमकी देऊन 'ख' ने 'क' कडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला होता, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(ख) पैसे भरण्याबाबतच्या बंधपत्रावरून 'क' हा ' ख' च्या विरुध्द दावा लावतो. 'ख' बंधपत्र केल्याचे नाकारतो. बंधपत्र ज्यावेळी केले असल्याचे अभिकथन करण्यात आले आहे त्यावेळी 'ख' ला विशिष्ट प्रयोजनासाठी पैशांची गरज होती, हे तथ्य संबद्ध आहे.

(ग) 'ख' वर विषप्रयोग करून त्याचा खून केल्याबद्दल 'क' ची न्यायचौकशी करण्यात येत आहे. 'ख' ला देण्यात आले होते तशाच प्रकारचे विष 'ख' च्या मृत्यूपूर्वी 'क' ने मिळविले होते, हे तथ्य संबद्ध आहे.

(घ) विवक्षित दस्तऐवज हा, 'क' चे मृत्युपत्र आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. अभिकथित मृत्युपत्राच्या तरतुदी ज्या बाबींशी संबंधित आहेत त्यांबाबत 'क' ने अभिकथित मृत्युपत्राच्या दिनांकापूर्वी नुकतीच चौकशी केली होती, मृत्युपत्र करण्याच्या बाबतीत त्याने अधिवक्त्यांचा सल्ला घेतला होता व अन्य मृत्युपत्रांचे मसुदे त्याने तयार करवून घेतले होते, परंतु त्याला ते पसंत पडले नव्हते, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(ङ) 'क' वर एका गुन्ह्याचा आरोप आहे. अभिकथित गुन्हा घडण्यापूर्वी किंवा त्यावेळी किंवा त्यानंतर 'क' ने प्रकरणाच्या तथ्यांना त्याला स्वतःला अनुकूल असे स्वरूप देण्याच्या दृष्टीने पुरावा आणण्याची तजवीज केली होती अथवा त्याने पुरावा नष्ट केला होता किंवा लपवला होता अथवा ज्या व्यक्ती साक्षीदार झाल्या असत्या त्यांच्या उपस्थितीस प्रतिबंध केला होता किंवा त्या अनुपस्थित राहतील अशी तजवीज केली होती किंवा त्याबाबत खोटा पुरावा देण्यास व्यक्तींना फितवले होते, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(च) 'क' ने 'ख' ची जबरी चोरी केली किंवा कसे हा प्रश्न आहे. 'ख' ची जबरी चोरी झाल्यानंतर, "जिने 'ख' ची जबरी चोरी केली त्या व्यक्तीचा शोध घेण्यास पोलीस येत आहेत"- असे 'ग' ने 'क' च्या समक्ष म्हटले, आणि त्यानंतर 'क' तात्काळ पळून गेला, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(छ) 'क' हा 'ख' चे दहा हजार रुपये देणे लागतो किंवा कसे हा प्रश्न आहे. 'क' ने 'ग' कडे पैसे उसने मागितले आणि 'घ' ने 'क' च्या समक्ष व त्याला ऐकू येईल अशा तऱ्हेने 'ग' ला सांगितले की,- " 'क' वर विश्वास न ठेवण्याचा मी सल्ला देतो, कारण तो 'ख' चे दहा हजार रुपये देणे लागतो", आणि काही उत्तर न देता 'क' निघून गेला, ही संबद्ध तथ्ये आहेत.

(ज) 'क' ने गुन्हा केला किंवा कसे हा प्रश्न आहे. गुन्हेगारासंबंधी चौकशी होत आहे असा 'क' ला इशारा देणारे पत्र मिळाल्यावर 'क' फरारी झाला हे तथ्य व पत्राचा मजकूर ही संबद्ध तथ्ये आहेत.

(झ) 'क' वर गुन्ह्याचा आरोप आहे. अभिकथित गुन्हा घडल्यानंतर 'क' फरारी झाला, अथवा गुन्ह्यामुळे मिळालेली मालमत्ता किंवा त्या मालमत्तेपासून येणारे उत्पन्न त्याच्या कब्जात होते अथवा गुन्हा करण्याच्या कामी ज्या वापरल्या होत्या किंवा वापरता आल्या असत्या त्या वस्तू त्याने लपवल्या, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(ञ) 'क' वर बलात्कार करण्यात आला होता किंवा कसे हा प्रश्न आहे. अभिकथित बलात्कारानंतर थोड्याच वेळात, 'क' ने गुन्ह्यासंबंधी फिर्याद दिली, फिर्याद कोणत्या परिस्थितीत व कोणत्या शब्दांत देण्यात आली, ही तथ्ये संबद्ध आहेत. फिर्याद न देता, तिच्यावर बलात्कार करण्यात आला असे 'क' म्हणाली हे तथ्य जरी कलम २६ च्या खंड (क) खाली मुत्युकालीन अधिकथन म्हणून, किंवा कलम १६० खालील परिपोषक पुरावा म्हणून संबद्ध असले तरी, या कलमाखालील वर्तन म्हणून संबद्ध नाही.

(ट) 'क' ची जबरी चोरी झाली किंवा कसे हा प्रश्न आहे. अभिकथित जबरी चोरी झाल्यानंतर थोड्याच वेळात 'क' ने अपराधासंबंधी फिर्याद दिली, फिर्याद कोणत्या परिस्थितीत व कोणत्या शब्दांत देण्यात आली, ही तथ्ये संबद्ध आहेत. आपली जबरी चोरी करण्यात आली असे 'क' कोणतीही फिर्याद न देता म्हणाला हे तथ्य, जरी कलम २६ च्या खंड (क) खालील मृत्युकालीन अधिकथन म्हणून किंवा कलम १६० खालील परिपोषक पुरावा म्हणून संबद्ध असले तरी, या कलमाखालील वर्तन म्हणून संबद्ध नाही.

**वाद तथ्यांचा किंवा संबद्ध तथ्यांचा खुलासा करण्यासाठी किंवा ती मांडण्यासाठी आवश्यक असलेली तथ्ये.**

७. एखाद्या वाद तथ्याचा किंवा संबद्ध तथ्याचा खुलासा किंवा ते मांडण्यासाठी आवश्यक असलेली अशी अथवा वाद तथ्याने किंवा संबद्ध तथ्याने सूचित केलेल्या अनुमानास जी तथ्ये पुष्टी देतात किंवा त्याचे खंडन करतात किंवा जिची ओळख पटणे संबद्ध आहे अशा कोणत्याही वस्तूची किंवा व्यक्तीची ओळख पटवतात अथवा वाद तथ्य किंवा संबद्ध तथ्य केव्हा व कोठे घडले ती वेळ व स्थळ ज्यांमुळे निश्चित होते अथवा ज्यांनी असे कोणतेही तथ्य घडवून आणले त्या पक्षांचा संबंध ज्यांमुळे दर्शविला जातो अशी तथ्ये, त्या प्रयोजनाकरिता आवश्यक असतील तेथवर संबद्ध असतात.

### उदाहरणे.

(क) एखादा विवक्षित दस्तऐवज हा, 'क' चे मृत्यूपत्र आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. अभिकथित मृत्युपत्राच्या दिनांकास असलेली 'क' च्या मालमत्तेची व त्याच्या कुटुंबाची स्थिती ही, संबद्ध तथ्ये असू शकतील.

(ख) 'क' वर लांच्छनास्पद वर्तनाचा आरोप करणाऱ्या बदनामीकारक मजकुराबद्दल 'क' हा 'ख' विरुध्द दावा लावतो, बदनामीकारक असल्याचे अभिकथित केलेला मजकूर खरा आहे असे 'ख' दृढकथन करतो. जेव्हा बदनामीकारक मजकूर प्रकाशित करण्यात आला त्यावेळचे पक्षकारांचे स्थान व त्यांच्यामधील संबंध ही वाद तथ्यांना प्रस्तावनात्मक म्हणून संबद्ध असू शकतील. 'क' व 'ख' यांच्यामध्ये विवाद होता आणि त्यामुळे त्यांच्यामधील संबंधावर परिणाम झाला असेल तर, ते तथ्य सबंद्ध असले तरी, बदनामीकारक मजकुराशी संबंध नसलेल्या बाबीविषयीचा 'क' व 'ख' यांच्यामधील विवादाचा तपशील असंबद्ध आहे.

(ग) 'क' वर गुन्ह्याचा आरोप आहे. गुन्हा घडल्यानंतर लवकरच 'क' आपल्या घरातून फरार झाला हे तथ्य वादतथ्यांच्या नंतरचे किंवा त्याचा परिणाम झालेले वर्तन म्हणून कलम ६ खाली संबद्ध आहे. जेव्हा त्याने घर सोडले तेव्हा, ज्या स्थळी 'क' गेला तेथे 'क' ला आकस्मिक व तातडीचे काम होते हे तथ्य, त्याने आकस्मिक घर सोडले या तथ्याचा खुलासा करू शकणारे म्हणून संबध्द आहे. तो ज्या कामगिरीवर निघाला तिचा तपशील, ते काम आकस्मिक व तातडीचे होते हे दर्शविण्यासाठी जेथवर आवश्यक असेल तेथवर ते खेरीजकरून एरव्ही संबद्ध नाही.

(घ) 'ग' ने 'क' बरोबर केलेली नोकरीची संविदा भंग करण्यास त्याला प्रवृत्त केल्याबद्दल 'क' हा 'ख' विरुद्ध दावा लावतो. 'क' ची नोकरी सोडल्यावर, 'ग' हा 'क' ला असे म्हणतो की, " 'ख' ने मला अधिक चांगली नोकरी देऊ केल्यामुळे मी तुझी नोकरी सोडून देत आहे." हे कथन वादतथ्य म्हणून संबद्ध असलेल्या 'ग' च्या वर्तनाचा खुलासा करणारे म्हणून संबद्ध आहे.

(ङ) 'क' वर चोरीचा आरोप असून तो चोरीचा माल 'ख' ला देत असताना नजरेस पडतो, व 'ख' ती मालमत्ता 'क' च्या पत्नीला देत असताना नजरेस पडतो. ती सपूर्द करताना 'ख' असे म्हणतो की,- "तू ही लपवून ठेवावीस असे 'क' चे सांगणे आहे." 'ख' चे हे कथन त्या व्यवहाराचा भाग असलेल्या तथ्याचा खुलासा करणारे म्हणून संबद्ध आहे.

(च) दंगल केल्याबद्दल 'क' ची न्यायचौकशी होते व तो जमावाच्या अग्रभागी चालला होता असे शाबीत होते. जमावाचा आरडाओरडा हे तथ्य त्या व्यवहाराच्या स्वरूपाचा खुलासा करणारे म्हणून संबद्ध आहे.

**कट करणाऱ्याने सामाईक बेताला अनुलक्षून केलेली वक्तव्ये किंवा कृती.**

८. अपराध किंवा कारवाईयोग्य दुष्कृती करण्यासाठी दोन किंवा अधिक व्यक्तींनी मिळून कट केला आहे असे समजण्यास वाजवी कारण असेल तेथे, त्यांच्यापैकी कोणाही एकाने पहिल्याप्रथम जेव्हा असा उद्देश मनात धरला त्या वेळेनंतर, त्यांपैकी कोणाही एका व्यक्तीने त्यांच्या सामाईक बेताला अनुलक्षून केलेले कोणतेही वक्तव्य, कृती किंवा लिखाण हे, ज्यांनी याप्रमाणे कट केला असे समजत असलेल्या व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्तीच्या विरुद्ध, कटाचे अस्तित्व शाबीत करण्याच्या व तसेच अशी कोणतीही व्यक्ती त्यात सहभागी होती हे दाखविण्याच्या प्रयोजनार्थ संबद्ध तथ्य आहे.

**उदाहरण.**

सरकार विरुद्ध युद्ध पुकारण्याच्या कटात 'क' सामील झाला आहे असे समजण्यास वाजवी आधार कारण आहे.

कटाच्या प्रयोजनार्थ, 'ख' ने युरोपमध्ये शस्त्रे मिळविली, तशाच उद्दिष्टासाठी 'ग' ने कोलकात्यात पैसे जमवले, 'घ' ने मुंबईत कटात सामील होण्यासाठी काही व्यक्तींचे मन वळवले, 'ङ' ने दृष्टीसमोरील उद्दिष्टांचा, पुरस्कार करणारे लिखाण आग्रा येथे प्रकाशित केले, आणि 'ग' ने कोलकात्यात जमवलेले पैसे, 'च' ने दिल्लीहून 'छ' कडे सिंगापूर येथे पाठवले, आणि तथ्ये व कटाचा तपशील देणारे जे पत्र 'ज' ने लिहिले त्या पत्राचा मजकूर या सर्व गोष्टी, 'क' ला ज्ञात नसल्या तरी, आणि ज्यांनी त्या केल्या त्या व्यक्ती त्याला अपरिचित असल्या तरी, आणि तो कटात सामील होण्यापूर्वी किंवा त्याने त्यातून अंग काढून घेतल्यानंतर, त्या गोष्टी घडल्या असल्या तरी, त्यांपैकी प्रत्येक गोष्ट ही कटाचे अस्तित्व शाबीत करणे आणि त्यातील 'क' ची सहअपराधीता शाबीत करणे या दोन्हींसाठी, संबद्ध आहे.

**अन्यथा संबद्ध नसलेली तथ्ये केव्हा संबद्ध होतात.**

९. अन्यथा संबद्ध नसलेली तथ्ये,–

(१) जर ती कोणत्याही वादतथ्याशी किंवा संबद्ध तथ्याशी विसंगत असतील तर;

(२) जर निव्वळ तीच किंवा अन्य तथ्यांच्या संबंधात ती विचारात घेतल्यास कोणत्याही वादतथ्याचे किंवा संबद्ध तथ्याचे अस्तित्व किंवा नास्तित्व अत्यंत संभाव्य किंवा असंभाव्य ठरत असेल तर,

संबद्ध असतात.

**उदाहरणे.**

(क) 'क' ने विवक्षित दिवशी चेन्नई येथे गुन्हा केला किंवा कसे हा प्रश्न आहे. त्या दिवशी 'क' लडाखमध्ये होता हे तथ्य संबद्ध आहे. गुन्हा जेव्हा घडला त्या वेळेच्या आसपास तो घडल्याच्या स्थळापासून 'क' दूर अंतरावर होता या तथ्यामुळे, त्याने गुन्हा केला असावा ही गोष्ट अशक्य जरी नसली तरी, अगदी असंभाव्य होऊ शकत असल्यामुळे ते तथ्य संबद्ध आहे.

(ख) 'क' ने गुन्हा केला आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. गुन्हा 'क' ने किंवा 'ख' ने किवा 'ग' ने किंवा 'घ' ने केला असला पाहिजे, अशी परिस्थिती आहे. गुन्हा अन्य कोणीही करू शकला नसता व तो 'ख' ने, 'ग' ने किंवा 'घ' ने ही केला नव्हता हे दर्शविणारे प्रत्येक तथ्य संबद्ध आहे.

**नुकसानीच्या दाव्यांमध्ये रक्कम निर्धारित करणे, न्यायालयाला शक्य होण्याच्या कामी साधक अशी तथ्ये संबद्ध असतात.**

१०. ज्या दाव्यांमध्ये नुकसानीची मागणी केली असेल त्यांमध्ये ज्या नुकसानीचा निवाडा देणे भाग असेल त्या नुकसानीची रक्कम निर्धारित करणे न्यायालयाला ज्यामुळे शक्य होईल असे कोणतेही तथ्य संबद्ध असते.

**एखादा हक्क किंवा रुढी प्रश्नास्पद असेल तेव्हा, संबद्ध असलेली तथ्ये.**

११. जेव्हा कोणत्याही हक्काच्या किंवा रुढीच्या अस्तित्वाबाबतचा प्रश्न असेल त्याबाबतीत, पुढील तथ्ये संबद्ध असतात :–

(क) ज्या संव्यवहाराद्वारे प्रश्नास्पद हक्क किंवा रूढी निर्माण झाली, तो कोणताही संव्यवहार असल्याचा दावा सांगितला गेला, त्यात फेरबदल केला गेला, त्यास मान्यता दिली गेली, त्याचा ठामपणे अवलंब केला गेला किंवा तो नाकारला गेला, अथवा जो त्यांच्या अस्तित्वाशी विसंगत होता असा कोणताही संव्यवहार ;

(ख) ज्या उदाहरणांमध्ये तो हक्क किंवा ती रूढी असल्याचा दावा सांगितला गेला, त्यांना मान्यता दिली गेली किंवा त्यांचा अवलंब केला गेला अथवा त्यांचा अवलंब विवादास्पद केला गेला, तो ठामपणे चालू ठेवण्यात आला किंवा त्यापासून विचलन झाले ती विवक्षित उदाहरणे.

**उदाहरण.**

'क' ला एखाद्या मत्स्यक्षेत्रावर मच्छीमारीचा हक्क आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. ते मत्स्यक्षेत्र 'क' च्या पूर्वजांना प्रदान करणारा विलेख, 'क' च्या वडिलांनी केलेले मत्स्य-क्षेत्राचे गहाण, गहाणाशी ताळमेळ नसलेली अशी 'क' च्या वडिलांनी दिलेली नंतरची देणगी, जेव्हा 'क' च्या वडिलांनी हक्क वापरला किंवा जेव्हा हक्काचा वापर 'क' च्या शेजाऱ्यांनी थांबवला ती विशिष्ट उदाहरणे ही, संबद्ध तथ्ये आहेत.

**मानसिक किंवा शारीरिक अवस्था अथवा शारीरिक संवेदना यांचे अस्तित्व दर्शविणारी तथ्ये.**

**१२.** उद्देश, ज्ञान, सद्‌भाव, हयगय, बेदरकारपणा, कोणत्याही विशिष्ट व्यक्तीबाबतची दुर्भावना किंवा सद्‌भावना किंवा यांसारख्या कोणत्याही मानसिक अवस्थेचे अस्तित्व दर्शविणारी अथवा कोणत्याही शारीरिक अवस्थेचे किंवा शारीरिक संवेदनेचे अस्तित्व दर्शविणारी तथ्ये ही, अशी कोणतीही शारीरिक किंवा मानसिक अवस्था अथवा शारीरिक संवेदना यांचे अस्तित्व वादनिविष्ट किंवा संबद्ध असेल तेव्हा, संबद्ध असतात.

**स्पष्टीकरण १.–** मानसिक अवस्था हे तथ्य संबद्ध असताना, ती मानसिक अवस्था अस्तित्वात आहे ही गोष्ट तिच्या अस्तित्वाचे दर्शक म्हणून संबद्ध असलेल्या तथ्याद्वारे, सर्वसाधारणपणे नव्हे तर, विशिष्ट प्रश्नास्पद बाबीच्या संदर्भात दर्शवली गेली पाहिजे.

**स्पष्टीकरण २.–** परंतु जेव्हा, एखाद्या अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीची न्यायचौकशी केल्यावर, आरोपीने पूर्वी केलेला अपराध या कलमाच्या अर्थानुसार संबद्ध होत असेल त्या बाबतीत, अशा व्यक्तीची पूर्वीची दोषसिद्धी देखील संबद्ध तथ्य असेल.

**उदाहरणे.**

(क) एखादा माल हा चोरीचा माल असल्याचे माहीत असून देखील तो स्वीकारला असा आरोप 'क' वर आहे. चोरीचा विशिष्ट माल त्याच्या कब्जात होता असे शाबीत झाले आहे. त्याचवेळेस, दुसऱ्या अनेक चोरीच्या वस्तू त्याच्या कब्जात होत्या हे तथ्य, त्याच्या कब्जात असलेल्या एकूण एक वस्तू चोरीच्या असल्याचे त्याला माहीत होते हे दाखविण्याच्या दृष्टीने साधक होत असल्यामुळे ते संबद्ध आहे.

(ख) 'क' ने दुसऱ्या व्यक्तीला कपटीपणाने बनावट चलन सुपूर्द केले व त्याने ते सुपूर्द केले तेव्हा त्याला ते बनावट असल्याचे माहीत होते असा त्याच्यावर आरोप आहे. ते सुपूर्द करण्याच्या वेळेस 'क' च्या कब्जात बनावट चलनाचे अन्य असंख्य तुकडे होते हे तथ्य संबद्ध आहे. ते बनावट चलन असल्याचे माहीत असताना, दुसऱ्या व्यक्तीला ते बनावट चलन खरे म्हणून सुपूर्द केल्याबद्दल 'क' ला पूर्वी दोषसिध्द ठरवण्यात आले होते, हे तथ्य संबद्ध आहे.

(ग) 'ख' च्या कुत्र्याने इजा केल्याबद्दल 'क' हा 'ख' विरुद्ध दावा लावतो. आपला कुत्रा हिंस्त्र आहे हे 'ख' ला माहीत आहे. 'भ', 'म' व 'य' यांना तो कुत्रा पूर्वी चावला होता व त्यांनी 'ख' कडे तक्रारी केल्या होत्या, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(घ) विनिमयपत्राचा स्वीकारकर्ता 'क' याला आदात्याचे नाव कपोलकल्पित आहे हे माहीत होते किंवा कसे हा प्रश्न आहे. त्याच पद्धतीने काढलेली इतर विपत्रे, जर आदाता ही खरीखुरी व्यक्ती असती तर, ती 'क' कडे ज्यावेळेस विपत्रे पाठवू शकली असती त्यापूर्वी 'क' ने ती स्वीकारली होती हे तथ्य, आदाता ही कपोलकल्पित व्यक्ती असल्याचे 'क' ला माहीत होते याचे दर्शक म्हणून संबद्ध आहे.

(ङ) 'ख' च्या लौकिकाला हानी पोहचविण्याच्या उद्देशाने एक अभ्यारोप प्रकाशित करून 'ख' ची अब्रुनुकसानी केल्याचा 'क' वर आरोप आहे. 'ख' बद्दल 'क' च्या मनात असलेली दुर्भावना दर्शविणारे 'ख' विषयीचे काही लिखाण 'क' ने प्रकाशित केले हे विशिष्ट प्रश्नास्पद तथ्य प्रकाशनाद्वारे 'ख' च्या लौकिकाला हानी पोहचविण्याचा 'क' चा उद्देश शाबीत करणारे म्हणून संबद्ध आहे. 'क' व 'ख' यांच्यामध्ये आधी कसलेही भांडण नव्हते व ज्याबद्दल तक्रार करण्यात आली ती गोष्ट 'क' ने जशी ऐकली तसाच तिचा पुनरुच्चार केला, ही तथ्ये 'ख' च्या लौकिकास हानी पोहचविण्याचा 'क' चा इरादा नव्हता याचे दर्शक म्हणून संबद्ध आहेत.

(च) 'ग' हा पतदार आहे असे 'ख' ला कपटीपणाने अभिवेदन केल्यामुळे नादार 'ग' वर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त झालेल्या 'ख' ला नुकसान सोसावे लागले, म्हणून 'ख' ने 'क' विरुद्ध दावा लावला. 'ग' पतदार असल्याचे 'क' ने अभिवेदन केले त्यावेळेस 'ग' चे शेजारी व त्याच्याशी व्यवहार करणाऱ्या व्यक्ती त्याला पतदार समजत होत्या हे तथ्य, 'क' ने ते अभिवेदन सद्भावपूर्वक केले असल्याचे दर्शक म्हणून संबद्ध आहे.

(छ) 'क' ज्या घराचा मालक आहे त्याचे काम 'ग' या कंत्राटदाराच्या आदेशावरून केल्याबद्दल कामाच्या किमतीसाठी 'ख' हा 'क' विरुद्ध दावा लावतो. 'ख' ने 'ग' बरोबर संविदा केली होती हा 'क' चा बचाव आहे. 'क' ने 'ग' ला प्रश्नास्पद कामाचे पैसे दिले होते हे तथ्य, 'क' ने प्रश्नास्पद कामाची व्यवस्था सद्भावपूर्वक 'ग' कडे सोपवली होती, जेणेकरून 'ग' हा, 'क' चा अभिकर्ता म्हणून नव्हे तर , स्वतःच्याच नावाने 'ख' शी संविदा करण्याच्या स्थितीत होता, हे शाबीत करणारे म्हणून संबद्ध आहे.

(ज) 'क' ला जी मालमत्ता सापडली तिचा अप्रामाणिकपणे अपहार केल्याचा 'क' वर आरोप आहे व जेव्हा त्याने तिचा स्वतःसाठी म्हणून विनियोग केला तेव्हा, तिचा खरा मालक सापडू शकणार नाही असे तो सद्भावपूर्वक समजत होता किंवा कसे असा प्रश्न आहे. 'क' ज्या ठिकाणी होता तेथे मालमत्ता हरवल्याची जाहीर नोटीस देण्यात आलेली होती हे तथ्य, मालमत्तेचा खरा मालक सापडू शकणार नाही असे 'क' सद्भावपूर्वक समजत नव्हता याचे दर्शक म्हणून संबद्ध आहे. मालमत्ता हरवल्याचे 'ग' ने ऐकले होते व त्याविरुद्ध तिच्यावर खोटा दावा सांगण्याची त्याची इच्छा होती म्हणून त्याने कपटीपणाने नोटीस दिली होती हे 'क' ला माहीत होते किंवा तसा त्याचा समज होता हे तथ्य, 'क' ला नोटीस माहीत होती एवढ्याच तथ्यामुळे 'क' चा सद्भाव नाशाबीत होत नाही याचे दर्शक म्हणून संबद्ध आहे.

(झ) 'ख' ला ठार मारण्याच्या इराद्याने त्याच्यावर गोळी झाडल्याचा 'क' वर आरोप आहे. 'क' चा इरादा दर्शविण्यासाठी, 'क' ने पूर्वी 'ख' वर गोळी झाडली होती, हे तथ्य शाबीत करता येईल.

(ञ) 'ख' ला धमकीची पत्रे पाठवल्याचा 'क' वर आरोप आहे. या पत्रांचा उद्देश दर्शविण्यासाठी 'क' ने 'ख' ला पूर्वी पाठवलेली धमकीची पत्रे शाबीत करता येतील.

(ट) 'क' हा आपली पत्नी 'ख' हिच्याशी क्रूरपणे वागल्याबद्दल दोषी आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. अभिकथित क्रूर वागणुकीच्या जरा आधी किंवा त्यानंतर त्यांनी एकमेकांविषयी कोणत्या भावना व्यक्त केल्या, ती संबद्ध तथ्ये आहेत.

(ठ) 'क' चा मृत्यू विषाने घडून आला होता किंवा कसे हा प्रश्न आहे. 'क' ने आजारात आपल्या लक्षणांबाबत केलेली कथने, ही संबद्ध तथ्ये आहेत.

(ड) जेव्हा 'क' चा आयुर्विमा उतरवला गेला तेव्हा, त्याचे आरोग्य कसे होते हा प्रश्न आहे. प्रश्नास्पद वेळी किंवा त्या सुमारास 'क' ने आपल्या आरोग्याबाबत केलेली कथने, ही संबद्ध तथ्ये आहेत.

(ढ) 'ख' ने सर्वसाधारणपणे वापरण्यालायक नसलेली मोटारगाडी भाड्याने दिल्यामुळे 'क' ला दुखापत झाली, म्हणून 'क' हा 'ख' विरुद्ध हयगयीबद्दल दावा लावतो. त्या विशिष्ट मोटारगाडीच्या दोषाकडे अन्य प्रसंगी 'ख' चे लक्ष वेधण्यात आले होते, हे तथ्य संबद्ध आहे. भाड्याने द्यावयाच्या गाड्यांबाबत नेहमीच 'ख' हयगय करीत असे, हे तथ्य असंबद्ध आहे.

(ण) 'ख' वर उद्देशपूर्वक गोळी झाडून त्याला मारले म्हणून 'ख' च्या खुनाबद्दल 'क' ची न्यायचौकशी करण्यात आली. 'क' ने अन्य प्रसंगी 'ख' वर गोळी झाडली होती हे तथ्य, 'ख' ला गोळी झाडून मारण्याचा त्याचा उद्देश दर्शविणारे म्हणून संबद्ध आहे. लोकांना मारण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर गोळी झाडण्याची 'क' ला सवय होती, हे तथ्य असंबद्ध आहे.

(त) एका गुन्ह्याबद्दल 'क' ची न्यायचौकशी करण्यात आली. तो विशिष्ट गुन्हा करण्याचा उद्देश सूचित करणारे काहीतरी त्याने म्हटले हे तथ्य संबद्ध आहे. त्या प्रकारचे गुन्हे करण्याकडे सर्वसाधारण कल दर्शविणारे काहीतरी त्याने म्हटले, हे तथ्य असंबद्ध आहे.

**एखादी कृती अभावित होती की उद्देशपूर्वक होती या प्रश्नाशी संबंधित असणारी तथ्ये.**

**१३.** एखादी कृती अभावित होती की किंवा उद्देशपूर्वक होती किंवा विशिष्ट ज्ञान किंवा उद्देश असताना केली होती किंवा कसे हा प्रश्न असेल तेव्हा, अशी कृती तशाच घटनांच्या मालिकांचा भाग असून ती कृती करणारी व्यक्ती त्यांपैकी प्रत्येक घटनेशी संबंधित होती, हे तथ्य संबद्ध आहे.

**उदाहरणे.**

(क) आपल्या घराचा जितक्या पैशांचा विमा उतरवला होता ते पैसे मिळवण्यासाठी ते घर जाळून टाकल्याचा 'क' वर आरोप आहे. 'क' लागोपाठ निरनिराळ्या घरांमध्ये राहिला, त्यांपैकी प्रत्येकाचा त्याने विमा उतरवलेला होता, त्यांपैकी प्रत्येक घरात आग लागली व प्रत्येक आगीनंतर त्याला वेगवेगळ्या विमा कंपनीकडून पैसे मिळाले ही तथ्ये, आगी अभावितपणे लागलेल्या नव्हत्या याचे दर्शक म्हणून संबद्ध आहेत.

(ख) 'ख' च्या ऋणकोकडून पैसे स्वीकारण्यास 'क' ची नेमणूक झाली आहे. त्याला मिळालेल्या रकमा दर्शविणाऱ्या चोपडीत नोंदी करणे हे 'क' चे काम आहे. विशिष्ट प्रसंगी प्रत्यक्षात त्याला जितके पैसे मिळाले त्यापेक्षा ते कमी मिळाले असे दर्शविणारी नोंद तो करतो. ही खोटी नोंद अभावित आहे की उद्देशपूर्वक आहे हा प्रश्न आहे. 'क' ने चोपडीत केलेल्या अन्य नोंदी खोट्या आहेत व प्रत्येक बाबतीत ती खोटी नोंद ही, 'क' ला अनुकूल आहे, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(ग) 'ख' ला कपटीपणाने बनावट चलन सुपूर्द केल्याचा 'क' वर आरोप आहे. चलनाची सुपूर्दगी अभावितपणे केली होती किंवा कसे हा प्रश्न आहे. 'ख' ला चलन सुपूर्द करण्याच्या जरा आधी किंवा जरा नंतर 'क' ने 'ग', 'घ' व 'ङ' यांना बनावट चलन सुपूर्द केले ही तथ्ये, 'ख' ला झालेली सुपूर्दगी ही अभावित नव्हती हे दर्शवणारी म्हणून संबद्ध आहेत.

**व्यवहारक्रमाचे अस्तित्त्व केव्हा संबद्ध असते.**

**१४.** एखादी विशिष्ट कृती करण्यात आली होती किंवा कसे असा जेव्हा प्रश्न असेल तेव्हा, ती कृती स्वाभाविकपणे करण्यात आली असती असा कोणताही व्यवहारक्रम अस्तित्वात असणे, हे संबद्ध तथ्य आहे.

**उदाहरणे.**

(क) विशिष्ट पत्र पाठवलेले होते किंवा कसे असा प्रश्न आहे. विवक्षित जागी ठेवलेली सर्व पत्रे डाकेत न्यायची ही सामान्य व्यवहारक्रम होता आणि ते विशिष्ट पत्र त्या जागी ठेवले गेले होते, ही तथ्ये संबद्ध आहेत.

(ख) विशिष्ट पत्र 'क' ला पोचले होते किंवा कसे असा प्रश्न आहे. रीतसर क्रमानुसार ते डाकेत टाकले होते, आणि पत्र परत पाठविणाऱ्या कार्यालयामार्फत ते परत करण्यात आले नव्हते, ही तथ्ये संबद्ध आहेत.

## कबुली

**'कबुली' याची व्याख्या.**

**१५.** 'कबुली' म्हणजे, जे कोणत्याही वादतथ्याबाबतचे किंवा संबद्ध तथ्याबाबतचे कोणतेही अनुमान सूचित करते,आणि जे, यात यापुढे नमूद केलेल्या व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीने व तशा परिस्थितीत केलेले आहे असे कोणतेही तोंडी किंवा लेखी अथवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अंतर्भूत असलेले कथन होय.

**कार्यवाहीतील पक्षकाराची किंवा त्याच्या अभिकर्त्याची कबुली.**

**१६.** (१) कार्यवाहीतील पक्षकाराने केलेली कथने किंवा अशा कोणत्याही पक्षकाराने, आपल्या ज्या अभिकर्त्याला अशी कथने करण्यास स्पष्टपणे किंवा उपलक्षणेने प्राधिकृत केले आहे असे न्यायालय त्या प्रकरणातील परिस्थितीत समजेल त्या व्यक्तीने केलेली कथने म्हणजे कबुली होय.

(२) (एक) प्रतिनिधी म्हणून ज्यांनी दावा लावला असेल किंवा प्रतिनिधी म्हणून ज्यांच्याविरुद्ध दावा लावला असेल त्या पक्षकारांनी केलेली कथने, जर ती करणारा पक्षकार ती करतेवेळी त्या भूमिकेत असताना केलेली नसतील तर, कबुली होत नाहीत; किंवा

(दोन) (क) कार्यवाहीच्या विषयवस्तूत ज्यांचा कोणताही स्वामित्वविषयक किंवा द्रव्यविषयक हितसंबंध आहे, आणि असा हितसंबंध असलेल्या व्यक्ती म्हणून ज्या कथन करतात त्या व्यक्तींनी; किंवा

(ख) दाव्यातील पक्षकारांनी दाव्याच्या विषयवस्तूमधील आपला हितसंबंध ज्यांच्याकडून प्राप्त केला असेल त्या व्यक्तींनी केलेली कथने,

जर ती करणाऱ्या व्यक्तींचा हितसंबंध अस्तित्वात असताना केलेली असतील तर,

अशी कथने म्हणजे कबुली होय.

**ज्या व्यक्तींचे दाव्यातील पक्षकाराच्या संबंधातील स्थान शाबीत केले पाहिजे अशा व्यक्तींनी दिलेल्या कबुली.**

**१७.** ज्या व्यक्तीचे स्थान किंवा दायित्व, दाव्यातील कोणत्याही पक्षकाराच्या संबंधात शाबीत करणे आवश्यक असते त्यांनी केलेली कथने, जर त्यांनी किंवा त्यांच्याविरुद्ध केलेल्या दाव्यात अशा स्थानाच्या किंवा दायित्वाच्या संबंधात अशा व्यक्तींविरुद्ध संबद्ध असतील तर, आणि जर ती कथने करणारी व्यक्ती अशा स्थानी असताना किंवा अशा दायित्वास अधीन असताना ती केलेली असतील तर, अशी कथने म्हणजे कबुल्या होत.

**उदाहरण.**

'क' हा 'ख' करता भाडे वसूल करण्याचे काम पत्करतो. 'ग' कडून 'ख' ला येणे असलेले भाडे वसूल न केल्याबद्दल 'ख' हा 'क' विरुद्ध दावा लावतो. 'ग' कडून 'ख' ला भाडे येणे असल्याचे 'क' नाकबूल करतो. आपण 'ख' ला भाडे देणे लागतो असे 'ग' ने केलेले कथन ही, कबुली आहे आणि 'ग' हा 'ख' ला भाडे देणे लागत होता हे 'क' ने नाकबूल केले तर, पूर्वोक्त कबुली हे, 'क' विरुद्ध संबद्ध तथ्य आहे.

**दाव्यातील पक्षकाराने स्पष्टपणे निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींच्या कबुल्या.**

**१८.** दाव्यातील पक्षकाराने विवादातील विषयाच्या संदर्भातील माहितीसाठी स्पष्टपणे ज्यांचा निर्देश केला असेल त्या व्यक्तींनी केलेली कथने म्हणजे कबुल्या होय.

**उदाहरण.**

'क' ने 'ख' ला विकलेला घोडा निकोप आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. 'क' हा 'ख' ला म्हणतो,- " 'ग' ला जाऊन विचार, 'ग' ला त्याची सर्व माहिती आहे", 'ग' चे कथन ही कबुली आहे.

**कबुली देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध आणि त्यांच्याकडून किंवा त्यांच्या वतीने कबुल्यांची शाबिती.**

**१९.** कबुल्या देणारी व्यक्ती किंवा तिचा हितसंबंध- प्रतिनिधी यांच्याविरुद्ध त्या कबुल्या संबद्ध असतात आणि त्यांच्याविरुद्ध त्या शाबीत करता येतात; परंतु कबुली देणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या वतीने किंवा तिच्या हितसंबंध-प्रतिनिधीला पुढील प्रकरणे खेरीजकरून, त्या शाबीत करता येऊ शकत नाहीत :—

(१) कबुली देणारी व्यक्ती मृत असती तर, ती कबुली, कलम २६ खालील त्रयस्थ व्यक्तींमध्ये संबद्ध झाली असती अशा स्वरूपाची असेल तेव्हा, कबुली देणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या वतीने ती शाबीत करता येईल.

(२) एखादी कबुली म्हणजे संबद्ध किंवा वादनिविष्ट असलेल्या कोणत्याही मानसिक किंवा शारीरिक अवस्थेच्या अस्तित्वाबाबत अशी मानसिक किंवा शारीरिक अवस्था अस्तित्वात असण्याच्या वेळी किंवा त्या सुमारास केलेले कथन असेल आणि त्याचा खोटेपणा असंभाव्य करणारे वर्तन त्या कथनाच्या बरोबर घडलेले असेल तेव्हा, कबुली देणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या वतीने ती शाबीत करता येईल.

(३) एखादी कबुली ही कबुली म्हणून संबद्ध नसून अन्यथा संबद्ध असेल तर, कबुली देणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या वतीने ती शाबीत करता येईल.

**उदाहरणे.**

(क) विवक्षित विलेख बनावट आहे की नाही हा 'क' व 'ख' यांच्यामधील प्रश्न आहे. तो खरा आहे असे 'क' म्हणतो, तर तो बनावट आहे असे 'ख' चे म्हणणे आहे. विलेख खरा आहे असे 'ख' ने कथन केल्याचे 'क' ला शाबीत करता येईल आणि विलेख खोटा आहे असे 'क' ने कथन केल्याचे 'ख' ला शाबीत करता येईल; परंतु, विलेख खरा आहे असे स्वतः कथन केल्याचे 'क' ला शाबीत करता येणार नाही, आणि विलेख बनावट आहे असे स्वतः कथन केल्याचे 'ख' ला शाबीत करता येणार नाही.

(ख) जहाजाचा कप्तान 'क' याने, जहाज भरकटविल्याबद्दल त्याची न्यायचौकशी केली जाते. जहाज त्याच्या योग्य मार्गाबाहेरून नेण्यात आले होते हे दर्शविणारा पुरावा दिला गेला आहे. 'क' त्याच्या कामाच्या सामान्य क्रमानुसार त्याने ठेवलेली वही सादर करतो; जी अवलोकने, त्याने रोजच्या रोज टिपून ठेवली असल्याचे अभिकथन करण्यात आले आहे ती अवलोकने त्यात दर्शवलेली आहेत आणि जहाज त्याच्या योग्य मार्गाबाहेरून नेण्यात आले नसल्याचे त्यावरून सूचित झाले आहे. 'क' ला ही कथने शाबीत करता येतील, कारण तो मृत्यू पावला असता तर, कलम २६ च्या खंड (ख) खाली ही कथने त्रयस्थ पक्षांमध्ये ग्राह्य झाली असती.

(ग) 'क' ने कोलकाता येथे गुन्हा केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. जे पत्र चेन्नई येथे त्याने स्वतः लिहून त्यावर त्या दिवशी दिनांक टाकला होता व त्यावर चेन्नई डाकेचा त्या दिवसाचा शिक्का आहे असे एक पत्र तो हजर करतो. पत्राच्या दिनांकाच्या रूपातील कथन ग्राह्य आहे, कारण जर 'क' मृत्यू पावला असता तर, कलम २६ च्या खंड (ख) खाली ते ग्राह्य झाले असते.

(घ) एखादा माल हा चोरीचा माल आहे हे माहीत असताना तो स्वीकारल्याचा 'क' वर आरोप आहे. चोरीचा माल त्याच्या किंमतीहून कमी किंमतीला विकण्यास आपण नकार दिला होता हे शाबीत करण्याची तो तयारी दाखवतो. ही कथने म्हणजे कबुल्या असल्या तरी, 'क' ला ती शाबीत करता येतील, कारण ती वादतथ्यांचा परिणाम दर्शवणाऱ्या वर्तनाचा खुलासा करणारी आहेत.

(ङ) जे चलन नकली असल्याचे 'क' ला माहीत होते ते त्याने कपटीपणाने जवळ बाळगल्याचा त्याच्यावर आरोप आहे. चलन बनावट आहे की नाही याबाबत त्याला संशय आल्यामुळे त्याने एका कुशल व्यक्तीला ते पारखण्यास सांगितले होते, आणि त्या व्यक्तीने त्याची पारख करून ते खरे असल्याचे त्याला सांगितले होते, हे शाबीत करण्याची तयारी दाखवतो. 'क' ला ही तथ्ये शाबीत करता येतील.

**दस्तऐवजांच्या मजकुराबाबतच्या तोंडी कबुली केव्हा संबद्ध असतात.**

**२०.** दस्तऐवजांचा मजकूर शाबीत करू पाहणाऱ्या पक्षकाराने अशा दस्तऐवजाच्या मजकुराचा दुय्यम पुरावा देण्यास यात यापुढे अंतर्भूत असलेल्या नियमांखाली आपण हक्कदार असल्याचे दाखवून दिले नाही तर व तोपर्यंत किंवा हजर केलेल्या दस्तऐवजाचा खरेपणा प्रश्नास्पद असल्याशिवाय, दस्तऐवजाच्या मजकुराबाबतच्या तोंडी कबुली संबद्ध असणार नाहीत.

**दिवाणी प्रकरणांमध्ये कबुली केव्हा संबद्ध.**

**२१.** दिवाणी प्रकरणांमध्ये कोणतीही कबुली, एकतर तिचा पुरावा द्यावयाचा नाही अशा स्पष्ट शर्तीवर दिलेली असेल तर किंवा तिचा पुरावा देऊ नये असा पक्षकारांमध्ये आपापसात करार झालेला असावा असे ज्या परिस्थितीवरून न्यायालय अनुमान काढू शकते अशा परिस्थितीत दिलेली असेल तर, ती संबद्ध नसते.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही अधिवक्त्याला कलम १३२ चा पोट-कलम (१) व (२) या अन्वये ज्याबाबीच्या संबंधात साक्ष देण्यास भाग पाडले जाईल त्या कोणत्याही बाबीसंबंधी साक्ष देण्यापासून त्याला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे सूट मिळते असे मानले जाणार नाही.

**प्रलोभन, धमकी, जबरदस्ती किंवा वचन याद्वारे मिळवलेला कबुलीजबाब फौजदारी कार्यवाहीत केव्हा असंबद्ध असतो.**

**२२.** आरोपी व्यक्तीविरुद्ध ठेवलेल्या दोषारोपाच्या संबंधात अधिकारस्थानावरील व्यक्तीने कोणतेही प्रलोभन दाखवल्यामुळे, धमकी दिल्यामुळे, जबरदस्ती केल्यामुळे किंवा वचन दिल्यामुळे आरोपीने कबुलीजबाब दिलेला आहे असे न्यायालयाला दिसून आले असेल आणि तसा कबुलीजबाब दिल्याने त्याच्याविरुद्ध होणाऱ्या कार्यवाहीत त्याला ऐहिक स्वरूपाचा काही फायदा होईल किंवा तशा स्वरूपाचा काही दुष्परिणाम टाळता येईल असे मानण्याच्या दृष्टीने आरोपी व्यक्तीला वाजवी वाटतील अशी कारणे तिला मिळण्यासाठी न्यायालयाच्या मते ते प्रलोभन, धमकी, जबरदस्ती किंवा वचन पुरेसे असेल तर, तो कबुलीजबाब फौजदारी कार्यवाहीत असंबद्ध असतो :

परंतु, जर, न्यायालयाच्या मते, असे कोणतेही प्रलोभन दाखवल्यामुळे, धमकी दिल्यामुळे, जबरदस्ती केल्यामुळे किंवा वचन दिल्यामुळे पडलेला प्रभाव, पूर्णपणे दूर झाल्यानंतर, कबुलीजबाब दिलेला असेल तर, ती, संबद्ध असते :

परंतु आणखी असे की, जर असा कबुलीजबाब अन्यथा संबद्ध असेल तर, तो गुप्ततेच्या वचनाखाली दिलेला होता या कारणावरून, किंवा तो मिळविण्याच्या प्रयोजनासाठी आरोप असलेल्या व्यक्तीची फसवणूक केल्याच्या परिणामी दिलेला होता, किंवा जेव्हा तो दारू प्यायलेला होता तेव्हा, दिलेला होता, किंवा ज्यांचे उत्तर देणे त्याने गरजेचे नव्हते त्या प्रश्नांच्या,- मग त्या प्रश्नांचे स्वरूप काहीही असो,- उत्तरात दिलेला होता या कारणावरून, किंवा असा कबुलीजबाब देण्यास तो बांधील नाही, आणि तिचा पुरावा त्याच्याविरुद्ध दिला जाईल याबद्दल त्याला ताकीद दिली नव्हती या कारणावरून केवळ ती, असंबद्ध ठरत नाही.

**पोलीस अधिकाऱ्याकडे दिलेला कबुलीजबाब.**

**२३.** (१) पोलीस अधिकाऱ्याकडे दिलेला कोणताही कबुलीजबाब, कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीविरुद्ध शाबीत करता येणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती पोलीस अधिकाऱ्याच्या हवालतीत असताना, तिने दिलेला कबुलीजबाब हा, दंडाधिकाऱ्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीत दिलेला नसेल तर, तो तिच्याविरुद्ध शाबीत करता येणार नाही :

परंतु, जेव्हा कोणत्याही अपराधाचा आरोप असलेली एखादी व्यक्ती, पोलीस अधिकाऱ्याच्या हवालतीत असताना, तिच्याकडून मिळाळेल्या माहितीच्या परिणामी, कोणतेही तथ्य उघडकीस आले आहे अशी अभिसाक्ष दिली असेल तेव्हा, अशा माहितीपैकी,- मग ती, कबुलीजबाब या सदरात मोडत असो किंवा नसो,- जेवढा भाग त्यामुळे उघडकीस आलेल्या तथ्याशी निःसंदिग्धपणे संबंधित असेल तेवढा भाग शाबीत करता येईल.

**कबुलीजबाब देणारी व्यक्ती व तिच्या जोडीला त्याच अपराधाबद्दल न्यायचौकशीधीन असलेल्या अन्य व्यक्ती यांना बाधक असा कबुलीजबाब शाबीत झाला असता तो विचारात घेणे.**

**२४.** जेव्हा एकाहून अधिक व्यक्तींची एकाच अपराधाबद्दल संयुक्तपणे न्यायचौकशी केली जात असेल व अशा व्यक्तींपैकी एका व्यक्तीने दिलेला आणि तिला स्वतःला व अशा व्यक्तींपैकी दुसऱ्या कोणाला बाधक असलेला असा कबुलीजबाब शाबीत झाला असेल तेव्हा, न्यायालयाला, असा कबुलीजबाब, अशा अन्य व्यक्तींविरुद्ध तसेच असा कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीविरुद्ध विचारात घेता येईल.

**स्पष्टीकरण एक.–** या कलमात, वापरलेल्या "अपराध" यामध्ये, अपराधाची अपप्रेरणा किंवा अपराध करण्याचा प्रयत्न यांचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण दोन.–** जो फरार झालेला आहे किंवा ज्याने, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम ८४ अन्वये काढलेल्या उद्घोषणेचे पालन करण्यात कसूर केली आहे अशा आरोपीच्या अनुपस्थित केलेली एकापेक्षा अधिक व्यक्तींची न्यायचौकशी ही, या कलमाच्या प्रयोजनार्थ संयुक्त न्यायचौकशी असल्याचे मानण्यात येईल.

**उदाहरणे.**

(क) 'ग' च्या खुनाबद्दल 'क' व 'ख' यांची संयुक्तपणे न्यायचौकशी होते. " 'ग' चा खून 'ख' ने व मी केला"- असे 'क' म्हणाल्याचे शाबीत होते. न्यायालयाला, या कबुलीजबाबाचा परिणाम 'ख' विरूद्ध विचारात घेता येईल.

(ख) 'ग' च्या खुनाबद्दल 'क' ची न्यायचौकशी चालू आहे. 'क' व 'ख' यांनी 'ग' चा खून केला व " 'ग' चा खून 'क' ने व मी केला".- असे 'ख' म्हणाला असा पुरावा आहे. न्यायालयाला, हे कथन, 'क' विरुद्ध विचारात घेता येणार नाही, कारण 'ख' ची त्याच्याबरोबर संयुक्तपणे न्यायचौकशी केली जात नाही.

**कबुल्या हा निर्णायक पुरावा नाही, परंतु त्या प्रतिष्टंभक होऊ शकतील.**

२५. कबुल्या म्हणजे कबूल केलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा नव्हे तर, यात यापुढे अंतर्भूत असलेल्या तरतुदींन्वये त्या प्रतिष्टंभक म्हणून कार्य करू शकतील.

## ज्यांना साक्षीदार म्हणून बोलावणे शक्य नसते त्या व्यक्तींनी केलेली कथने

**जी व्यक्ती मरण पावली आहे किंवा जिचा शोध लागू शकत नाही, इत्यादी प्रकरणांत त्या व्यक्तीने केलेले संबद्ध तथ्याचे कथन हे, ज्यांमध्ये संबद्ध असते अशी प्रकरणे.**

२६. जी व्यक्ती मरण पावली आहे किंवा जिचा शोध लागू शकत नाही किंवा जी साक्ष देण्यास असमर्थ झाली आहे किंवा थोडाबहुत विलंब किंवा खर्च झाल्याशिवाय जिला समक्ष हजर करणे शक्य नसून त्या प्रकरणाच्या परिस्थितीत तसे करणे न्यायालयाला गैरवाजवी वाटते अशा व्यक्तीने केलेली संबद्ध तथ्यांची लेखी किंवा तोंडी कथने ही पुढील प्रकरणी संबद्ध तथ्ये असतात :–

(क) ज्या प्रकरणांमध्ये एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबतचा प्रश्न उपस्थित झाला असेल त्या प्रकरणांमध्ये, जेव्हा त्या व्यक्तीने तिच्या मृत्यूच्या कारणांसंबधी किंवा ज्या घडामोडीचे पर्यावसान तिच्या मृत्यूत झाले असेल त्या घडामोडीच्या कोणत्याही परिस्थितिसंबंधी कथन केले असेल तेव्हा, अशी कथने करणाऱ्या व्यक्तीला कथन करण्याच्या वेळी मृत्यू अपेक्षित असला किंवा नसला तरीही आणि ज्या कार्यवाहीत तिच्या मृत्यूच्या कारणाबाबतचा प्रश्न उपस्थित झाला आहे त्या कार्यवाहीचे स्वरूप काहीही असले तरीही, ती कथने संबद्ध असतात;

(ख) जेव्हा ते कथन अशा व्यक्तीने सामान्य व्यवहारक्रमानुसार केलेले असेल, आणि विशेषतः, जेव्हा ते सामान्य व्यवहारक्रमानुसार किंवा व्यावसायिक कर्तव्य पार पाडताना तिने ठेवलेल्या पुस्तकात तिने केलेल्या कोणत्याही नोंदीच्या किंवा टाचणाच्या स्वरूपात; अथवा पैसे, माल, रोखे किंवा कोणत्याही प्रकारची मालमत्ता मिळाल्याबद्दल तिने लिहून दिलेल्या किंवा स्वाक्षरित केलेल्या पोचपावतीच्या स्वरूपात, अथवा वाणिज्य-व्यवहारात वापरलेल्या तिने लिहिलेला किंवा स्वाक्षरित केलेला दस्तऐवजाच्या स्वरूपात; अथवा प्रायः ज्या पत्रावर किंवा अन्य दस्तऐवजावर दिनांक घालण्याचे, तो दस्तऐवज लिहिण्याचे किंवा त्यावर स्वाक्षरी करण्याचे काम बहुदा ती व्यक्ती करते त्या पत्रावरील किंवा दस्तऐवजावरील दिनांकाच्या स्वरूपात असेल तेव्हा;

(ग) असे कथन जेव्हा ते करणाऱ्या व्यक्तीच्या द्रव्यविषयक किंवा स्वामित्वविषयक हितसंबंधाविरूद्ध असेल किंवा ते खरे असल्यास, त्यामुळे तो फौजदारी खटल्याला किंवा नुकसानीच्या दाव्यास पात्र होऊ शकेल किंवा पात्र होऊ शकला असता असे असेल तेव्हा;

(घ) जो कोणताही सार्वजनिक हक्क किंवा रूढी अथवा सार्वजनिक किंवा सर्वसाधारण हितसंबंधाची बाब अस्तित्वात असल्यास, ज्याचे अस्तित्व अशा कोणत्याही व्यक्तीला माहीत असणे संभाव्य झाले असते त्याच्या अस्तित्वासंबंधी तिचे मत अशा कथनात दिलेले असेल तेव्हा, आणि जेव्हा असा हक्क, रूढी किंवा बाब यासंबंधी कोणताही वाद उपस्थित होण्यापूर्वी असे कथन केले गेले असेल तेव्हा;

(ङ) व्यक्तींमधील रक्ताच्या, विवाहाच्या किंवा दत्तकाच्या नात्याबाबत कथन करण्यात आले असून ते कथन करणाऱ्या व्यक्तीला त्यांच्यामधील रक्ताचे, विवाहाचे किंवा दत्तकाचे नाते माहीत असण्याची विशेष साधने उपलब्ध होती आणि वादाचा प्रश्न उपस्थित केला जाण्यापूर्वी ते कथन केले होते असे असेल तेव्हा;

(च) जेव्हा ते कथन मृत व्यक्तींमध्ये असलेल्या कोणत्याही रक्ताच्या विवाहाच्या किंवा दत्तकाच्या नात्याच्या अस्तित्वासंबंधी असेल आणि अशी मृत व्यक्ती ज्या कुटुंबातील होती त्या कुटुंबाच्या कारभारासंबंधीच्या कोणत्याही मृत्युपत्रात किंवा विलेखात अथवा कोणत्याही कौटुंबिक वंशावळीत किंवा कोणत्याही थडग्याच्या शिळेवर, कौटुंबिक तसबिरीवर अथवा ज्यावर अशी कथने सामान्यपणे नमूद केली जातात अशा अन्य कोणत्याही वस्तूवर ते नमूद केलेले असेल तेव्हा, आणि जेव्हा वादाचा प्रश्न उपस्थित केला जाण्यापूर्वी असे कथन केले गेले असेल तेव्हा;

(छ) जेव्हा ते कथन, कलम ११ च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही संव्यवहारासंबंधीच्या कोणत्याही विलेखात, मृत्युपत्रात किंवा अन्य दस्तऐवजात अंतर्भूत असेल तेव्हा;

(ज) जेव्हा ते कथन, अनेक व्यक्तींनी केलेले असते, आणि प्रश्नास्पद बाबीशी संबद्ध असलेल्या त्यांच्या भावना किंवा त्यांचे समज व्यक्त करत असेल तेव्हा.

**उदाहरणे.**

(क) 'ख' ने 'क' चा खून केला होता किंवा कसे हा प्रश्न आहे; किंवा ज्या घडामोडीच्या ओघात 'क' वर बलात्कार केला होता त्या घडामोडीत तिला झालेल्या जखमांमुळे ती मृत्यू पावते. 'ख' ने तिच्यावर बलात्कार केला होता किंवा कसे हा प्रश्न आहे; किंवा ज्या परिस्थितीत 'ख' ने 'क' ला ठार मारले होते त्या परिस्थितीत 'क' च्या विधवेला 'ख' विरुद्ध दावा लावता येईल अशी ती परिस्थिती आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. 'क' ने त्याच्या किंवा तिच्या मृत्यूच्या कारणासंबंधी केलेली, अनुक्रमे, विचाराधीन खून, बलात्कार व कारवाईयोग्य दुष्कृती यांचा निर्देश करणारी कथने, ही संबद्ध तथ्ये आहेत.

(ख) 'क' च्या जन्म तारखेसंबंधी प्रश्न आहे. एका शल्यचिकित्सकाने व्यवहारक्रमानुसार नियमितपणे ठेवलेल्या दैनंदिनीत, अमुक दिवशी त्याच्या देखरेखीखाली ' क ' च्या आईची प्रसूती झाली व तिला मुलगा झाला असे नमूद करणारी जी नोंद आहे, ती संबद्ध तथ्य आहे.

(ग) अमूक दिवशी 'क' नागपूर येथे होता किंवा कसे हा प्रश्न आहे. एका मृत न्यायअभिकर्त्याने व्यवहारक्रमानुसार नियमितपणे ठेवलेल्या दैनंदिनीत, अमुक दिवशी तो 'क' ला नागपूरमधील नमूद केलेल्या स्थळी विशिष्ट कामाबद्दल त्याच्याशी विचारविनिमय करण्यासाठी भेटला होता असे जे कथन केले आहे, ते संबद्ध तथ्य आहे.

(घ) अमुक दिवशी एक जहाज मुंबई बंदरातून निघाले होते किंवा कसे हा प्रश्न आहे. ते जहाज भाड्याने घेणाऱ्या व्यापारी भागीदारी संस्थेच्या एका मृत सदस्याने, जहाजी माल चेन्नईमधील आपल्या ज्या व्यवहार प्रतिनिधींच्या हवाली करावयाचा होता त्यांना लिहिलेल्या ज्या पत्रात, अमुक दिवशी ते जहाज मुंबई बंदरातून निघाले असे नमूद केले आहे ते पत्र हे, संबद्ध तथ्य आहे.

(ङ) 'क' ला विवक्षित जमिनीचे भाडे दिले होते किंवा कसे हा प्रश्न आहे. आपण 'क' च्या वतीने भाडे स्वीकारले असून 'क' च्या आदेशावरून ते ठेवून घेतले आहेत असे नमूद करणारे 'क' च्या मृत अभिकर्त्याने 'क' ला लिहिलेले पत्र, हे संबद्ध तथ्य आहे.

(च) 'क' व 'ख' हे विधितः विवाहबद्ध झाले होते किंवा कसे हा प्रश्न आहे. ज्या परिस्थितीत विवाह लावणे हा गुन्हा होऊ शकेल अशा परिस्थितीत आपण त्यांचा विवाह लावला होता हे, मृत धर्मोपदेशकाचे कथन संबद्ध आहे.

(छ) बेपत्ता असलेल्या 'क' या व्यक्तीने विवक्षित दिवशी एक पत्र लिहिले होते किंवा कसे हा प्रश्न आहे. त्याने लिहिलेल्या पत्रावर त्या दिवशीचा दिनांक टाकला आहे, हे तथ्य संबद्ध आहे.

(ज) नौकाभंगाचे कारण काय होते हा प्रश्न आहे. ज्याला समक्ष हजर करता येत नाही त्या कप्तानाने त्यासंबंधी केलेले अधिकथन हे, संबद्ध तथ्य आहे.

(झ) अमुक मार्ग हा सार्वजनिक रस्ता आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. तो मार्ग सार्वजनिक आहे असे 'क' या गावप्रमुखाने केलेले कथन हे, संबद्ध तथ्य आहे.

(ञ) विशिष्ट बाजारात विवक्षित दिवशी धान्याचा भाव काय होता हा प्रश्न आहे. मयत व्यापाऱ्याने सामान्य व्यवहारक्रमानुसार केलेले भावासंबंधीचे कथन, हे संबद्ध तथ्य आहे.

(ट) 'क' ही मयत व्यक्ती 'ख' ची वडील होती किंवा कसे हा प्रश्न आहे. 'ख' हा आपला मुलगा आहे असे 'क' ने केलेले कथन हे, संबद्ध तथ्य आहे.

(ठ) 'क' ची जन्मतारीख कोणती होती हा प्रश्न आहे. अमुक दिवशी 'क' जन्मला असे कळविण्यासाठी 'क' च्या वडिलांनी मित्राला लिहिलेले पत्र हे, संबद्ध तथ्य आहे.

(ड) 'क' व 'ख' हे विवाहबद्ध झाले होते किंवा कसे आणि केव्हा झाले होते हा प्रश्न आहे. 'ख' चा मृत वडील 'ग' याने, अमुक दिवशी त्याच्या मुलीचा 'क' शी विवाह झाल्याबद्दल टाचणवहीत केलेली नोंद हे, संबद्ध तथ्य आहे.

(ढ) एका दुकानाच्या दर्शनी खिडकीवर लावलेल्या रंगीत विडंबनचित्रातून व्यक्त झालेल्या बदनामीबद्दल 'क' हा 'ख' विरुद्ध दावा लावतो. विडंबनचित्राशी साम्य व त्याचे बदनामीकारक स्वरूप याबाबतचा प्रश्न आहे. बघ्यांच्या जमावाने या मुद्यांबाबत केलेली आलोचना शाबीत करता येतील.

**विवक्षित पुराव्यात नमूद केलेल्या तथ्याची नंतरच्या कार्यवाहीत शाबिती करण्यासाठी तो पुरावा संबद्ध असणे.**

**२७.** साक्षीदाराने न्यायिक कार्यवाहीत दिलेला पुरावा किंवा असा पुरावा घेण्यासाठी कायद्याद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीसमोर दिलेला पुरावा हा, साक्षीदार मृत्यू पावला असल्यास किंवा सापडू शकत नसल्यास किंवा साक्ष देण्यास असमर्थ झाल्यास किंवा विरुद्ध पक्षाने त्याला बेपत्ता केल्यास अथवा थोडाबहुत विलंब किंवा खर्च झाल्याशिवाय त्याला समक्ष हजर करणे शक्य नसून त्या प्रकरणाच्या परिस्थितीत तो विलंब किंवा खर्च न्यायालयाला गैरवाजवी वाटत असल्यास, त्या साक्षीत नमूद केलेल्या तथ्यांची सत्यता शाबीत करण्यासाठी नंतरच्या न्यायिक कार्यवाहीत किंवा त्याच न्यायिक कार्यवाहीच्या नंतरच्या टप्प्यात संबद्ध असतो :

परंतु, कार्यवाही, त्याच पक्षकारांमध्ये किंवा त्यांच्या हितसंबंधित-प्रतिनिधींमध्ये चालू असली पाहिजे; पहिल्या कार्यवाहीतील विरुद्ध पक्षकारास उलटतपासणी करण्याचा हक्क व संधी असली पाहिजे आणि वादनिविष्ट प्रश्न हे पहिल्या कार्यवाहीत जे होते तेच सारतः दुसऱ्या कार्यवाहीत असले पाहिजेत.

**स्पष्टीकरण.—** फौजदारी न्यायचौकशी किंवा चौकशी ही, या कलमाच्या अर्थानुसार फिर्यादी व आरोपी यांच्यामधील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## विशेष परिस्थितीत केलेली कथने

**हिशेबाच्या पुस्तकांतील नोंदी केव्हा संबद्ध असतात.**

**२८.** व्यवहारक्रमानुसार नियमितपणे ठेवल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ठेवलेल्या पुस्तकांसह हिशेब-पुस्तकांतील नोंदी, न्यायालयाला, ज्या बाबीची चौकशी करावयाची असेल त्या बाबीचा जेव्हा जेव्हा निर्देश केलेला असेल तेव्हा, संबद्ध असतात, परंतु, अशी कथनेच केवळ, कोणत्याही व्यक्तीला दायित्वाधीन करण्याचा पुरेसा पुरावा नसतो.

### उदाहरण.

'क' हा 'ख' विरुद्ध एक हजार रुपयांकरता दावा लावतो, आणि 'ख' उक्त रकमेबद्दल त्याच्या ऋणात आहे असे दर्शविणाऱ्या त्याच्या हिशेब-पुस्तकांमधील नोंदी 'क' दाखवितो. या नोंदी, ऋण शाबीत करण्याच्या दृष्टीने संबद्ध आहेत, परंतु, अन्य पुरावा नसताना, ते शाबीत करण्यास त्या पुरेशा नाहीत.

**कर्तव्य पार पाडताना सार्वजनिक अभिलेखात किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेखात केलेल्या नोंदीची संबद्धता.**

**२९.** वादतथ्य किंवा संबद्ध तथ्य नमूद करणारी कोणत्याही सार्वजनिक पुस्तकातील किंवा अन्य कार्यालयीन पुस्तकातील, नोंदपुस्तकातील किंवा अभिलेखातील किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेखातील आणि लोकसेवकाने त्याचे पदीय कर्तव्य पार पाडताना, किंवा ज्या देशात असे पुस्तक, नोंदपुस्तक किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेख ठेवला असेल त्या देशाच्या कायद्याद्वारे विशेषकरून विहित केलेले कर्तव्य पार पाडताना अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेली नोंद, हीच स्वयंमेव एक संबद्ध तथ्य असते.

**नकाशे, तक्ते व आराखडे यांतील कथनांची संबद्धता.**

**३०.** सर्वसाधारणपणे सार्वजनिक विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या प्रकाशित केलेल्या नकाशात किंवा तक्त्यात अथवा केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या प्राधिकारान्वये तयार करण्यात आलेल्या नकाशात किंवा आराखड्यात प्रायः दर्शविल्या जाणाऱ्या किंवा नमूद केल्या जाणाऱ्या बाबींसंबंधी अशा नकाशात, तक्त्यात किंवा आराखड्यात जेव्हा वादतथ्यांची किंवा संबद्ध तथ्यांची कथने केलेली असतात तेव्हा, ती कथनेच स्वयंमेव संबद्ध तथ्ये असतात.

**विवक्षित अधिनियामांमध्ये किंवा अधिसूचनांमध्ये अंतर्भूत असलेल्या सार्वजनिक स्वरूपाच्या तथ्यासंबंधीच्या कथनाची संबद्धता.**

३१. जेव्हा न्यायालयाला सार्वजनिक स्वरूपाच्या कोणत्याही तथ्याच्या अस्तित्वासंबंधी मत बनवावयाचे असेल तेव्हा, कोणत्याही केंद्रीय अधिनियमात, किंवा राज्य अधिनियमात अथवा संबंधित **राजपत्रात** दिसून येणाऱ्या केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या अधिसूचनेत अंतर्भूत असलेल्या उद्देश कथनात अथवा असे **राजपत्र** असल्याचे दिसणाऱ्या कोणत्याही मुद्रित कागदपत्रात किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वरुपात केलेले त्या तथ्यासंबंधीचे कोणतेही कथन हे, संबद्ध तथ्य असते.

**इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वरुपासह कायद्याच्या पुस्तकांमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही कायद्यासंबंधीच्या कथनांची संबद्धता.**

३२. जेव्हा न्यायालयाला, कोणत्याही देशाच्या कायद्यासंबंधी मत बनवावयाचे असेल तेव्हा, अशा देशाच्या शासनाच्या प्राधिकारान्वये आणि असा कोणताही कायदा अंतर्भूत करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वरुपासह मुद्रित किंवा प्रकाशित झालेल्या पुस्तकामध्ये असा कोणताही कायदा अंतर्भूत आहे असे दिसते त्या पुस्तकात अंतर्भूत असलेले अशा कायद्याचे कोणतेही कथन आणि अशा देशाच्या न्यायालयाच्या कोणत्याही अधिनिर्णयांचे कोणतेही प्रतिवृत्त असल्याचे दिसते त्या इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वरुपासह पुस्तकात अंतर्भूत असलेल्या अशा अधिनिर्णयांचे कोणतेही प्रतिवृत्त हे, संबद्ध असते.

## कथनापैकी किती भाग शाबीत करावयचा

**जेव्हा कथन हे एखाद्या संभाषणाचा, दस्तऐवजाचा, इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचा, पुस्तकाचा अथवा पत्रांच्या किंवा कागदपत्रांच्या मालिकेचा भाग असेल तेव्हा कोणता पुरावा द्यावयाचा.**

३३. ज्याचा पुरावा दिलेला आहे असे कोणतेही कथन हे, जेव्हा अधिक मोठ्या कथनाचा किंवा संभाषणाचा भाग असेल, अथवा एका सुट्या दस्तऐवजाचा भाग असेल, अथवा एखाद्या पुस्तकाचा भाग असलेल्या एखाद्या दस्तऐवजात अंतर्भूत असेल, अथवा इलेक्ट्रॉनिक अभिलेखाच्या भागात अंतर्भूत असेल, अथवा सलग पत्रांच्या किंवा कागदपत्रांच्या मालिकेचा भाग असेल तेव्हा, ते मोठे कथन, संभाषण, दस्तऐवज, पुस्तक किंवा पत्रांची अथवा कागदपत्रांची मालिका यांचा जितका भाग, त्या विशिष्ट प्रकरणात, या कथनाचे स्वरूप व परिणाम आणि कोणत्या परिस्थितीत ते कथन केलेले होते याचे संपूर्ण आकलन होण्यासाठी न्यायालयाला जितक्या आवश्यक वाटेल तितक्याच कथनाच्या भागाचा पुरावा द्यावा लागेल, अधिक कथनाच्या भागाचा नाही.

## न्यायालयांचे न्यायनिर्णय केव्हा संबद्ध

**आधीचे न्यायनिर्णय हे दुसऱ्या दाव्यास किंवा न्यायचौकशीस रोध करण्याच्या दृष्टीने संबद्ध.**

३४. कोणत्याही न्यायालयाने एखाद्या दाव्याची दखल घ्यावयास हवी किंवा कसे अथवा एखादी न्यायचौकशी करावयास हवी किंवा कसे हा प्रश्न असेल तेव्हा, ज्या कोणत्याही न्यायनिर्णयामुळे, आदेशामुळे, किंवा हुकूमनाम्यामुळे अशा न्यायालयाला अशा दाव्याची दखल घेण्यास किंवा अशी न्यायचौकशी करण्यास विधितः प्रतिबंध होतो त्याचे अस्तित्व हे, संबद्ध तथ्य असते.

**इच्छापत्रप्रमाणन, इत्यादी विषयक अधिकारितांमधील विवक्षित न्यायनिर्णयांची संबद्धता.**

३५. (१) इच्छापत्रप्रमाणनविषयक, विवाहविषयक, नाविकविषयक किंवा नादारीविषयक अधिकारतेचा वापर करताना, सक्षम न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने दिलेला जो अंतिम न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामा कोणत्याही व्यक्तीला कोणतेही वैध स्थान प्रदान करतो किंवा तिच्याकडून ते काढून घेतो, अथवा कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही स्थानाला हक्कदार असल्याचे किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट वस्तूला हक्कदार असल्याचे एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीला उद्देशून नव्हे तर सर्वांना उद्देशून घोषित करतो तो अंतिम न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामा हा, अशा कोणत्याही वैध स्थानाचे किंवा अशा कोणत्याही व्यक्तीचा अशा कोणत्याही वस्तूवरील मालकी हक्काचे अस्तित्व संबद्ध असेल तेव्हा, संबद्ध असतो.

(२) असा न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामा हा,–

(एक) त्याद्वारे प्रदान करण्यात आलेले कोणतेही वैध स्थान, असा न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामा प्रवर्तित झाला त्यावेळी प्राप्त झाले असल्याचा;

(दोन) त्याद्वारे अशी कोणतीही व्यक्ती ज्या कोणत्याही वैध स्थानास हक्कदार असल्याचे घोषित करण्यात आले असेल ते स्थान, त्या व्यक्तीला ज्यावेळी प्राप्त झाले असल्याचे अशा न्यायनिर्णयाद्वारे, आदेशाद्वारे किंवा हुकूमनाम्याद्वारे घोषित केलेले असेल त्यावेळी ते तिला प्राप्त झाले असल्याचा;

(तीन) त्याद्वारे अशा कोणत्याही व्यक्तीकडून जे कोणतेही वैध स्थान, काढून घेण्यात आले असेल ते स्थान ज्या वेळेपासून संपुष्टात आले किंवा संपुष्टात यावे असे अशा न्यायनिर्णयाद्वारे, आदेशाद्वारे किंवा हुकूमनाम्याद्वारे घोषित केलेले असेल ते संपुष्टात आले असल्याचा; आणि

(चार) त्याद्वारे कोणतीही व्यक्ती ज्या कोणत्याही वस्तूला अशी हक्कदार असल्याचे घोषित करण्यात आले असेल, ती वस्तू ज्या वेळेपासून त्या व्यक्तीच्या मालकीची झाली किंवा व्हावी असे, अशा न्यायनिर्णयाद्वारे, आदेशाद्वारे किंवा हुकूमनाम्याद्वारे घोषित झाले असेल त्यावेळी ती वस्तू, त्या व्यक्तीच्या मालकीची झाली असल्याचा,

निर्णायक पुरावा असतो.

**कलम ३५ मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त अन्य न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामे यांची संबद्धता व परिणाम.**

**३६.** कलम ३५ मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त असे अन्य न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामे, जर ते चौकशीशी संबद्ध असलेल्या सार्वजनिक स्वरुपाच्या बाबींशी संबंधित असतील तर, संबद्ध असतात; परंतु असे न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामे हे, त्यात जे नमूद केलेले असेल त्याचा निर्णायक पुरावा नसतात.

**उदाहरण.**

आपल्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबद्दल ‘क’ हा ‘ख’ विरुद्ध दावा लावतो. ‘ख’ त्या जमिनीवर सार्वजनिक मार्गाधिकार अस्तित्वात असल्याचे अभिकथन करतो व ‘क’ ते नाकबूल करतो. त्याच जमिनीवर अतिक्रमण केल्याबद्दल ‘क’ ने ‘ग’ विरूद्ध लावलेल्या ज्या दाव्यात ‘ग’ ने तसाच मार्गाधिकार अस्तित्वात असल्याचे अभिकथन केले होते त्या दाव्यात प्रतिवादीच्या बाजूने झालेल्या हुकूमनाम्याचे अस्तित्व संबद्ध आहे, परंतु मार्गाधिकार अस्तित्वात असल्याचा तो निर्णायक पुरावा नाही.

**कलमे ३४, ३५ व ३६ यांमध्ये नमूद केलेल्याव्यतिरिक्त असे अन्य न्यायनिर्णय, इत्यादी केव्हा संबद्ध.**

**३७.** कलमे ३४,३५ व ३६ यांमध्ये नमूद केलेल्याव्यतिरिक्त असे अन्य न्यायनिर्णय किंवा आदेश किंवा हुकूमनामे असंबद्ध असतात, मात्र अशा न्यायनिर्णयाचे, आदेशाचे किंवा हुकूमनाम्याचे अस्तित्व हे वादतथ्य असेल किंवा या अधिनियमाच्या अन्य एखाद्या तरतुदीखाली संबद्ध असेल तर गोष्ट वेगळी.

**उदाहरणे.**

(क) ‘क’ व ‘ख’ यांच्यापैकी प्रत्येकाला दूषण लावणाऱ्या बदनामीकारक मजकुराबद्दल ते अलगअलगपणे ‘ग’ विरुद्ध दावा दाखल करतात. जे साहित्य बदनामीकारक असल्याचे अभिकथन करण्यात आले आहे ते खरे आहे असे प्रत्येक प्रकरणात ‘ग’ चे म्हणणे आहे आणि संभवतः, प्रत्येक प्रकरणात ते खरे असावे किंवा दोन्ही प्रकरणांत ते खरे नसावे अशी परिस्थिती आहे. आपल्या समर्थनासाठी दिलेले कारण शाबीत करण्याच्या कामी ‘ग’ अयशस्वी झाला आहे या कारणावरून ‘क’ हा ‘ग’ विरुद्ध नुकसानीचा हुकूमनामा मिळवतो. ‘ख’ व ‘ग’ यांच्या मधील हे तथ्य असंबद्ध आहे.

(ख) त्याच्याकडील गाय चोरल्याबद्दल ‘क’ हा, ‘ख’ वर फिर्याद लावतो. ‘ख’ ला दोषी ठरवण्यात येते. ‘ख’ ने त्याच्या दोषसिद्धीपूर्वी ‘ग’ ला विकलेल्या गायीसाठी नंतर ‘क’ हा ‘ग’ वर दावा लावतो, ‘क’ व ‘ग’ यांच्या मधील ‘ख’ विरोधी न्यायनिर्णय असंबद्ध आहे.

(ग) 'क' हा 'ख' विरुद्ध जमिनीच्या कब्जासाठी हुकूमनामा मिळवतो. त्याचा परिणाम म्हणून 'ख' चा मुलगा 'ग' हा 'क' चा खून करतो. गुन्ह्यामागील हेतूचे दर्शक म्हणून न्यायनिर्णयाचे अस्तित्व संबद्ध आहे.

(घ) 'क' वर चोरीचा व चोरीबद्दल पूर्वी त्याला दोषी ठरवण्यात आले असल्याचा दोषारोप आहे. आधीची दोषसिद्धी ही वादतथ्य म्हणून संबद्ध आहे.

(ङ) 'ख' चा खून केल्याबद्दल 'क' ची न्यायचौकशी होते. 'ख' ने 'क' वर बदनामीकारक मजकुराबद्दल फिर्याद लावली आणि 'क' ला दोषी ठरवण्यात येऊन शिक्षा देण्यात आली हे तथ्य हेतूचे दर्शक म्हणून वादतथ्याच्या दृष्टीने कलम ६ खाली संबद्ध आहे.

**न्यायनिर्णय मिळवताना कपट किंवा संगनमत झाल्याचे किंवा न्यायालय अक्षम असल्याचे शाबीत करता येईल.**

**३८.** दाव्यातील किंवा अन्य कार्यवाहीतील कोणताही पक्षकार, कलमे ३४, ३५ किंवा ३६ खाली जो कोणताही न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामा संबद्ध आहे, आणि जो विरुद्ध पक्षकाराने शाबीत केलेला आहे तो देण्यास सक्षम नसलेल्या न्यायालयाने तो दिला होता, अथवा कपटाने किंवा संगनमताने तो मिळवण्यात आला होता हे दाखवू शकेल.

## त्रयस्थ व्यक्तींची मते केव्हा संबद्ध

**तज्ज्ञांची मते.**

**३९.** (१) जेव्हा विदेशी कायद्याच्या किंवा शास्त्राच्या किंवा कलेच्या किंवा अन्य कोणत्याही क्षेत्राच्या एखाद्या मुद्याबाबत अथवा हस्ताक्षर किंवा बोटांचे ठसे हे तेच आहेत किंवा काय याबाबत न्यायालयाला मत बनवावयाचे असेल तेव्हा, अशा विदेशी कायद्यात, शास्त्रात किंवा कलेत किंवा अन्य कोणत्याही क्षेत्रात अथवा हस्ताक्षरांची किंवा बोटांच्या ठशांची ओळख पटवण्याच्या प्रश्नाबाबत विशेष कौशल्य संपादन केलेल्या व्यक्तींची त्या मुद्यावरील मते ही, संबद्ध तथ्ये असतात आणि अशा व्यक्तींना तज्ज्ञ असे म्हटले जाते.

### उदाहरणे.

(क) 'क' चा मृत्यू विषामुळे घडून आला होता किंवा कसे असा प्रश्न आहे, ज्या विषामुळे 'क' मृत्यू पावला असा समज आहे, त्या विषामुळे उद्‌भवलेल्या लक्षणाबाबतची तज्ज्ञांची मते संबद्ध आहे.

(ख) विवक्षित कृती करण्याच्या वेळी मनोविकलतेमुळे 'क' त्या कृतीचे स्वरूप जाणण्यास किंवा आपण जे करत आहोत ते चुकीचे किंवा बेकायदा आहे हे जाणण्यास अक्षम होता किंवा कसे हा प्रश्न आहे. 'क' च्या ठिकाणी दिसून आलेल्या लक्षणांवरून सर्वसामान्यपणे मनोविकलता दिसून येते किंवा कसे, अथवा सामान्यपणे अशा मनोविकलतेमुळे व्यक्ती, त्या आपण करत असलेल्या कृतीचे स्वरूप जाणण्यास अथवा आपण जे करत आहोत ते चुकीचे किंवा बेकायदा आहे हे जाणण्यास अक्षम होतात किंवा कसे या प्रश्नावरील तज्ज्ञांची मते संबद्ध आहेत.

(ग) विवक्षित दस्तऐवज 'क' ने लिहिला होता किंवा कसे हा प्रश्न आहे. 'क' ने लिहिला असल्याचे शाबीत किंवा कबूल करण्यात आले आहे असा दुसरा एक दस्तऐवज हजर करण्यात आला आहे. ते दोन दस्तऐवज एकाच व्यक्तीने लिहिले होते की वेगवेगळ्या व्यक्तींनी लिहिले होते या प्रश्नावरील तज्ज्ञांची मते संबद्ध आहेत.

(२) जेव्हा एखाद्या कार्यवाहीमध्ये, न्यायालयाला, कोणत्याही संगणक संसाधनामध्ये किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वरूपात पारेषित केलेल्या किंवा साठविलेल्या कोणत्याही माहितीशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबीवर मत बनवावयाचे असेल तेव्हा, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१) याच्या कलम ७९क मध्ये निर्दिष्ट केलेल्या इलेक्ट्रॉनिक साक्षीपुराव्याच्या परीक्षकाचे मत, संबध्द तथ्य असते.

**स्पष्टीकरण.–** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, इलेक्ट्रॉनिक साक्षीपुराव्याचा परीक्षक हा, एक तज्ज्ञ असेल.

**तज्ज्ञांच्या मतांशी संबंधित असणारी तथ्ये.**

४०. तज्ज्ञांची मते, संबद्ध असताना अन्यथा संबद्ध नसलेली तथ्ये जर अशा मतांना पुष्टी देत असतील किंवा त्यांच्याशी विसंगत असतील तर, ती तथ्ये संबद्ध असतात.

**उदाहरणे.**

(क) 'क' ला विवक्षित विषाची बाधा झाली होती किंवा कसे हा प्रश्न आहे. त्या विषाची बाधा झालेल्या अन्य व्यक्तींच्या ठिकाणी जी विवक्षित लक्षणे दिसून आली ती त्या विषबाधेची लक्षणे असल्याचे तज्ज्ञांनी प्रतिपादन केले किंवा नाकारले हे, तथ्य संबद्ध आहे.

(ख) बंदराला होणारा अडथळा समुद्रभिंतीमुळे उद्‌भवला आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. इतर बाबतीत तशाच प्रकारे वसलेली जी इतर बंदरे आहेत, परंतु जेथे अशा समुद्रभिंती नाहीत त्यांना त्याच सुमारास अडथळा होऊ लागला हे, तथ्य संबद्ध आहे.

**हस्ताक्षराबाबतचे किंवा स्वाक्षरीबाबतचे मत केव्हा संबद्ध.**

४१. (१) एखादा दस्तऐवज कोणत्या व्यक्तीने लिहिला असावा किंवा स्वाक्षरित केला असावा याबाबत जेव्हा न्यायालयाला मत बनवावयाचे असेल तेव्हा, ज्या व्यक्तीने तो लिहिला किंवा स्वाक्षरित केला असा समज आहे त्या व्यक्तीच्या हस्ताक्षराशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे, तो दस्तऐवज त्या व्यक्तीने लिहिला किंवा स्वाक्षरित केला होता किंवा नव्हता याविषयीचे मत हे, संबद्ध तथ्य असते.

**स्पष्टीकरण.**–जेव्हा एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला लिहिताना पाहिलेले असेल, अथवा स्वतः किंवा स्वतःच्या प्राधिकारान्वये त्या दुसऱ्या व्यक्तीला उद्देशून लिहिलेल्या दस्तऐवजांच्या उत्तरादाखल तिच्याकडे त्या दुसऱ्या व्यक्तीने लिहिलेले असल्याचे दिसणारे दस्तऐवज आलेले असतील, अथवा सामान्य व्यवहारक्रमानुसार तिच्याकडे त्या दुसऱ्या व्यक्तीने लिहिले असल्याचे दिसणारे दस्तऐवज नेहमी सादर करण्याचा शिरस्ता असेल तेव्हा, ती व्यक्ती, त्या दुसऱ्या व्यक्तीच्या हस्ताक्षराशी परिचित आहे असे म्हणतात.

**उदाहरण.**

अमुक एक पत्र 'क' या इटानगरमधील व्यापाऱ्याच्या हस्ताक्षरातील आहे किंवा कसे हा प्रश्न आहे. 'ख' हा बेंगळूरुमधील व्यापारी असून, त्याने 'क' ला उद्देशून पत्रे लिहिलेली आहेत आणि 'क' ने लिहिली असल्याचे दिसणारी पत्रे त्याला आलेली आहेत. 'ग' हा 'ख' चा कारकून असून, 'ख' ची पत्रे तपासून ती दप्तरदाखल करणे हे त्याचे काम होते. 'घ' हा 'ख' चा दलाल आहे व 'क' ने 'ख' ला त्याबाबत सल्लामसलत करण्यासाठी जी पत्रे लिहिली असल्याचे दिसते ती पत्रे नेहमी 'घ' ला सादर करण्याचा 'ख' चा शिरस्ता होता. 'ख', 'ग' आणि 'घ' यांनी 'क' ला लिहिताना पाहिले नसले तरी, ते पत्र 'क' च्या हस्ताक्षरात आहे किंवा कसे या प्रश्नावरील 'ख', 'ग' आणि 'घ' यांची मते संबद्ध आहेत.

(२) जेव्हा न्यायालयास, कोणत्याही व्यक्तीच्या इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीच्या संबंधी मत बनवयाचे असते तेव्हा, इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी प्रमाणपत्र ज्याने दिलेले आहे, त्या प्रमाणन प्राधिकरणाचे मत हे संबध्द तथ्य असते.

**सर्वसाधारण रुढीच्या किंवा हक्काच्या अस्तित्वाबाबतचे मत केव्हा संबद्ध.**

४२. कोणत्याही सर्वसाधारण रूढीच्या किंवा हक्काच्या अस्तित्वाबाबत जेव्हा न्यायालयाला मत बनवायचे असेल तेव्हा, अशी रूढी किंवा असा हक्क अस्तित्वात असल्यास त्यांचे अस्तित्व ज्यांना ज्ञात असण्याचा संभव असेल त्या व्यक्तींची, अशा रूढीच्या किंवा हक्काच्या अस्तित्वाबाबतची मते संबद्ध असतात.

**स्पष्टीकरण.**—"सर्वसाधारण रूढी किंवा हक्क" या शब्दप्रयोगात, ज्या वर्गातील व्यक्तींची संख्या लक्षणीय असेल अशा कोणत्याही व्यक्तींच्या वर्गात प्रचलित असलेल्या रूढींचा किंवा हक्कांचा समावेश होतो.

**उदाहरण.**

विशिष्ट विहिरीचे पाणी वापरण्याचा विशिष्ट गावाच्या गावकऱ्यांचा हक्क हा, या कलमाच्या अर्थानुसार सर्वसाधारण हक्क आहे.

**परिपाठ, तत्वप्रणाली, इत्यादींसंबंधीचे मत केव्हा संबद्ध.**

४३. जेव्हा न्यायालयास,-

(एक) कोणत्याही लोकसमुहाचे किंवा घराण्याचे परिपाठ व तत्वप्रणाली;

(दोन) कोणत्याही धार्मिक किंवा धर्मादायी प्रतिष्ठानाची घटना व प्रशासन; किंवा

(तीन) विशिष्ट जिल्ह्यांमध्ये किंवा विशिष्ट लोकवर्गांमध्ये वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा किंवा संज्ञांचा अर्थ,

यासंबंधात मत बनवावयाचे असेल तेव्हा, ते जाणून घेण्याची विशेष साधने असलेल्या व्यक्तींची मते ही, संबद्ध तथ्ये असतात.

**नात्याबाबतचे मत केव्हा संबद्ध.**

४४. एखाद्या व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीशी जे नाते आहे त्याबाबत जेव्हा न्यायालयात मत बनवावयाचे असेल तेव्हा, त्या कुटुंबाची सदस्य म्हणून किंवा अन्यथा ज्या कोणत्याही व्यक्तीला अशा नात्याचे अस्तित्व जाणून घेण्याची विशेष साधने, उपलब्ध होती तिच्या वर्तनाद्वारे व्यक्त झालेले तिचे त्या विषयावरील मत हे, संबद्ध तथ्य असते :

परंतु, भारतीय घटस्फोट अधिनियम, १८६९ (१८६९ चा ४) याखालील कार्यवाहींमध्ये, किंवा भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याची कलमे ८२ व ८४ या खालील खटल्यामध्ये विवाह शाबीत करण्यासाठी असे मत पुरेसे असणार नाही.

**उदाहरणे.**

(क) 'क' व 'ख' हे विवाहबद्ध झाले होते किंवा कसे हा प्रश्न आहे. त्यांची मित्रमंडळी त्यांना दांपत्य समजून त्याप्रमाणे त्यांच्याशी वागत होती हे तथ्य संबद्ध आहे.

(ख) 'क' हा 'ख' चा औरस मुलगा होता किंवा कसे असा प्रश्न आहे. 'क' ला नेहमी त्या कुटुंबातील सदस्य या नात्याने वागविले जात होते हे तथ्य संबद्ध आहे.

**मतामागील आधार कारणे केव्हा संबद्ध.**

४५. जेव्हा जेव्हा कोणत्याही हयात व्यक्तीचे मत संबद्ध असते तेव्हा, ज्या आधार कारणांवर असे मत आधारलेले असेल ती कारणे देखील संबद्ध असतात.

**उदाहरण.**

एखादा तज्ज्ञ, त्याचे मत बनवण्यासाठी त्याने केलेल्या प्रयोगांचा वृत्तांत देऊ शकेल.

## चारित्र्य केव्हा संबद्ध

**ज्या वर्तनाचा आरोप केला असेल ते शाबीत करण्याच्या दृष्टीने दिवाणी प्रकरणांमध्ये चारित्र्य असंबद्ध.**

४६. दिवाणी प्रकरणांमध्ये, कोणत्याही सबंधित व्यक्तीवर ज्या कोणत्याही वर्तनाचा आरोप करण्यात आला ते वर्तन ज्यामुळे संभाव्य किंवा असंभाव्य ठरते असे तिचे चारित्र्य आहे हे तथ्य असंबद्ध असते. मात्र अन्यथा, संबद्ध असलेल्या तथ्यांवरून तिचे जे चारित्र्य दिसते ते तेवढ्यापुरते संबद्ध असते.

**फौजदारी प्रकरणांमध्ये चांगले पूर्वचारित्र्य संबद्ध.**

४७. फौजदारी प्रकरणांमध्ये, आरोपी व्यक्ती चांगल्या चारित्र्याची आहे हे तथ्य संबद्ध असते.

**४८.** भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याचे कलम ६४, कलम ६५, कलम ६६, कलम ६७, कलम ६८, कलम ६९, कलम ७०, कलम ७१, कलम ७४, कलम ७५, कलम ७६, कलम ७७ किंवा कलम ७८ या खालील अपराधांच्या किंवा जेथे संमतीचा प्रश्न हा, वादप्रश्न असेल तेथे, असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न केल्याबद्दलच्या खटल्यात, पीडित व्यक्तीच्या चारित्र्यासंबंधीचा पुरावा किंवा अशा व्यक्तीने अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर पूर्वी लैंगिक अनुभव घेतल्याचा पुरावा हा, अशा संमतीच्या किंवा संमतीच्या गुणवत्तेच्या प्रश्नावर संबद्ध असणार नाही.

**विशिष्ट प्रकरणांमध्ये पूर्व चारित्र्याचा किंवा पूर्वीचा लैंगिक अनुभव याचा पुरावा संबद्ध नसणे.**

**४९.** फौजदारी कार्यवाहीमध्ये, आरोपीचे चारित्र्य वाईट आहे हे तथ्य, ज्या प्रकरणांमध्ये ते संबध्द असते त्या प्रकरणामध्ये त्याचे चारित्र्य चांगले आहे असा पुरावा देण्यात आलेला नसेल तर, असंबद्ध असते.

**उत्तरादाखल संबद्ध असेल ते खेरीज करून एरव्ही, वाईट पूर्वचारित्र्य संबद्ध नाही.**

**स्पष्टीकरण १.—**ज्या प्रकरणामध्ये कोणत्याही व्यक्तीचे वाईट चारित्र्य हेच वादतथ्य असेल त्या प्रकरणांना हे कलम लागू नाही.

**स्पष्टीकरण २.—**पूर्व दोषसिद्धी ही, वाईट चारित्र्याचा पुरावा म्हणून संबद्ध आहे.

**५०.** दिवाणी प्रकरणामध्ये, कोणत्याही व्यक्तीचे चारित्र्य असे असते की, त्यामुळे तिला जी मिळावयास हवी होती त्या नुकसानीच्या रकमेवर परिणाम होऊ शकतो हे तथ्य, संबद्ध आहे.

**नुकसानीवर परिणाम करणारे चारित्र्य.**

**स्पष्टीकरण.—** या कलमामधील व कलमे ४६, ४७ व ४९ यांमधील, "चारित्र्य" या शब्दात, लौकिक व मनोवृत्ती या दोन्हींचा समावेश होतो; परंतु, कलम ४९ मध्ये तरतूद केली असेल त्या खेरीज, सर्वसाधारण लौकिकाचा व सर्वसाधारण मनोवृत्तीचाच केवळ पुरावा देता येईल, मात्र, ज्या विशिष्ट कृतींद्वारे लौकिक किंवा मनोवृत्ती दर्शविण्यात आली असेल त्या कृतींचा पुरावा देता येणार नाही.

## भाग तीन

## शाबितीविषयी

प्रकरण तीन

### जी शाबीत करण्याची गरज नाही अशी तथ्ये.

**न्यायिक दखल घेण्याजोगे तथ्य शाबीत करण्याची आवश्यकता नाही.**

**५१.** न्यायालय, ज्या तथ्याची न्यायिक दखल घेईल असे कोणतेही तथ्य शाबीत करण्याची आवश्यकता नाही.

**न्यायालय ज्यांची न्यायिक दखल घेईल अशी तथ्ये.**

**५२.** (१) न्यायालय, पुढील तथ्यांची न्यायिक दखल घेईल :—

(क) राज्यक्षेत्रबाह्य प्रवर्तन असणाऱ्या कायद्यांसह भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे;

(ख) भारताने अन्य देशाबरोबर किंवा देशांबरोबर केलेली आंतरराष्ट्रीय संधी, करार किंवा अभिसंधी किंवा आंतरराष्ट्रीय अधिसंघ किंवा अन्य संस्था येथे भारताने केलेले निर्णय;

(ग) भारताच्या संविधान सभेच्या, भारताच्या संसदेच्या आणि राज्य विधानमंडळांचा कामकाजाचा क्रम;

(घ) सर्व न्यायालयांच्या व न्यायाधिकरणांच्या मुद्रा;

(ङ) नाविक व सागरी अधिकारक्षेत्राच्या न्यायालयांच्या, लेख प्रमाणकाच्या मुद्रा, आणि संविधानाद्वारे किंवा संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळांच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतामध्ये कायद्याचा अंमल असणाऱ्या विनियमांद्वारे वापर करण्यास ज्यांना प्राधिकृत केले आहे अशा कोणत्याही व्यक्तींच्या मुद्रा;

(च) त्या त्या वेळी कोणत्याही राज्यातील कोणतेही सार्वजनिक पद भूषविणाऱ्या व्यक्तींची अशा पदावर नियुक्ती झाल्याचे कोणत्याही **राजपत्रात** अधिसूचित केले असेल तर, त्यांचे पदग्रहण, त्यांची नावे, नामाभिधाने, कार्ये व स्वाक्षऱ्या ;

(छ) भारत सरकारने मान्यता दिलेल्या प्रत्येक देशाचे किंवा सार्वभौमत्वाचे अस्तित्व, नामाभिधान व राष्ट्रीय ध्वज;

(ज) काल विभाग, जगाचे भौगोलिक विभाग, आणि **राजपत्रात** अधिसूचित केलेले सार्वजनिक उत्सव, उपवास दिन व सुट्या ;

(झ) भारताचे राज्यक्षेत्र ;

(ञ) भारत सरकार आणि अन्य कोणताही देश किंवा व्यक्तींचा निकाय यांच्यामधील शत्रूत्व सुरू होणे, ते चालू राहाणे व ते समाप्त होणे ;

(ट) न्यायालयाच्या सदस्यांची व अधिकाऱ्यांची आणि त्यांच्या प्रतिनियुक्तांची व दुय्यम अधिकाऱ्यांची व सहायकांची, आणि तसेच न्यायालयाच्या आदेशिकेच्या अंमलबजावणीचे कार्य करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची, आणि अधिवक्त्यांची आणि त्याच्यासमोर उपस्थित होण्यास किंवा काम चालवण्यास कायद्याने प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्तींची नावे;

(ठ) जमिनीवरील किंवा समुद्रावरील वाहतुकीचा नियम.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व प्रकरणांमधील आणि लोक इतिहास, साहित्य, शास्त्र किंवा कला यांच्या सर्व बाबींवरील देखील, न्यायालय, आपल्या कामाच्या सौकर्यासाठी संदर्भ

म्हणून योग्य पुस्तकांचा किंवा दस्तऐवजांचा आधार घेऊ शकेल आणि कोणत्याही तथ्याची न्यायिक दखल घेण्याबाबत कोणत्याही व्यक्तीने न्यायालयास विनंती केली तर, तशी दखल घेणे शक्य होण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल असे कोणतेही पुस्तक किंवा दस्तऐवज अशा व्यक्तीने हजर केले नाही तर व तोपर्यंत, तशी दखल घेण्यास ते नकार देऊ शकेल.

**कबूल केलेली तथ्ये शाबीत करण्याची गरज नाही.**

**५३.** कोणत्याही कार्यवाहीतील पक्षकारांनी किंवा त्यांच्या अभिकर्त्यांनी सुनावणीच्या वेळी जे तथ्य कबूल करण्यास होकार दिला असेल, किंवा जे कबूल करण्यास सुनावणीपूर्वी त्यांनी कोणत्याही स्वःहस्ताक्षरित लेखाद्वारे होकार दिला असेल किंवा वादकथनाबाबत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही नियमानुसार त्यांनी आपल्या वादकथनांद्वारे जे कबूल केले असल्याचे मानण्यात आले असेल असे कोणतेही तथ्य, शाबीत करण्याची आवश्यकता नाही :

परंतु, कबूल केलेली तथ्ये, अशा कबुल्यांद्वारे नव्हे, तर अन्य प्रकारे शाबीत करणे हे न्यायालय स्वविवेकानुसार आवश्यक करू शकेल.

प्रकरण चार

## तोंडी पुराव्याविषयी

**तोंडी पुराव्याने तथ्यांची शाबिती.**

**५४.** दस्तऐवजांच्या मजकुराखेरीज सर्व तथ्ये, तोंडी पुराव्याने शाबीत करता येतील.

**तोंडी पुरावा प्रत्यक्ष असावा.**

**५५.** ज्या कोणत्याही असतील अशा सर्व प्रकरणी, तोंडी पुरावा प्रत्यक्ष असावा ; जर, –

(एक) जे पाहता येणे शक्य असते अशा तथ्याचा त्यामध्ये निर्देश असेल तर, तो पुरावा म्हणजे आपण ते पाहिले अशी साक्षीदाराने दिलेली साक्ष असली पाहिजे ;

(दोन) जे ऐकणे शक्य असते अशा तथ्याचा त्यामध्ये निर्देश असेल तर, तो पुरावा म्हणजे आपण ते ऐकले अशी साक्षीदाराने दिलेली साक्ष असली पाहिजे;

(तीन) अन्य कोणत्याही इंद्रियाने किंवा अन्य कोणत्याही रीतीने ज्याचे ज्ञान होऊ शकते अशा तथ्याचा त्यात निर्देश असेल तर, तो पुरावा म्हणजे त्या इंद्रियाद्वारे किंवा त्या रीतीने त्याचे ज्ञान स्वतःला झाले अशी साक्षीदाराने दिलेली साक्ष असली पाहिजे;

(चार) एखाद्या मताचा किंवा ज्यांवर ते मत आधारलेले आहे त्या आधारकारणांचा त्यात निर्देश असेल तर, तो पुरावा म्हणजे त्या आधारकारणांवर आपले मत आधारलेले आहे अशी त्या साक्षीदाराने दिलेली साक्ष असली पाहिजे :

परंतु, सामान्यतः, विक्रीस ठेवण्यात येणाऱ्या कोणत्याही विवेचक ग्रंथात व्यक्त केलेली तज्ज्ञांची मते, आणि ज्यांच्या आधारावर अशी मते बनवण्यात आली ती आधारकारणे, जर लेखक मृत झाला असेल, किंवा त्याचा शोध लागत नसेल, किंवा तो साक्ष देण्यास असमर्थ झाला असेल, किंवा न्यायालयाला गैरवाजवी वाटेल इतका विलंब किंवा खर्च झाल्याशिवाय त्याला साक्षीदार म्हणून बोलावणे शक्य नसेल तर, असे विवेचक ग्रंथ हजर करून शाबीत करता येतील :

परंतु आणखी असे की, जर तोंडी पुराव्यात, दस्तऐवजा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मूर्त वस्तूच्या अस्तित्वाचा किंवा स्थितीचा निर्देश असेल तर, न्यायालय, त्याला योग्य वाटल्यास, अशी मूर्त वस्तू आपल्या निरीक्षणासाठी हजर करण्यास फर्मावू शकेल.

प्रकरण पाच

## लेखी पुराव्याविषयी

**दस्तऐवजांतील मजकुराची शाबिती.**

**५६.** दस्तऐवजांतील मजकूर, अव्वल किंवा दुय्यम पुराव्याद्वारे शाबीत करता येईल.

**अव्वल पुरावा.**

**५७.** 'अव्वल पुरावा' याचा अर्थ, न्यायालयाच्या निरीक्षणार्थ हजर करण्यात आलेला खुद्द तो दस्तऐवज, असा आहे.

**स्पष्टीकरण १.–** जेव्हा दस्तऐवज अनेक भागांत निष्पादित केला असेल तेव्हा, दस्तऐवजाचा प्रत्येक भाग हा अव्वल पुरावा असतो.

**स्पष्टीकरण २.–** जेव्हा दस्तऐवज प्रतिलेखामध्ये निष्पादित केलेला असून, प्रत्येक प्रतिलेख पक्षकारांपैकी फक्त एका किंवा काही पक्षकारांनीच केवळ निष्पादित केलेला असतो तेव्हा, प्रत्येक प्रतिलेख हा, तो निष्पादित करणाऱ्या पक्षकारांपुरता अव्वल पुरावा असतो.

**स्पष्टीकरण ३.–** मुद्रणाच्या, शिळामुद्रणाच्या किंवा छायाचित्रणाच्या कार्यपद्धतीप्रमाणे, अनेक दस्तऐवज, सर्वच्या सर्व एकाच एकरुप प्रक्रियेने तयार करण्यात आले असतील तेव्हा, प्रत्येक दस्तऐवज बाकीच्या दस्तऐवजांतील मजकुराचा अव्वल पुरावा असतो; परंतु, जेव्हा ते दस्तऐवज, एकाच मूळलेखाच्या सर्व नकला असतात त्या तेव्हा, मूळलेखाच्या मजकुराचा अव्वल पुरावा नसतात.

**स्पष्टीकरण ४.–** जेव्हा एखादा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेख तयार केला जातो किंवा साठविला जातो, आणि एकाच वेळी किंवा क्रमशः बहुविध फायलींमध्ये अशी साठवणूक केली जाते तेव्हा, अशी प्रत्येक फाईल ही,अव्वल पुरावा असते.

**स्पष्टीकरण ५.–**जेव्हा एखादा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेख, योग्य अभिरक्षेमधून सादर केला जातो तेव्हा, जर तो विवादित नसेल तर, असा इलेक्ट्रॉनिक व डिजिटल अभिलेख हा, अव्वल पुरावा असतो.

**स्पष्टीकरण ६.—** जेव्हा एखादे दृक अभिलेखन, एकाच वेळी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठविले जाते व पारेषित केले जाते किंवा प्रसारण केले जाते किंवा दुसऱ्याकडे हस्तांतरित केले जाते तेव्हा, असे साठविलेले प्रत्येक अभिलेखन हे,अव्वल पुरावा असते.

**स्पष्टीकरण ७.—** जेव्हा एखादा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेख, संगणक संसाधनामधील बहुविध साठवण जागेंमध्ये साठविला जातो तेव्हा, तात्पुरत्या फायलींसह अशी प्रत्येक स्वयंचलित साठवणूक, अव्वल पुरावा असते.

**उदाहरण.**

एका व्यक्तीच्या कब्जात अनेक घोषणापत्रके असून ती सर्व एका मूळलेखावरून एकाच वेळी छापलेली आहेत असे दाखवण्यात आले आहे. घोषणापत्रकांपैकी कोणतेही घोषणापत्रक हे अन्य कोणत्याही घोषणापत्रकावरील मजकुराचा अव्वल पुरावा आहे, परंतु, त्यांच्यापैकी कोणतेही घोषणापत्रक मूळ घोषणापत्रकावरील मजकुराचा अव्वल पुरावा नाही.

**दुय्यम पुरावा.**

**५८.** 'दुय्यम पुरावा' यामध्ये,–

(एक) यात यापुढे अंतर्भूत असलेल्या तरतुदींखाली दिलेल्या प्रमाणित प्रती ;

(दोन) ज्या प्रती मूळलेखावरून यांत्रिक प्रक्रियांनी तयार केलेल्या असल्यामुळेच अचूक असण्याची सुनिश्चिती होते त्या प्रती आणि अशा प्रतींशी ताडून पाहिलेल्या प्रती ;

(तीन) मूळलेखावरून केलेल्या किंवा त्याच्याशी ताडून पाहिलेल्या प्रती ;

(चार) दस्तऐवजांचे प्रतिलेख ज्या पक्षकारांनी निष्पादित केले नसतील त्यांच्यापुरते ते प्रतिलेख ;

(पाच) एखादा दस्तऐवज ज्या व्यक्तीने स्वतः पाहिलेला असेल त्या व्यक्तीने दिलेले त्यातील मजकुराचे तोंडी निवेदन;

(सहा) तोंडी कबुल्या;

(सात) लेखी कबुल्या;

(आठ) ज्याच्या मूळ लेखामध्ये असंख्य निवेदने अंतर्भूत आहेत अशा दस्तऐवजाची किंवा ज्यांची सोयीस्करपणे न्यायालयात तपासणी केली जाऊ शकत नाही अशा अन्य दस्तऐवजांची जिने तपासणी केली आहे, आणि जी अशा दस्तऐवजांची तपासणी करण्यामध्ये कुशल आहे अशा व्यक्तीचा पुरावा,

यांचा समावेश होतो;

**उदाहरणे.**

(क) मूळलेख व त्याचे छायाचित्र ही दोन्ही ताडून पाहिली नसली तरीही, ज्याचे छायाचित्र काढले तोच मूळलेख होता असे शाबीत करण्यात आले तर, ते मूळलेखाचे छायाचित्र हा, त्याच्या मजकुराचा दुय्यम पुरावा असतो.

(ख) जर प्रतयंत्राद्वारे बनविलेली एखाद्या पत्राची प्रत ही, मूळलेखापासून बनविलेली होती हे सिद्ध झाले तर, त्या प्रतयंत्रावरून बनवलेल्या प्रतीशी ताडून पाहिलेली प्रत हा, त्या मजकुराचा दुय्यम पुरावा असतो.

(ग) प्रतीची नक्कल करून बनविलेली परंतु, नंतर मूळलेखाबरोबर ताडून पाहिलेली प्रत, दुय्यम पुरावा असते; परंतु जिच्यापासून नक्कल बनविलेली होती ती प्रत मूळलेखाबरोबर ताडून पाहिलेली असली तरी याप्रमाणे पडताळणी न केलेली प्रत ही, मूळलेखाचा दुय्यम पुरावा होत नाही.

(घ) मूळलेखाशी ताडून पाहिलेल्या प्रतीतील मजकुराचे तोंडी निवेदन, तसेच, मूळलेखाच्या छायाचित्रातील किंवा यंत्राने काढलेल्या प्रतीतील मजकुराचे तोंडी निवेदन हा, मूळलेखाचा दुय्यम पुरावा होत नाही.

**५९.** यात यापुढे नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये असेल त्या खेरीज, दस्तऐवज, अव्वल पुराव्याने शाबीत करण्यात येतील. **अव्वल पुराव्याने दस्तऐवजांची शाबिती.**

**६०.** पुढील प्रकरणांमध्ये दस्तऐवजाच्या अस्तित्वाचा, स्थितीचा किंवा मजकुराचा दुय्यम पुरावा देता येईल :– **ज्या प्रकरणी दस्तऐवजांसंबंधीचा दुय्यम पुरावा देता येईल अशी प्रकरणे.**

(क) जेव्हा मूळलेख–

(एक) ज्या व्यक्तिविरुद्ध दस्तऐवज शाबीत करावयाचा आहे तिच्या; अथवा

(दोन) जी व्यक्ती त्या न्यायालयाच्या आदेशिकेच्या कक्षेबाहेर आहे किंवा त्या आदेशिकेच्या अधीन नाही तिच्या; अथवा

(तीन) जी व्यक्ती, तो दस्तऐवज हजर करण्यास विधितः बांधलेली आहे तिच्या, कब्जात किंवा अधिकाराखाली असल्याचे दर्शविण्यात आले असेल किंवा तसे दिसत असेल तेव्हा, आणि कलम ६४ मध्ये नमूद केलेली नोटीस देण्यात आल्यानंतर, अशी व्यक्ती तो हजर करीत नसेल तेव्हा;

(ख) ज्या व्यक्तीच्या विरुद्ध तो दस्तऐवज शाबीत करण्यात यावयाचा आहे त्या व्यक्तीने किंवा तिच्या हितसंबंध- प्रतिनिधीने मूळलेखाचे अस्तित्व, स्थिती किंवा मजकूर लेखी कबूल केला असल्याचे शाबीत करण्यात आले असेल तेव्हा ;

(ग) मूळलेख नष्ट किंवा गहाळ झालेला असेल, अथवा त्यातील मजकुराचा पुरावा देऊ पाहणारा पक्षकार त्याच्या स्वतःच्या कसुरीमुळे किंवा हयगयीमुळे नव्हे तर अन्य कारणामुळे, तो वाजवी कालावधीत हजर करू शकत नसेल तेव्हा;

(घ) मूळलेख सहजगत्या हलविण्यासारखा नाही अशा स्वरुपाचा असेल तेव्हा;

(ङ) मूळलेख कलम ७४ च्या अर्थानुसार सार्वजनिक दस्तऐवज असेल तेव्हा;

(च) मूळलेख हा, या अधिनियमानुसार किंवा भारतात अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यानुसार पुराव्यात ज्याची प्रमाणित प्रत देण्यास मुभा आहे असा दस्तऐवज असेल तेव्हा;

(छ) मूळलेखांमध्ये बऱ्याच निवेदनांचा किंवा अन्य दस्तऐवजांचा अंतर्भाव असून जे न्यायालयात सोयीस्करपणे तपासणे शक्य नसेल, आणि शाबीत करावयाचे तथ्य हे, संपूर्ण संकलनाची एकंदर निष्पत्ती असेल तेव्हा;

**स्पष्टीकरण.—**

(एक) खंड (क),(ग) व (घ) च्या प्रयोजनार्थ, दस्तऐवजाच्या मजकुराचा कोणताही दुय्यम पुरावा ग्राह्य असतो;

(दोन) खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, लेखी कबुली ग्राह्य असते;

(तीन) खंड (ङ) किंवा (च) च्या प्रयोजनार्थ, दस्तऐवजाची प्रमाणित प्रत ग्राह्य असते, परंतु, अन्य कोणत्याही प्रकारचा दुय्यम पुरावा ग्राह्य नसतो;

(चार) खंड (छ) च्या प्रयोजनार्थ, ज्या कोणत्याही व्यक्तीने ते दस्तऐवज तपासले आहेत, आणि असे दस्तऐवज तपासण्यात जी कुशल आहे, त्या व्यक्तीला दस्तऐवजांच्या एकंदर निष्पत्तीसंबंधी पुरावा देता येईल.

**इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेख.**

**६१.** या अधिनियमातील कोणतीही गोष्ट,तो इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेख आहे या कारणावरून इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेखाच्या पुराव्या दाखल स्वीकारण्यास नकार देण्यासाठी लागू असणार नाही आणि अशा अभिलेखास, कलम ६३ ला अधीन राहून, इतर दस्तऐवजाप्रमाणे तसाच कायदेशीर प्रभाव, वैधता व अंमलबजावणी क्षमता असेल.

**इलेक्ट्रॉनिक अभिलेखांशी संबंधित असणाऱ्या पुराव्या संबंधीच्या विशेष तरतुदी.**

**६२.** इलेक्ट्रॉनिक अभिलेखामधील मजकूर, कलम ६३ मधील तरतुदींनुसार शाबीत करता येईल.

**इलेक्ट्रॉनिक अभिलेखांची स्वीकार्यता.**

**६३.** (१) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जो कागदावर मुद्रित केलेला आहे, जो संगणकाद्वारे किंवा कोणत्याही संदेशवहन साधनाद्वारे तयार केला आहे असा ऑप्टिकलमध्ये किंवा मॅग्नेटिक मिडियामध्ये किंवा सेमीकंडक्टर मेमरीमध्ये साठविलेला आहे, अभिलेखन केलेला आहे किंवा प्रतिलिपीत केलेला आहे, अथवा अन्यथा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात (यात यापुढे ज्याचा निर्देश, "संगणक आउटपुट" असा करण्यात आला आहे) साठविलेला आहे, अभिलेखन केला आहे किंवा प्रतिलिपीत केलेला आहे अशा इलेक्ट्रॉनिक अभिलेखांमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही माहिती देखील, जर ती प्रश्नास्पद माहितीच्या किंवा संगणकाच्या संबंधात, या कलमामध्ये नमूद केलेल्या शर्तींची पूर्तता

करीत असेल तर, दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल, आणि, आणखी पुराव्याशिवाय, किंवा साक्षीपुरावा म्हणून मूळलेख सादर केल्याशिवाय, अथवा मूळ लेखाच्या किंवा ज्याचा प्रत्यक्ष साक्षीपुरावा स्वीकारता येईल अशा त्यात नमूद केलेल्या कोणत्याही तथ्याच्या कोणत्याही मजकुराशिवाय, कोणत्याही कार्यवाहीमध्ये स्वीकारण्यायोग्य असेल.

(२) संगणक आऊटपुटच्या बाबतीत, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शर्ती, पुढीलप्रमाणे असतील :–

(क) माहिती अंतर्भूत असलेला संगणक आऊटपुट, संगणकाचा किंवा संदेशवहन साधनाचा वापर करण्यावर कायदेशीर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीने त्या कालावधीत नियमितपणे केलेल्या कोणत्याही कार्याच्या प्रयोजनांसाठी, माहिती तयार करण्याकरिता, ती पाठवण्याकरिता किंवा तिच्यावर प्रक्रिया करण्याकरिता ज्या कालावधीत संगणक किंवा संदेशवहन साधन नियमितपणे वापरले जात होते त्या कालावधीमध्ये संगणकाद्वारे किंवा संसूचन साधनाद्वारे तयार केला जात होता;

(ख) उक्त कालावधीमध्ये, इलेक्ट्रॉनिक अभिलेखांमध्ये अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची किंवा अशी अंतर्भूत केलेली माहिती ज्यामधून प्राप्त केली असेल त्या प्रकारची माहिती,उक्त कार्यांच्या सामान्य क्रमामध्ये, संगणकामध्ये किंवा संदेशवहन साधनामध्ये नियमितपणे संकलित केली जात होती;

(ग) उक्त कालावधीतील महत्त्वाच्या भागामध्ये, संगणक किंवा संदेशवहन साधन योग्य प्रकारे चालविले जात होते, अथवा जर चालविले जात नसेल तर, ज्या कालावधीमध्ये ते योग्य प्रकारे चालविले जात नव्हते किंवा त्या कालावधीच्या भागामध्ये नादुरुस्त होते अशा कोणत्याही कालावधीच्या बाबतीत, ज्यामुळे इलेक्ट्रॉनिक अभिलेखावर किंवा त्याच्या मजकुराच्या अचूकतेवर परिणाम झाला असता असे नव्हते; आणि

(घ) इलेक्ट्रॉनिक अभिलेखात अंतर्भूत असलेली माहिती, उक्त कार्यांच्या सामान्य क्रमामध्ये संगणकामध्ये किंवा संदेशवहन साधनांमध्ये संकलित केलेल्या अशा माहितीतून पुन्हा केलेली किंवा प्राप्त केलेली आहे.

(३) जेव्हा कोणत्याही कालावधीमध्ये, पोट-कलम (२) च्या खंड (क) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत नियमितपणे केलेल्या कोणत्याही कार्याच्या प्रयोजनांसाठी माहिती तयार करण्याचे, ती साठविण्याचे किंवा तिच्यावर प्रक्रिया करण्याचे काम, एक किंवा अधिक संगणकाद्वारे किंवा संदेशवहन साधनाद्वारे नियमितपणे केले जात असेल, मग ते,–

(क) स्वयंपूर्ण मार्गाने (स्टँड अलोन मोड); किंवा

(ख) संगणक प्रणालीवर; किंवा

(ग) संगणक जालावर (नेटवर्कवर); किंवा

(घ) माहिती निर्माण करण्यास समर्थ असणाऱ्या किंवा माहिती प्रक्रिया किंवा साठवण करण्याची तरतूद असणाऱ्या संगणक संसाधनावर; किंवा

(ङ) मध्यस्थ यंत्रणेमार्फत,

केले जात असो,- त्या बाबतीत, त्या कालावधीमध्ये त्या प्रयोजनासाठी वापरलेले सर्व संगणक किंवा संदेशवहन साधने ही, या कलमाच्या प्रयोजनार्थ, एकल संगणक किंवा संदेशवहन साधन म्हणून समजण्यात येतील; आणि या कलमामधील संगणकाच्या किंवा संदेशवहन साधनाच्या निर्देशांचा, त्यानुसार अन्वयार्थ लावण्यात येईल.

(४) जेव्हा या कलमाच्या आधारे पुराव्या दाखल एखादे कथन करण्याची इच्छा असेल तेव्हा, कोणत्याही कार्यवाहीमध्ये, पुढीलपैकी कोणत्याही गोष्टी करणारे प्रमाणपत्र, जेव्हा ते कबुलीसाठी सादर केले जाते तेव्हा, अशा प्रत्येक प्रसंगी, इलेक्ट्रॉनिक अभिलेखासोबत सादर करण्यात येईल :–

(क) कथन अंतर्भूत असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक अभिलेखाची ओळख पटविणारे आणि ज्या रीतीने ते तयार केले होते ती रीत वर्णन करणारे;

(ख) पोट-कलम (३) च्या खंड (क) ते (ङ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संगणकाद्वारे किंवा संदेशवहन साधनाद्वारे इलेक्ट्रॉनिक अभिलेख तयार केला होता हे दाखविण्याच्या प्रयोजनासाठी यथोचित असेल असा तो इलेक्ट्रॉनिक अभिलेख तयार करण्यामध्ये सहभागी असलेल्या कोणत्याही साधनाचा असा तपशील देणारे;

(ग) पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या शर्ती ज्या बाबींशी संबंधित असतील त्या बाबींपैकी कोणत्याही बाबींशी संबंधित असणारे,

आणि संगणकाचा किंवा संदेशवहन साधनाचा अथवा संबंधित कार्यांच्या व्यवस्थापनाचा (जेथे लागू असेल तेथे) प्रभारी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने व तज्ज्ञाने स्वाक्षरी केल्याचे अभिप्रेत असणारे प्रमाणपत्र, प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही बाबीचा साक्षीपुरावा असेल; आणि या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणपत्रामध्ये ती नमूद करणाऱ्या व्यक्तीच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे नमूद करावयाच्या बाबीसाठी ते पुरेसे असेल.

(५) या कलमाच्या प्रयोजनांसाठी,–

(क) जर माहिती, कोणत्याही यथोचित नमुन्यामध्ये पुरविली जात असेल तर आणि मग ती अशा प्रकारे प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही यथोचित साधनसामग्रीच्या साधनांद्वारे (मानवी हस्तक्षेपासह किंवा त्याशिवाय) पुरविली जात असो,- संगणकाला किंवा संदेशवहन साधनाला माहिती पुरविले असल्याचे समजण्यात येईल.

(ख) संगणक आउटपुट, संगणकाद्वारे किंवा संदेशवहन साधनाद्वारे, उत्पादित करण्यात आला असल्याचे,- मग तो प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही यथोचित साधनसामग्रीच्या साधनांद्वारे (मानवी हस्तक्षेपासह किंवा त्याशिवाय) किंवा पोट-कलम (३) च्या खंड (क) ते (ङ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे उत्पादित केले जात असो,- समजण्यात येईल.

**हजर करण्याच्या नोटीशीसंबंधीचे नियम.**

६४. कलम ६० च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांच्या मजकुराचा दुय्यम पुरावा देऊ पाहणाऱ्या पक्षकाराने, ज्या पक्षकाराच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली तो दस्तऐवज असेल त्याला अथवा त्याच्या अधिवक्त्याला किंवा प्रतिनिधीला तो दस्तऐवज हजर करण्यासाठी कायद्याने विहित केलेली अशी नोटीस आणि कायद्याने कोणतीही नोटीस विहित केली नसेल तर, प्रकरणाच्या परिस्थितीनुसार न्यायालयास वाजवी वाटेल अशी नोटीस दिल्याशिवाय, असा दुय्यम पुरावा देता येणार नाही :

परंतु, दुय्यम पुरावा ग्राह्य होण्यासाठी अशी नोटीस, पुढीलपैकी कोणत्याही प्रसंगी, किंवा नोटिशीला फाटा देणे न्यायालयाला योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही प्रसंगी, आवश्यक असणार नाही :–

(क) जेव्हा शाबीत करावयाचा दस्तऐवज हा स्वतःच नोटीस असेल तेव्हा;

(ख) जेव्हा आपणाला तो दस्तऐवज हजर करावा लागेल हे प्रकरणाच्या स्वरूपावरून विरुद्ध पक्षाला माहीत असणे आवश्यक असेल तेव्हा;

(ग) जेव्हा विरुद्ध पक्षाने कपटाने किंवा जबरदस्तीने मूळलेखाचा कब्जा मिळवलेला आहे असे दिसून येईल किंवा शाबीत केले जाईल तेव्हा;

(घ) न्यायालयात विरुद्ध पक्षाजवळ किंवा त्याच्या अभिकर्त्याजवळ मूळलेख असेल तेव्हा;

(ङ) जेव्हा दस्तऐवज गहाळ झाल्याचे विरुद्ध पक्षाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने कबूल केले असेल तेव्हा;

(च) जेव्हा जिच्याकडे दस्तऐवजाचा कब्जा असेल ती व्यक्ती त्या आदेशिकेच्या कक्षेबाहेर असेल किंवा त्या आदेशिकेच्या अधीन नसेल तेव्हा.

६५. जर एखादा दस्तऐवज, कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरित केल्याचे अथवा संपूर्णतः किंवा अंशतः लिहिला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तर, ती स्वाक्षरी किवा दस्तऐवजाचा जितका भाग त्या व्यक्तीच्या हस्ताक्षरात असल्याचे अभिकथित केलेले असेल तेवढा हस्तलिखित भाग, तिच्या हस्ताक्षरात असल्याचे शाबीत केले पाहिजे. **हजर केलेला दस्तऐवज जिने स्वाक्षरित केला किंवा लिहिला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या व्यक्तीच्या स्वाक्षरी आणि हस्ताक्षराचा पुरावा.**

६६. सुरक्षित इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, जर कोणत्याही स्वाक्षरीकर्त्याची इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी, एखाद्या इलेक्ट्रॉनिक अभिलेखावर करण्यात आली असल्याचे अभिकथन केले असेल तर, अशी इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी ही, स्वाक्षरीकर्त्याची इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी आहे हे तथ्य शाबीत केले पाहिजे. **इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीच्या संबंधातील पुरावा.**

६७. जर एखादा दस्तऐवज साक्षांकित करणे कायद्यानुसार आवश्यक असेल तर, साक्षांकन करणारा एखादा तरी साक्षीदार जिवंत असून न्यायालयाच्या आदेशिकेच्या अधीन असेल आणि साक्ष देण्यास समर्थ असेल तर, त्या दस्तऐवजाचे निष्पादन झाल्याचे शाबीत करण्यासाठी, त्याचे साक्षांकन करणारा किमान एकतरी साक्षीदार बोलावला गेल्याशिवाय तो दस्तऐवज पुरावा म्हणून वापरता येणार नाही : **जो दस्तऐवज साक्षांकित करणे कायद्यानुसार आवश्यक केले आहे त्याचे निष्पादन केल्याचा पुरावा.**

परंतु, मृत्यूपत्र नसलेला असा जो कोणताही दस्तऐवज, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) याच्या तरतुदींनुसार नोंदलेला असेल त्याचे निष्पादन ज्या व्यक्तीने केल्याचे दिसते तिने तो निष्पादित केला होता हे स्पष्टपणे नाकबूल करण्यात आले असल्याशिवाय, त्याच्या निष्पादनाच्या शाबितीसाठी, त्याचे साक्षांकन करणाऱ्या साक्षीदाराला बोलावण्याची आवश्यकता असणार नाही.

६८. जर साक्षांकित करणारा, असा कोणताही साक्षीदार आढळून येणे शक्य नसेल तर, साक्षांकित करणाऱ्या निदान एका साक्षीदाराचे साक्षांकन त्याच्या हस्ताक्षरात आहे आणि दस्तऐवज निष्पादित करणाऱ्या व्यक्तीची, स्वाक्षरी त्या व्यक्तीच्या हस्ताक्षरात आहे असे शाबीत केले पाहिजे. **साक्षांकित करणारा एकही साक्षीदार आढळून आला नसेल त्याबाबतीतील पुरावा.**

६९. एखादा साक्षांकित दस्तऐवज हा, साक्षांकित करणे कायद्याने आवश्यक केलेला दस्तऐवज असला तरी, त्यातील पक्षकाराने, तो स्वतः निष्पादित केल्याची कबुली ही, त्याच्या विरूद्ध असलेला त्याच्या निष्पादनाचा पुरेसा पुरावा असेल. **साक्षांकित दस्तऐवजांतील पक्षकाराकडून निष्पादनाची कबुली.**

७०. साक्षांकन करणाऱ्या साक्षीदाराने दस्तऐवजाचे निष्पादन झाल्याचे नाकबूल केले किंवा ते त्याला आठवत नसेल तर, त्याचे निष्पादन अन्य साक्षी पुराव्याने शाबीत करता येईल. **जेव्हा साक्षांकन करणारा साक्षीदार निष्पादन केल्याचे नाकबूल करतो तेव्हाचा पुरावा.**

७१. साक्षांकित करणे कायद्यानुसार आवश्यक नसलेला साक्षांकित दस्तऐवज, जणू काही तो असाक्षांकित असावा, असे समजून शाबीत करता येईल. **साक्षांकित करणे कायद्यानुसार आवश्यक नसलेल्या दस्तऐवजाचा पुरावा.**

**स्वाक्षरी, लिखाण किंवा मोहरा या, कबूल केलेल्या किंवा शाबीत केलेल्या अन्य स्वाक्षऱ्या, लिखाणे, व मोहरा यांच्याशी ताडून पाहणे.**

**७२.** (१) एखादी स्वाक्षरी, लिखाण किवा मोहोर ही अमुक एका व्यक्तीने लिहिली किंवा केली असल्याचे दिसते तेव्हा, ती त्या व्यक्तीची आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी जी कोणतीही स्वाक्षरी, लिखाण किंवा मोहोर त्या व्यक्तीने लिहिली किंवा केली असल्याबाबत न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने कबूल किंवा शाबीत करण्यात आली असेल ती स्वाक्षरी, लिखाण किंवा मोहोर, अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सादर केली नसली किंवा शाबीत केली नसली तरीही, ती शाबीत करावयाच्या स्वाक्षरीशी, लिखाणाशी, किंवा मोहोरेशी ताडून पाहता येईल.

(२) जे कोणतेही शब्द किंवा आकडे कोणत्याही व्यक्तीने लिहिले असल्याचे अभिकथन करण्यात आले आहे ते शब्द किंवा आकडे, ताडून पाहणे शक्य व्हावे यासाठी, न्यायालय, न्यायालयात उपस्थित असलेल्या अशा व्यक्तीला, कोणतेही शब्द किंवा आकडे लिहून दाखवण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) हे कलम, कोणत्याही आवश्यक फेरबदलांसह, बोटांच्या ठशांना देखील लागू आहे.

**डिजिटल स्वाक्षरीची पडताळणी केल्यासंबंधीची शाबिती.**

**७३.** एखादी डिजिटल स्वाक्षरी ज्या व्यक्तीने केलेली असल्याचे अभिप्रेत असेल ती त्याच व्यक्तीची आहे किंवा कसे याची खात्री करण्याच्या दृष्टीने, न्यायालयास,—

(क) डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्या व्यक्तीला किंवा नियंत्रकाला किंवा प्रमाणन प्राधिकरणाला;

(ख) डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्रामध्ये सूचीबद्ध केलेल्या सार्वजनिक चावीकरिता अर्ज करण्याकरिता आणि त्या व्यक्तीने केलेली असल्याचे अभिप्रेत असलेल्या डिजिटल स्वाक्षरीची पडताळणी करण्याकरिता अन्य कोणत्याही व्यक्तीला,

निदेश देता येईल.

## सार्वजनिक दस्तऐवज

**सार्वजनिक व खाजगी दस्तऐवज.**

**७४.** (१) पुढील दस्तऐवज सार्वजनिक दस्तऐवज आहेत :—

(क) (एक) सार्वभौम अधिसत्तेच्या;

(दोन) शासकीय निकायांच्या व अधिकरणांच्या; आणि

(तीन) भारताच्या किंवा परकीय देशाच्या, विधान मंडळ, न्याय मंडळ किवा कार्यकारी मंडळ यांमधील लोक-अधिकाऱ्यांच्या,

कृतींचे दृश्यस्वरूप दस्तऐवज, किंवा त्या कृतींचे अभिलेख;

(ख) कोणत्याही राज्यात किंवा संघराज्य क्षेत्रात ठेवलेले खाजगी दस्तऐवजांचे सार्वजनिक अभिलेख.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांखेरीज, अन्य सर्व दस्तऐवज खाजगी आहेत.

**सार्वजनिक दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती.**

**७५.** ज्याचे निरीक्षण करण्याचा कोणत्याही व्यक्तीला हक्क आहे असा सार्वजनिक दस्तऐवज, ज्याच्या ताब्यात असेल असा प्रत्येक लोक अधिकारी, एखाद्या व्यक्तीने मागणी केली असता त्या व्यक्तीला, तिने त्यासाठी द्यावयाची कायदेशीर फी दिल्यावर, अशा दस्तऐवजाची एक प्रत देईल, त्याचबरोबर त्या प्रतीच्या तळाशी, अशा दस्तऐवजाची, किंवा यथास्थिति, त्याच्या भागाची ती खरी प्रत आहे, असे प्रमाणपत्र लिहील, आणि अशा प्रमाणपत्रावर, असा अधिकारी, दिनांक घालून आपल्या नावानिशी व आपल्या पदनामानिशी स्वाक्षरी करील आणि जेव्हा जेव्हा असा अधिकारी, मोहोरेचा वापर करण्यास कायद्याने प्राधिकृत केला असेल तेव्हा, तो, त्या दस्तऐवजावर मोहोर लावील; आणि अशा प्रकारे प्रमाणित केलेल्या अशा प्रतींना प्रमाणित प्रती असे म्हटले जाईल.

**स्पष्टीकरण.–** आपल्या पदीय कतर्व्याच्या सर्वसामान्य क्रमानुसार ज्या कोणत्याही अधिकाऱ्याला अशा प्रती देण्यास प्राधिकृत केले असेल त्या अधिकाऱ्याकडे अशा दस्तऐवजाची अभिरक्षा असल्याचे या कलमाच्या अर्थानुसार मानण्यात येईल.

**प्रमाणित प्रती सादर करून दस्तऐवजांची शाबिती.**

**७६.** अशा प्रमाणित प्रती, ज्या सार्वजनिक दस्तऐवजाच्या प्रती असल्याचे अभिप्रेत आहे त्या सार्वजनिक दस्तऐवजातील अथवा त्या सार्वजनिक दस्तऐवजांच्या भागातील मजकुराच्या शाबितीसाठी त्या सादर करता येतील.

**अन्य अधिकृत दस्तऐवजांची शाबिती.**

**७७.** पुढील सार्वजनिक दस्तऐवज, खालीलप्रमाणे शाबीत करता येतील :–

(क) केंद्र सरकारचे किंवा त्याच्या कोणत्याही मंत्रालयांचे व विभागांचे अथवा कोणत्याही राज्य शासनाचे किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा संघराज्य क्षेत्रप्रशासनाच्या कोणत्याही विभागाचे अधिनियम, आदेश किंवा अधिसूचना –

(एक) विभाग प्रमुखाने प्रमाणित केलेल्या त्या त्या विभागांच्या अभिलेखांवरून; अथवा

(दोन) अशा कोणत्याही शासनाच्या आदेशाने मुद्रित केल्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही दस्तऐवजावरून;

(ख) संसदेचे किंवा राज्य विधानमंडळाचे कामकाज, त्या त्या निकायाच्या रोजनाम्यांवरून, अथवा प्रसिद्ध केलेले अधिनियम किंवा गोषवारे यांवरून, अथवा संबंधित शासनाच्या आदेशाने मुद्रित केल्याचे अभिप्रेत असलेल्या प्रतींवरून;

(ग) भारताच्या राष्ट्रपतीने किंवा एखाद्या राज्याच्या राज्यपालाने अथवा एखाद्या संघराज्य क्षेत्राच्या प्रशासकाने किंवा नायब राज्यपालाने काढलेल्या उद्घोषणा, आदेश किंवा विनियम मुद्रित केल्याचे अभिप्रेत असलेल्या शासकीय **राजपत्रात** अंतर्भूत असलेल्या प्रतींवरून किंवा गोषवाऱ्यावरून;

(घ) परकीय देशाच्या कार्यकारी मंडळाचे अधिनियम किंवा विधानमंडळाचे कामकाज, त्यांच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध केलेल्या, किंवा त्या देशात सर्वसामान्यपणे अशी मान्यता मिळालेल्या रोजनाम्यावरून, अथवा देशाच्या किंवा सार्वभौमत्त्वाच्या मोहोरेने प्रमाणित केलेल्या प्रतीवरून, अथवा कोणत्याही केंद्रीय अधिनियमात त्यांची दखल घेण्यात आली असल्यास, त्यावरून;

(ङ) एखाद्या राज्यातील नगरपालिकेचे किंवा स्थानिक संस्थेचे कामकाज, त्याच्या वैध रक्षकाने प्रमाणित केलेल्या अशा कामकाजाच्या प्रतीवरून, किंवा अशा संस्थेच्या प्राधिकाराद्वारे प्रसिद्ध केलेले असल्याचे अभिप्रेत असलेल्या मुद्रित पुस्तकावरून;

(च) परकीय देशातील अन्य कोणत्याही वर्गाचे सार्वजनिक दस्तऐवज, मूळलेखावरून, अथवा मूळलेखाचा वैध ताबा असलेल्या अधिकाऱ्याने जी प्रत रीतसर प्रमाणित केलेली आहे असे लेखप्रमाणकाच्या किंवा भारतीय वाणिज्यदूताच्या किंवा राजनैतिक प्रतिनिधीच्या मोहोरेने दिलेल्या प्रमाणपत्रासह, त्याच्या वैध रक्षकाने प्रमाणित केलेल्या प्रतीवरून, आणि परकीय देशाच्या कायद्यानुसार त्या दस्तऐवजाचे स्वरूप शाबीत करून.

## दस्तऐवजासंबंधीची गृहीतके

**प्रमाणित प्रतींच्या खरेपणासंबंधीची गृहीतके.**

**७८.** (१) जो दस्तऐवज, कोणत्याही विशिष्ट तथ्याचा पुरावा म्हणून स्वीकार्य असल्याचे कायद्याद्वारे घोषित केले आहे असा प्रमाणपत्र, प्रमाणित प्रत किंवा अन्य दस्तऐवज असल्याचे अभिप्रेत असणारा आणि जो केंद्र सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, रीतसर प्रमाणित केला असल्याचे अभिप्रेत आहे असा प्रत्येक दस्तऐवज, खरा असल्याचे न्यायालय गृहीत धरील:

परंतु, असा दस्तऐवज त्याबाबतीत कायद्याने निदेशित केलेल्या रीतीने सारतः त्याच नमुन्यात असावा आणि त्याच रीतीने निष्पादित केला असल्याचे अभिप्रेत असावा.

(२) ज्या कोणत्याही अधिकाऱ्याने असा कोणताही दस्तऐवज स्वाक्षरित किंवा प्रमाणित केल्याचे अभिप्रेत असेल त्या अधिकाऱ्याने, जे अधिकारपद त्याने धारण केले असल्याचा अशा कागदपत्रात दावा केला असेल ते अधिकारपद त्याने त्या कागदपत्रावर स्वाक्षरी करतेवेळी धारण केले होते असेही न्यायालय गृहीत धरील.

**पुरावा, इत्यादीचा अभिलेख म्हणून सादर केलेल्या दस्तऐवजासंबंधी गृहीतक.**

**७९.** जेव्हा जेव्हा जो दस्तऐवज हा, एखाद्या साक्षीदाराने न्यायिक कार्यवाहीत दिलेल्या साक्षीच्या, किंवा अशी साक्ष घेण्यास विधितः प्राधिकृत अशा कोणत्याही अधिकाऱ्यापुढे दिलेल्या साक्षीचा किंवा त्या साक्षीच्या कोणत्याही भागाचा-अभिलेख किंवा टाचण असल्याचे दिसते, अथवा कोणत्याही कैद्याचा किंवा आरोपी व्यक्तीचा कायद्यानुसार घेतलेला जबाब किंवा कबुलीजबाब असल्याचे दिसते, आणि कोणत्याही न्यायाधीशाने किवा दंडाधिकाऱ्याने किंवा पूर्वोक्त अशा कोणत्याही अधिकाऱ्याने स्वाक्षरित केला असल्याचे दिसते असा कोणताही दस्तऐवज, न्यायालयापुढे सादर केला जाईल तेव्हा, न्यायालय असे गृहीत धरील की,-

(एक) असा दस्तऐवज खरा आहे;

(दोन) तो स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीने ज्या परिस्थितीत तो घेण्यात आला त्याबाबत जी कथने केली असे दिसते ती खरी आहेत, आणि

(तीन) असा पुरावा, जबाब व कबुलीजबाब रीतसर घेतला होता.

**राजपत्रे, वृत्तपत्रे व अन्य दस्तऐवज यासंबंधीचे गृहीतक.**

**८०.** जो दस्तऐवज म्हणजे, **राजपत्र** असल्याचे, अथवा वृत्तपत्र किंवा रोजनामा असल्याचे दिसते अशा प्रत्येक दस्तऐवजाचा आणि जो दस्तऐवज कोणत्याही व्यक्तीने ठेवावयाचा असे कायद्याद्वारे निदेशित केलेले असते तसा दस्तऐवज असल्याचे दिसतो असा प्रत्येक दस्तऐवज, जर कायद्याने आवश्यक केल्याप्रमाणे सारतः त्याच नमुन्यात ठेवलेला असेल आणि योग्य अभिरक्षेतून हजर केलेला असेल तर, अशा प्रत्येक दस्तऐवजाचा खरेपणा न्यायालय गृहीत धरील.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या व कलम ९२ च्या प्रयोजनांसाठी, एखादा दस्तऐवज हा, ज्या ठिकाणी ठेवणे आवश्यक असेल त्या ठिकाणी तो ठेवलेला असेल, आणि ज्या व्यक्तीकडे असा दस्तऐवज ठेवणे आवश्यक आहे त्याच व्यक्तीने त्याची देखभाल केली असेल तर, तो योग्य अभिरक्षेत असल्याचे म्हटले जाते; परंतु, जर त्याचा कायदेशीर उगम स्त्रोत असल्याचे सिद्ध झाले असेल तर, किंवा ज्यामुळे उगम स्त्रोताची संभाव्यता असेल अशी विशिष्ट प्रकरणाची परिस्थिती असेल तर, कोणतीही अभिरक्षा अयोग्य नसते.

**इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेखामधील राजपत्रांसंबंधातील गृहीतक.**

**८१.** जो अभिलेख, **राजपत्र** असल्याचे दिसते किंवा कोणत्याही व्यक्तीने ठेवावयाचा कायद्याद्वारे निदेश दिलेला इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेख असल्याचे दिसते अशा प्रत्येक इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेखाचा, जर असा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल अभिलेख, कायद्याद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे, सारतः त्याच नमुन्यात ठेवलेला असेल आणि योग्य ताब्यातून हजर केलेला असेल तर, त्याचा खरेपणा न्यायालय गृहीत धरील.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या व कलम ९३ च्या प्रयोजनांसाठी, इलेक्ट्रॉनिक अभिलेख हा, ज्या ठिकाणी ठेवावयाचा असेल त्याच ठिकाणी तो ठेवलेला असेल, आणि ज्या व्यक्तीकडे असा दस्तऐवज ठेवणे आवश्यक आहे त्याच व्यक्तीने त्याची देखभाल केलेली असेल तर, तो योग्य ताब्यात असल्याचे म्हटले जाते; परंतु, जर त्याचा कायदेशीर स्त्रोत असल्याचे सिद्ध झाले असेल तर, किंवा विशिष्ट प्रकरणाची परिस्थिती अशी असेल की, ज्यामुळे उगम स्त्रोताची संभाव्यता असेल तर, कोणताही ताबा अयोग्य नसतो.

**शासनाच्या प्राधिकारान्वये तयार केलेले नकाशे किंवा आराखडे यासंबंधी गृहीतक.**

**८२.** जे नकाशे किंवा आराखडे, केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या प्राधिकारान्वये तयार केले असल्याचे दिसते ते त्याप्रमाणे केलेले होते व बिनचूक आहेत असे न्यायालय गृहीत धरील; परंतु कोणत्याही दाव्याच्या प्रयोजनांसाठी तयार केलेले नकाशे किंवा आराखडे बिनचूक असल्याचे शाबीत केले गेले पाहिजे.

८३. जे पुस्तक, कोणत्याही देशाच्या शासनाच्या प्राधिकारान्वये मुद्रित किवा प्रकाशित झाले असून त्यात त्या देशाच्या कायद्यांपैकी कोणत्याही कायद्यांचा अंतर्भाव असल्याचे दिसते अशा प्रत्येक पुस्तकाचा व अशा देशाच्या न्यायालयांच्या निर्णयांची प्रतिवृत्ते ज्यात अंतर्भूत असल्याचे दिसते अशा प्रत्येक पुस्तकाचा खरेपणा न्यायालय गृहीत धरील.

**कायद्यांचे संग्रह व निर्णयांची प्रतिवृत्ते यासंबंधी गृहीतक.**

८४. जो दस्तऐवज हा एक मुखत्यारनामा आहे, आणि लेखप्रमाणक अथवा कोणतेही न्यायालय, न्यायाधीश, दंडाधिकारी, भारतीय वाणिज्यदूत, उपवाणिज्यदूत किंवा केंद्र सरकारचा प्रतिनिधी यांच्यासमोर निष्पादित करण्यात आला आहे व त्याने तो अधिप्रमाणित केला आहे असे दिसते असा प्रत्येक दस्तऐवज, याप्रमाणे निष्पादित व अधिप्रमाणित करण्यात आला होता असे न्यायालय गृहीत धरील.

**मुखत्यार-नाम्यासंबंधी गृहीतक.**

८५. पक्षकारांच्या इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वाक्षऱ्यांचा अंतर्भाव असणारा करार असल्याचे दिसत असलेला प्रत्येक इलेक्ट्रॉनिक अभिलेख हा, पक्षकारांच्या इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वाक्षऱ्या करून घडवून आणलेला होता असे न्यायालय गृहीत धरील.

**इलेक्ट्रॉनिक करारांसंबंधातील गृहीतक.**

८६. (१) सुरक्षित इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये, जोपर्यंत विरुद्ध शाबीत झालेले नसेल तोपर्यंत, सुरक्षित दर्जा ज्या कालावधीशी संबंधित असेल त्या विशिष्ट कालावधीपासून सुरक्षित इलेक्ट्रॉनिक अभिलेखामध्ये फेरबदल करण्यात आलेला नाही असे न्यायालय गृहीत धरील.

**इलेक्ट्रॉनिक अभिलेख व इलेक्ट्रॉनिक स्वाक्षऱ्या यांसंबंधातील गृहीतक.**

(२) सुरक्षित इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये, जोपर्यंत विरुद्ध शाबीत झालेले नसेल तोपर्यंत, न्यायालय असे गृहीत धरील की,–

(क) इलेक्ट्रॉनिक अभिलेखावर स्वाक्षऱ्या करण्याच्या किंवा तो मान्य करण्याच्या उद्देशाने, स्वाक्षरीकर्त्याने, सुरक्षित इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी केलेली आहे;

(ख) सुरक्षित इलेक्ट्रॉनिक अभिलेखाच्या किंवा सुरक्षित इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, या कलमामधील कोणतीही गोष्ट, इलेक्ट्रॉनिक अभिलेखाच्या किंवा इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीच्या अधिप्रमाणतेशी व सत्यतेशी संबंधित असणारे कोणतेही गृहीतक निर्माण करणार नाही.

८७. जोपर्यंत विरुद्ध शाबीत झालेले नसेल तोपर्यंत, न्यायालय असे गृहीत धरील की, इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी प्रमाणपत्रामध्ये सूचीबद्ध केलेली माहिती ही, जर स्वाक्षरीकर्त्याने प्रमाणपत्र स्वीकारलेले असेल तर, स्वाक्षरीकर्त्याची माहिती म्हणून जिची पडताळणी करण्यात आलेली नाही अशा विनिर्दिष्ट केलेल्या माहितीच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, बरोबर आहे.

**इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी प्रमाणपत्राच्या संबंधातील गृहीतक.**

८८. (१) जो कोणताही दस्तऐवज, भारताच्या बाहेरील कोणत्याही देशाच्या कोणत्याही न्यायिक अभिलेखाची प्रमाणित प्रत असल्याचे दिसत असेल तो दस्तऐवज, जर केंद्र सरकारच्या कोणत्याही प्रतिनिधीने अशा देशामध्ये किंवा अशा देशासाठी न्यायिक अभिलेखांच्या प्रती प्रमाणित करण्यासाठी जी पद्धत सर्वसामान्यपणे वापरली जाते असे प्रमाणित केले असेल त्याच पद्धतीने प्रमाणित करण्यात आला असल्याचे दिसत असेल तर, तो खरा व बिनचूक आहे असे न्यायालयाला गृहीत धरता येईल.

**विदेशी न्यायिक अभिलेखांच्या प्रमाणित प्रतींसंबंधी गृहीतक.**

(२) भारताच्या बाहेरील कोणत्याही राज्य क्षेत्राच्या किंवा ठिकाणाच्या बाबतीत जो अधिकारी, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याच्या कलम ३ च्या खंड (४३) मधील व्याख्येप्रमाणे, त्या राज्यक्षेत्राचा किंवा ठिकाणाचा राजनैतिक प्रतिनिधी असेल तो अधिकारी, या कलमाच्या प्रयोजनार्थ, त्या राज्यक्षेत्राचा किंवा ठिकाणाचा समावेश असणाऱ्या देशामधील किंवा देशासाठी केंद्र सरकारचा प्रतिनिधी असल्याचे मानले जाईल.

पुस्तके, नकाशे व सागरी नकाशे यासंबंधी गृहीतक.

८९. सार्वजनिक किंवा सर्वसाधारण हितसंबंधाच्या बाबींवरील माहिती मिळवण्यासाठी न्यायालयाला ज्याचा आधार घेता येईल असे कोणतेही पुस्तक आणि ज्यातील कथने ही संबद्ध तथ्ये असतील असा कोणताही प्रकाशित नकाशा किंवा तक्ता त्याच्यासमोर निरीक्षणासाठी हजर केला जाईल तेव्हा, ज्या व्यक्तीने ज्या काळी व ज्या स्थळी ते पुस्तक लिहिल्याचे अथवा तो नकाशा किंवा तक्ता प्रकाशित केल्याचे दिसते त्या व्यक्तीने त्या काळी व त्या स्थळी ते लिहिले किंवा तो प्रकाशित केला असे न्यायालयाला गृहीत धरता येईल.

इलेक्ट्रॉनिक संदेशासंबंधातील गृहीतक.

९०. प्रेषकाने, इलेक्ट्रॉनिक मेल सर्व्हरमार्फत पाठवलेला इलेक्ट्रॉनिक संदेश हा, ज्या कोणाला उद्देशून संदेश पाठविलेला असल्याचे अभिप्रेत आहे त्या प्रेषितीच्या संगणकामध्ये पारेषणासाठी दिलेल्या संदेशाशी एकरूप आहेत असे न्यायालयाला गृहीत धरता येईल; परंतु, असा संदेश ज्या कोणी पाठवला होता त्या व्यक्तीसंबंधात न्यायालय काहीही गृहीत धरणार नाही.

हजर न केलेले दस्तऐवज, इत्यादींच्या रीतसर निष्पादनासंबंधी गृहीतक.

९१. जो दस्तऐवज मागवलेला असून हजर करण्याची नोटीस देण्यात आल्यावर देखील हजर केलेला नाही असा प्रत्येक दस्तऐवज कायद्याद्वारे आवश्यक केलेल्या रीतीने साक्षांकित, मुद्रांकित व निष्पादित केला आहे असे न्यायालय गृहीत धरील.

तीस वर्षांपूर्वीच्या जुन्या दस्तऐवजांसंबंधी गृहीतक.

९२. जेव्हा कोणताही दस्तऐवज, तीस वर्षांपूर्वीचा जुना असल्याचे दिसते किंवा तसे शाबीत केले जाते असा दस्तऐवज कोणत्याही ताब्यातून हजर करण्यात आला असून त्या विशिष्ट प्रकरणी न्यायालयाला तो ताबा योग्य वाटत असेल त्याबाबतीत, अशा दस्तऐवजांवरील स्वाक्षरी व इतर सर्व मजकूर ज्या एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या हस्ताक्षरात असल्याचे दिसते तिच्याच हस्ताक्षरात तो आहे आणि निष्पादित किंवा साक्षांकित केलेल्या दस्तऐवजाच्या बाबतीत, तो ज्या व्यक्तीने निष्पादित किंवा साक्षांकित केला असल्याचे दिसते त्याच व्यक्तीने तो रीतसर निष्पादित किंवा साक्षांकित केला होता असे न्यायालयाला गृहीत धरता येईल.

**स्पष्टीकरण.–** कलम ८० चे स्पष्टीकरण, या कलमास देखील लागू असेल.

**उदाहरणे.**

(क) 'क' कडे दीर्घकाळ जमीनजुमल्याचा कब्जा आहे. जमिनीवरील त्याचे हक्क दर्शविणारे जमीनविषयक विलेख तो आपल्या ताब्यातून हजर करतो. हा ताबा योग्य असेल.

(ख) 'क' ज्या जमीनजुमल्याचा गहाणधारक आहे त्यासंबंधीचे विलेख तो हजर करतो. गहाणकाराकडे कब्जा आहे. हा ताबा योग्य असेल.

(ग) 'ख' चा एक सगासोयरा 'क' हा 'ख' ने आपल्या कब्जात असलेल्या जमिनीसंबंधीचे जे विलेख त्याच्याकडे सुरक्षित ताबा राहाण्यासाठी ठेवले होते ते हजर करतो. हा ताबा योग्य असेल.

पाच वर्षांपूर्वीच्या जुन्या इलेक्ट्रॉनिक अभिलेखांसंबंधातील गृहीतक.

९३. जेव्हा कोणताही इलेक्ट्रॉनिक अभिलेख, पाच वर्षांपूर्वीचा जुना असल्याचे दिसते किंवा तसे शाबीत केले जाते असा इलेक्ट्रॉनिक अभिलेख, एखाद्या विशिष्ट ताब्यातून हजर करण्यात आला असून त्या विशिष्ट प्रकरणी न्यायालयाला,तो ताबा योग्य वाटत असेल त्याबाबतीत, त्या अभिलेखावरील इलेक्ट्रॉनिक सही ज्या कोणत्याही विशिष्ट व्यक्तीची असल्याचे दिसते ती अशा प्रकारे त्या व्यक्तीनेच केली आहे किंवा या बाबतीत तिने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने ती केली आहे असे न्यायालयाला गृहीत धरता येईल.

**स्पष्टीकरण.–**कलम ८१ चे स्पष्टीकरण, या कलमास देखील लागू असेल.

प्रकरण सहा

## लेखी पुराव्यामुळे तोंडी पुरावा अपवर्जित होणे

**संविदांच्या, देणग्यांच्या व अन्य संपत्तीव्यवस्थांच्या ज्या अटी दस्तऐवजांच्या रूपात लेखनिविष्ट केलेल्या असतील त्यांचा पुरावा.**

**९४.** जेव्हा संविदेच्या किंवा देणगीच्या किंवा अन्य कोणत्याही संपत्तीव्यवस्थेच्या अटी दस्तऐवजाच्या रूपात लेखनिविष्ट केलेल्या असतील तेव्हा आणि ज्यांमध्ये कोणतीही बाब दस्तऐवजाच्या रूपात लेखनिविष्ट करणे विधितः आवश्यक असेल अशा सर्व प्रकरणी, अशा संविदेच्या, देणगीच्या किंवा संपत्तीव्यवस्थेच्या अटींच्या अथवा अशा बाबींच्या शाबितीमध्ये, खुद्द तो दस्तऐवज, किंवा यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या तरतुदींखाली ज्यात दुय्यम पुरावा स्वीकार्य असेल त्या प्रकरणी, त्याच्या मजकुराचा दुय्यम पुरावा यांखेरीज कोणताही पुरावा देण्यात येणार नाही.

**अपवाद १.–** जेव्हा एखादा लोक अधिकारी, लेखान्वये नियुक्त करणे कायद्यानुसार आवश्यक असेल आणि एखाद्या विशिष्ट व्यक्तीने असा अधिकारी म्हणून कार्य केले आहे असे दाखवून देण्यात आले असेल तेव्हा, ज्या लेखान्वये त्याला नियुक्त केले गेले तो लेख शाबीत करण्याची गरज नाही.

**अपवाद २.–** भारतात इच्छापत्रप्रमाणार्थ स्वीकृत केलेली मृत्युपत्रे, इच्छापत्रप्रमाणाने शाबीत करता येतील.

**स्पष्टीकरण १.–** ज्या प्रकरणी, निर्दिष्ट केलेल्या संविदा, देणग्या किंवा संपत्तीव्यवस्था एका दस्तऐवजात अंतर्भूत असतात त्या प्रकरणांना आणि ज्या प्रकरणी ते एकाहून अधिक दस्तऐवजांमध्ये अंतर्भूत असतात त्या प्रकरणांना, हे कलम सारखेच लागू होते.

**स्पष्टीकरण २.–** एकाहून अधिक मूळलेख असतील तेव्हा, फक्त एकच मूळलेख शाबीत करण्याची गरज असते.

**स्पष्टीकरण ३.–** या कलमात निर्दिष्ट केलेल्या तथ्यांहून अन्य तथ्याचे कोणत्याही दस्तऐवजातील,- मग तो कोणताही असो,- कथन, त्याच तथ्यासंबंधी तोंडी पुरावा स्वीकृत करण्यास अवरोध करणार नाही.

**उदाहरणे.**

(क) जर संविदा अनेक पत्रांमध्ये अंतर्भूत असेल तर, ज्यांमध्ये ती अंतर्भूत आहे ती सर्व पत्रे शाबीत केली पाहिजेत.

(ख) जर संविदा एखाद्या विनिमयपत्रात अंतर्भूत असेल तर, विनिमयपत्र शाबीत केले पाहिजे.

(ग) जर विनिमयपत्र तीन विपत्रांच्या संचात काढलेले असेल तर, फक्त एकच शाबीत करणे गरजेचे आहे.

(घ) 'क' हा 'ख' शी विवक्षित अटींवर नीळ देण्याची लेखी संविदा करतो. ज्याबद्दल अन्य एखाद्या प्रसंगी तोंडी संविदा झाली होती अशा दुसऱ्या निळीची किंमत 'क' ने 'ख' ला चुकती केली होती हे तथ्य त्या लेखी संविदेत नमूद केले आहे. त्या दुसऱ्या निळीबद्दल पैसे देण्यात आले नव्हते असा तोंडी पुरावा देऊ करण्यात येतो. हा पुरावा स्वीकार्य आहे.

(ङ) 'ख' ने दिलेल्या पैशांबद्दल 'क' हा 'ख' ला पावती देतो. पैसे देण्यात आल्याचा तोंडी पुरावा देऊ करण्यात येतो. हा पुरावा स्वीकार्य आहे.

**तोंडी कराराचा पुरावा वगळणे.**

**९५.** जेव्हा अशा कोणत्याही संविदेच्या, देणगीच्या किंवा अन्य संपत्तीव्यवस्थेच्या अटी, अथवा दस्तऐवजाच्या रूपात लेखनिविष्ट करणे विधितः आवश्यक असलेली कोणतीही बाब, कलम ९४ नुसार शाबीत करण्यात आली असेल तेव्हा, त्या अटींच्या विरुद्ध असण्याच्या, त्यात बदल करण्याच्या, त्यात ज्यादा दाखल करण्याच्या किंवा त्यातून काही कमी करण्याच्या प्रयोजनासाठी अशा कोणत्याही संलेखातील पक्षकारांमधील किंवा त्यांच्या हितसंबंधित प्रतिनिधींमधील कोणत्याही तोंडी कराराचा किंवा कथनाचा पुरावा स्वीकृत केला जाणार नाही :

परंतु, ज्या कोणत्याही तथ्यामुळे कोणताही दस्तऐवज विधिबाह्य होऊ शकेल किंवा त्यासंबंधीचा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश मिळवण्यास कोणतीही व्यक्ती हक्कदार होऊ शकेल, ते तथ्य शाबीत करता येईल; जसे की,-कपट, धाकदपटशा, अवैधता, यथोचित निष्पादनाचा अभाव, संविदा करणाऱ्या कोणत्याही पक्षकारांच्या ठायी असलेल्या क्षमतेचा अभाव, प्रतिफलाचा अभाव किंवा त्याची निष्फळता अथवा तथ्यविषयक किंवा कायदेविषयक चूकभूलः

परंतु आणखी असे की, दस्तऐवजात जी बाब अनुल्लेखित आहे आणि जी त्याच्या अटींशी विसंगत नाही अशा कोणत्याही बाबीसंबंधीच्या कोणत्याही स्वतंत्र तोंडी कराराचे अस्तित्व शाबीत करता येईल. हे परंतुक लागू होते किंवा नाही याचा विचार करताना, न्यायालयास, दस्तऐवजाच्या औपचारिकतेची व्याप्ती विचारात घ्यावयाची आहेः

परंतु तसेच, अशा कोणत्याही संविदेखाली, देणगीखाली किंवा संपत्तीव्यवस्थेखाली लागू होणाऱ्या कोणत्याही आबंधनाशी संलग्न असणारी पूर्ववर्ती शर्त असलेल्या कोणत्याही स्वतंत्र तोंडी कराराचे अस्तित्व शाबीत करता येईल.

परंतु तसेच, अशी कोणतीही संविदा, देणगी किंवा संपत्तीव्यवस्था लेखी असणे विधितः आवश्यक असेल किंवा दस्तऐवजांच्या नोंदणीसंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार त्यांची नोंदणी करण्यात आली असेल ती प्रकरणे खेरीजकरून इतर बाबतीत, अशी संविदा, देणगी किंवा संपत्तीव्यवस्था रद्द करण्याच्या किंवा तिच्यात बदल करण्याच्या नंतरच्या कोणत्याही वेगळ्या तोंडी कराराचे अस्तित्व शाबीत करता येईलः

परंतु तसेच, कोणत्याही संविदेत स्पष्टपणे नमूद न केलेल्या घटना ज्या कोणत्याही परिपाठानुसार किंवा रूढीनुसार नेहमी त्या प्रकारच्या संविदांशी अनुबद्ध असतात त्या घटना, शाबीत करता येतीलः

परंतु तसेच, अशी घटना अनुबद्ध करणे हे, संविदेच्या स्पष्ट अटींशी प्रतिकूल किंवा त्यांच्याशी विसंगत असता कामा नयेः

परंतु तसेच, दस्तऐवजाची भाषा, विद्यमान तथ्यांशी कशा रीतीने संबंधित आहे ते दाखविणारे कोणतेही तथ्य शाबीत करता येईल.

**उदाहरणे.**

(क) "कोलकत्त्याहून विशाखापट्टणमला जाणाऱ्या जहाजांमधील" मालाचे विमापत्र काढलेले आहे. माल एका विशिष्ट जहाजावर चढवलेला होता व ते जहाज बेपत्ता झाले. ते विशिष्ट जहाज विमापत्रातून तोंडी कराराने वगळले होते, हे तथ्य शाबीत करता येऊ शकत नाही.

(ख) 'क' हा 'ख' ला १ मार्च, २०२३ रोजी एक हजार रूपये देण्याचा बिनशर्त लेखी करार करतो. त्याचवेळी पैसे ३१ मार्च २०२३ पर्यंत देण्यात येऊ नयेत असा तोंडी करार केला होता, हे तथ्य शाबीत करता येऊ शकत नाही.

(ग) "रामपूर टी इस्टेट" या नावाची संपदा एका विलेखान्वये विकण्यात आली असून विकलेल्या संपदेचा नकाशा या विलेखामध्ये अंतर्भूत आहे. नकाशात अंतर्भूत नसलेली जमीन त्या संपदेचा भाग असल्याचे नेहमीच समजले जात होते व विलेखान्वये ती संक्रामित होणे अभिप्रेत होते, हे तथ्य शाबीत करता येऊ शकत नाही.

(घ) 'ख' च्या मालकीच्या विवक्षित खाणी विवक्षित अटींवर चालवण्यासाठी 'क' हा 'ख' शी लेखी संविदा करतो. त्यांच्या मूल्याबाबत 'ख' ने केलेल्या अपवेदनामुळे 'क' तसे करण्यास प्रवृत्त झाला हे तथ्य शाबीत करता येईल.

(ङ) संविदेच्या विनिर्दिष्ट पालनासाठी 'क' हा 'ख' विरुद्ध दावा लावतो व तिच्या तरतुदींपैकी एक तरतूद त्याने चुकीने घातलेली असल्याने तेवढी दुरुस्ती करावी अशीही विनंती करतो. ज्या चुकीमुळे 'क' संविदेत दुरुस्ती करण्यास हक्कदार होऊ शकेल अशी चूक झाली होती असे त्याला शाबीत करता येईल.

(च) 'क' हा पत्राद्वारे, 'ख' चा माल मागवतो, पैसे देण्याच्या वेळेसंबंधी त्यात काहीही म्हटलेले नाही व मालाची पाठवणी होताच तो माल स्वीकारतो. 'ख' हा 'क' विरूद्ध किमतीसाठी दावा लावतो माल काही मुदतीच्या उधारीवर पुरविण्यात आला असून ती मुदत अजून संपलेली नाही असे 'क' दाखवून देऊ शकेल.

(छ) 'क' हा ' ख' ला घोडा विकतो व तो निकोप असल्याबद्दल तोंडी हमी देतो. " 'क' कडून तीस हजार रुपयाला घोडा विकत घेतला." - अशा शब्दांत 'क' हा 'ख' ला कागदपत्र करून देतो. 'ख' ला तोंडी हमी शाबीत करता येईल.

(ज) 'क' हा 'ख' कडून राहण्याची जागा भाड्याने घेतो, व 'ख' ला एक कार्ड देतो आणि त्यावर "खोल्या, दरमहा दहा हजार रुपये," - असे लिहिलेले आहे, या अटींमध्ये अंशतः भोजनाचा अंतर्भाव होता असा तोंडी करार झाल्याचे 'क' ला शाबीत करता येईल. 'क' हा 'ख' कडून एका वर्षासाठी राहण्याची जागा भाड्याने घेतो व एका अधिवक्त्याने तयार केलेला व रीतसर मुद्रांक लावलेला असा एक करारनामा त्यांच्या दरम्यान करण्यात येतो. भोजनाविषयी त्यात काही उल्लेख नाही. अटींमध्ये भोजनाच्या अटींचा तोंडी अंतर्भाव केलेला होता हे 'क' ला शाबीत करता येणार नाही.

(झ) 'ख' कडे पैशांची पावती पाठवून 'क' आपणांस येणे असलेल्या ऋणाची मागणी करतो. 'ख' पावती ठेवून घेतो, पण पैसे पाठवत नाही. त्या रकमेसाठी केलेल्या दाव्यात 'क' ला ही वस्तुस्थिती शाबीत करता येईल.

(ञ) 'क' व 'ख' विवक्षित संभाव्य घटना घडून आल्यावर परिणामक व्हावयाची अशी विवक्षित लेखी संविदा करतात. तो लेख 'ख' कडे ठेवलेला असून तो त्यावरून 'क' विरूद्ध दावा लावतो. कोणत्या परिस्थितीत तो लेख दिला होता ते 'क' दाखवून देऊ शकेल.

**संदिग्ध दस्तऐवज स्पष्ट करणारा किंवा सुधारित करणारा पुरावा वगळणे.**

**९६.** जेव्हा दस्तऐवजात केलेली शब्दयोजना सकृतदर्शनी संदिग्ध असेल किंवा त्यामध्ये काही उणीवा असतील तेव्हा, जी तथ्ये तिचा अर्थ दाखवू शकतील किंवा त्या उणीवा भरून काढू शकतील त्यांचा पुरावा देता येणार नाही.

**उदाहरणे.**

(क) 'क' हा 'ख' ला "एक लाख रुपयाला किंवा एक लाख पन्नास हजार रुपयाला" घोडा विकण्याचा लेखी करार करतो यांपैकी कोणती किंमत द्यावयाची होती त्याचा पुरावा देता येणार नाही.

(ख) विलेखात कोऱ्या जागा आहेत. त्या कशा प्रकारे भरण्याचे अभिप्रेत होते ते दाखवू शकणाऱ्या तथ्यांना पुरावा देता येत नाही.

**विद्यमान तथ्यांना दस्तऐवज लागू करण्याविरुद्ध असलेला पुरावा वगळणे.**

**९७.** जेव्हा दस्तऐवजात वापरलेली भाषा स्वयंस्पष्ट असेल व ती विद्यमान तथ्यांना नेमकी लागू होत असेल तेव्हा, ती अशा तथ्यांना लागू करणे अभिप्रेत नव्हते हे दाखवून देण्यासाठी पुरावा देता येणार नाही.

**उदाहरण.**

'क' एका विलेखान्वये 'ख' ला आपली रामपूर येथील शंभर बिघ्यांची मिळकत विकतो. रामपूर येथे 'क' ची १०० बिघ्यांची मिळकत आहे. विकण्याचे अभिप्रेत असलेली संपदा निराळ्या जागी होती व निराळ्या आकारमानाची होती या तथ्याचा पुरावा देता येणार नाही.

**विद्यमान तथ्यांच्या संदर्भात अर्थ लागत नसलेल्या दस्तऐवजासंबंधी पुरावा.**

**९८.** जेव्हा दस्तऐवजात वापरलेली भाषा स्वयंस्पष्ट असेल, पण विद्यमान तथ्यांच्या संदर्भात तिचा अर्थ लागत नसेल तेव्हा, ती विशिष्ट अर्थाने वापरली होती हे दाखवून देणारा पुरावा देता येईल.

**उदाहरण.**

एक विलेखान्वये 'क' "आपले कलकत्त्यातील घर" 'ख' ला विकतो. 'क' चे कलकत्त्यात एकही घर नव्हते. पण असे दिसते की, हावड्याला त्याचे एक घर होते व विलेखाचे निष्पादन झाल्यापासून 'ख' कडे त्याचा कब्जा होता. तो विलेख हावडा येथील घराशी संबंधित होता हे दाखवून देण्यासाठी ही तथ्ये शाबीत करता येतील.

**अनेक व्यक्तींपैकी फक्त एकाच व्यक्तीला जी भाषा लागू असू शकते ती भाषा कोणाला लागू पडते त्यासंबंधी पुरावा.**

**९९.** जेव्हा वापरलेली भाषा, अनेक व्यक्तींपैकी किंवा वस्तूंपैकी कोणाही एकीला लागू करण्याचे अभिप्रेत असण्याचा संभव असतो आणि एकीहून अधिकांना ती लागू करण्याचे अभिप्रेत असू शकणार नसते तेव्हा, त्यांपैकी कोणत्या व्यक्तीला किंवा वस्तूला ती लागू करण्याचा उद्देश होता हे दाखवून देणाऱ्या तथ्यांचा पुरावा देता येईल.

**उदाहरणे.**

(क) 'क' "आपला पांढरा घोडा" 'ख' ला एक हजार रुपयाला विकण्याचा करार करतो. 'क' कडे दोन पांढरे घोडे आहेत. त्यांपैकी कोणता अभिप्रेत होतो हे दाखवून देणाऱ्या तथ्यांचा पुरावा देता येईल.

(ख) 'क' हा 'ख' बरोबर रामगडला जाण्याचे मान्य करतो. राजस्थानमधील रामगड किंवा उत्तराखंडमधील रामगड अभिप्रेत होते किंवा कसे, हे दाखवून देणाऱ्या तथ्यांचा पुरावा देता येईल.

**तथ्यांच्या दोन संचांपैकी कोणत्याही संचास संपूर्णतः अचूकपणे लागू न होणारी भाषा, त्यापैकी एका संचास लागू करण्यासंबंधी पुरावा.**

**१००.** जेव्हा वापरलेली भाषा अंशतः विद्यमान तथ्यांच्या एका समूहाला व अंशतः विद्यमान तथ्यांच्या दुसऱ्या समुहाला लागू होते, पण ती संपूर्ण भाषा, त्यांपैकी एकाही संचास अचूकपणे लागू होत नसेल तेव्हा, ती दोन संचांपैकी कोणत्या संचाला लागू करण्याचे अभिप्रेत होते ते दाखवून देण्यासाठी पुरावा देता येईल.

**उदाहरण.**

'य' च्या ताब्यात असलेली 'क्ष' येथील आपली जमीन 'क' हा 'ख' ला विकण्याचा करार करतो. 'क' ची 'क्ष' येथे जमीन आहे, परंतु, ती 'य' च्या ताब्यात नाही, आणि एक जमीन 'य' च्या ताब्यात आहे, परंतु, ती 'क्ष' येथे नाही. कोणती जमीन विकण्याचे त्याला अभिप्रेत होते हे दाखवून देणाऱ्या तथ्यांचा पुरावा देता येईल.

**दुर्वाच्य लिखित चिन्हे, इत्यादींच्या अर्थासंबंधी पुरावा.**

**१०१.** वाचता न येण्यासारख्या व सर्वसामान्यपणे सुबोध नसलेल्या लिखित चिन्हांचा, परक्या, लुप्त, तांत्रिक, स्थानिक व प्रादेशिक शब्दप्रयोगांचा, संक्षेपाक्षरांचा व विशिष्ट अर्थाने वापरलेल्या शब्दांचा अर्थ दाखवून देण्यासाठी पुरावा देता येईल.

**उदाहरण.**

'क' हा शिल्पकार "आपली सर्व मॉडेल्स" 'ख' ला विकण्याचा करार करतो. 'क' कडे मॉडेल्स व मॉडेलिंगची हत्यारे ही दोन्ही आहेत. त्याने काय विकण्याचे अभिप्रेत होते ते दाखवून देण्यासाठी पुरावा देता येईल.

**१०२.** ज्या व्यक्ती, दस्तऐवजातील पक्षकार नाहीत किंवा त्यांचे हितसंबंधित प्रतिनिधी नाहीत, त्यांना दस्तऐवजाच्या अटी बदलणारा समकालीन करार झाला होता हे दाखवून देण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या कोणत्याही तथ्यांचा पुरावा देता येईल. **दस्तऐवजातील अटींमध्ये बदल करणाऱ्या कराराचा पुरावा कोणाला देता येईल.**

**उदाहरण.**

'ख' ने 'क' ला विवक्षित कापूस विकावा आणि सुपूर्दगी झाली की, पैसे देण्यात यावेत असा 'क' व 'ख' लेखी करार करतात. याचवेळी, 'क' ला तीन महिन्यांची उधारी द्यावी असा तोंडी करार ते करतात. 'क' व 'ख' यांच्यामध्ये हे दाखवून देता येणार नाही. परंतु, त्यामुळे 'ग' च्या हितसंबंधावर परिणाम झाला असेल तर, 'ग' ते दाखवू शकेल.

**१०३.** मृत्युपत्रांचा अर्थ लावण्यासंबंधातील, भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३९) याच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींवर या प्रकरणातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होतो असे समजले जाणार नाही. **मृत्युपत्राशी संबंधित असणाऱ्या भारतीय उत्तराधिकार अधिनियमांच्या तरतुदींची व्यावृत्ती.**

## भाग चार

## पुरावा हजर करणे व पुराव्याचा परिणाम

प्रकरण सात

### शाबितीचा भार

**शाबितीचा भार.** **१०४.** जो कोणी, स्वतः प्रपादन केलेल्या तथ्यांच्या अस्तित्वावर अवलंबून असलेल्या कोणत्याही वैध हक्काबाबत किंवा दायित्वाबाबत न्यायनिर्णय देण्यास कोणत्याही, न्यायालयाला आवाहन करील, त्याने ती तथ्ये अस्तित्वात असल्याचे शाबीत केले पाहिजे, आणि जेव्हा एखादी व्यक्ती कोणत्याही तथ्यांचे अस्तित्व शाबीत करण्यास बांधलेली असते तेव्हा, शाबितीचा भार, त्या व्यक्तीवर आहे असे म्हटले जाते.

**उदाहरणे.**

(क) 'ख' ने जो गुन्हा केलेला आहे असे 'क' म्हणतो त्याबद्दल 'ख' ला शिक्षा करण्यात येत आहे असा न्यायनिर्णय दिला जावा असे 'क' न्यायालयाला आवाहन करतो. 'ख'ने गुन्हा केलेला आहे असे 'क'ने शाबीत केले पाहिजे.

(ख) जी तथ्ये खरी असल्याचे 'क' प्रपादन करतो व 'ख' नाकबूल करतो त्यामुळे 'क' हा, तो 'ख' च्या कब्जातील विवक्षित जमिनीला हक्कदार आहे असा न्यायनिर्णय देण्यास न्यायालयाला सांगतो. 'क' ने त्या तथ्यांचे अस्तित्व शाबीत केले पाहिजे.

**शाबितीचा भार कोणावर असतो.** **१०५.** दाव्यात किंवा कार्यवाहीत जर कोणत्याही बाजूने काहीच पुरावा दिला गेला नाही तर जी व्यक्ती हरेल तिच्यावर शाबितीचा भार असतो.

**उदाहरणे.**

(क) जी जमीन 'ख' च्या कब्जात असते ती जमीन, 'क' च्या प्रपादनाप्रमाणे 'ख' चे वडील 'ग' याच्या मृत्युपत्राअन्वये 'क' ला देण्यात आली होती. तिच्यासाठी 'क' हा 'ख' विरुद्ध दावा लावतो. जर कोणत्याही बाजूने काहीच पुरावा दिला गेला नाही तर, 'ख' आपल्याकडे कब्जा ठेवून घेण्यास हक्कदार होईल. म्हणून, शाबितीचा भार 'क' वर आहे.

(ख) बंधपत्रावरून येणे असलेल्या पैशासाठी 'क' हा 'ख' वर दावा लावतो. बंधपत्राचे निष्पादन झाल्याचे कबूल करण्यात आले आहे, परंतु, ते कपटाने मिळवले असे 'ख' म्हणतो व ते 'क' नाकबूल करतो. जर कोणत्याही बाजूने काहीच पुरावा दिला गेला नाही तर, 'क' जिंकेल, कारण बंधपत्राबद्दल विवाद नाही व कपट शाबीत झालेले नाही. म्हणून शाबितीचा भार 'ख' वर आहे.

**विशिष्ट तथ्यासंबंधात शाबितीचा भार.** **१०६.** कोणत्याही विशिष्ट तथ्यासंबंधीच्या शाबितीचा भार एखाद्या विशिष्ट व्यक्तीवर राहील अशी कोणत्याही कायद्याने तरतूद केलेली नसेल तर, जी व्यक्ती, न्यायालयाला त्या तथ्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्याचे आवाहन करील त्या व्यक्तीवर त्या तथ्याच्या शाबितीचा भार राहील.

**उदाहरण.**

'क' हा, 'ख' विरुद्ध चोरीबद्दल खटला भरतो व आपण चोरी केल्याचे 'ख' ने 'ग' कडे कबूल केले यावर न्यायालयाने विश्वास ठेवावा असे आवाहन करतो. 'क' ने कबुली शाबीत केली पाहिजे. विवादित वेळी, आपण अन्यत्र होतो यावर विश्वास ठेवण्याबद्दल 'ख' न्यायालयाला आवाहन करतो. त्याने ते शाबीत केले पाहिजे.

**पुरावा स्वीकार्य होण्यासाठी शाबीत करावयाचे तथ्य शाबीत करण्याचा भार.** **१०७.** जे कोणतेही तथ्य कोणत्याही व्यक्तीला अन्य एखाद्या तथ्याबद्दल पुरावा देणे शक्य व्हावे म्हणून शाबीत करण्याची गरज असते ते तथ्य शाबीत करण्याचा भार, असा पुरावा देऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीवर असतो.

**उदाहरणे.**

(क) 'क' हा 'ख' चे मृत्युकालीन अधिकथन शाबीत करू इच्छितो. 'क' ने 'ख' चा मृत्यू शाबीत केला पाहिजे.

(ख) हरवलेल्या दस्तऐवजातील मजकूर 'क' दुय्यम पुराव्याने शाबीत करू इच्छितो. दस्तऐवज हरवलेला आहे असे 'क' ने शाबीत केले पाहिजे.

**१०८.** जेव्हा एखाद्या व्यक्तीवर कोणत्याही अपराधाचा आरोप असेल तेव्हा, ज्यामुळे तो खटला भारतीय न्याय संहिता, २०२३, मधील सर्वसाधारण अपवादांपैकी कोणत्याही अपवादाच्या अंतर्गत अथवा उक्त संहितेच्या अन्य कोणत्याही भागात किंवा अपराधाची व्याख्या करणाऱ्या कोणत्याही कायद्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही विशेष अपवादाच्या किंवा परंतुकाच्या अंतर्गत येतो त्या परिस्थितीचे अस्तित्व शाबीत करण्याचा भार तिच्यावर असतो, आणि न्यायालय, अशा परिस्थितीचा अभाव असल्याचे गृहीत धरील. **आरोपीचे प्रकरण अपवादांतर्गत येते हे शाबीत करण्याचा भार.**

**उदाहरणे.**

(क) 'क' वर खुनाचा आरोप असून मनोविकलतेमुळे आपल्याला त्या कृतीचे स्वरूप समजले नाही असे तो अभिकथन करतो. शाबितीचा भार, 'क' वर आहे.

(ख) खुनाचा आरोप असलेला 'क' हा, गंभीर व आकस्मिक प्रक्षोभामुळे त्याचा संयम सुटला असे अभिकथन करतो. शाबितीचा भार, 'क' वर आहे.

(ग) भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याच्या कलम ११७ मध्ये अशी तरतूद आहे की, जो कोणी, कलम १२२ च्या पोट-कलम (२) द्वारे तरतूद केलेल्या प्रकरणात असेल त्याखेरीज, इच्छापूर्वक जबर दुखापत करील तो, विवक्षित शिक्षांना पात्र होईल. कलम ११७ खालील इच्छापूर्वक जबर दुखापत केल्याबद्दल 'क' वर दोषारोप ठेवण्यात आला आहे. ते प्रकरण कलम १२२ च्या पोट-कलम (२) खाली येते ती परिस्थिती शाबीत करण्याचा भार, 'क' वर आहे.

**१०९.** जेव्हा कोणतेही तथ्य विशेषेकरून एखाद्या व्यक्तीच्या माहितीच्या कक्षेत असते तेव्हा, ते तथ्य शाबीत करण्याचा भार, तिच्यावर असतो. **विशेषेकरून माहितीच्या कक्षेत असलेले तथ्य शाबीत करण्याचा भार.**

**उदाहरणे.**

(क) कृतीचे स्वरूप व परिस्थिती यांवरून सूचित होणाऱ्या उद्देशाहून अन्य एखाद्या उद्देशाने जेव्हा एखाद्या व्यक्तीने ती कृती केली असेल तेव्हा, तो उद्देश शाबीत करण्याचा भार, तिच्यावर असतो.

(ख) 'क' वर विनातिकिट रेल्वेप्रवास केल्याचा दोषारोप आहे. त्याच्याकडे तिकीट होते हे शाबीत करण्याचा भार, त्याच्यावर असतो.

**११०.** एखादा माणूस जिवंत आहे की मृत आहे असा प्रश्न असतो, आणि मागील तीस वर्षांच्या अवधीत केव्हातरी तो जिवंत होता हे दाखवून देण्यात येते तेव्हा, तो मृत आहे हे शाबीत करण्याचा भार, तसे म्हणणाऱ्या व्यक्तीवर असतो. **मागील तीस वर्षांच्या कालावधीत केव्हातरी जी हयात असल्याचे ज्ञात आहे त्या व्यक्तीचा मृत्यू शाबीत करण्याचा भार.**

**सात वर्षे जिचा ठावठिकाणा कळलेला नाही ती व्यक्ती जिवंत आहे हे शाबीत करण्याचा भार.**

१११. जेव्हा एखादा माणूस जिवंत आहे की मृत आहे हा प्रश्न असतो, आणि जर तो जिवंत असता तर स्वाभाविकपणे ज्यांना त्याचा ठावठिकाणा कळला असता त्यांना सात वर्षे त्याच्याबद्दल काहीही बातमी कळलेली नसते तेव्हा, तो जिवंत आहे हे शाबीत करण्याचा भार, तसे म्हणणाऱ्या व्यक्तीकडे संक्रामित होतो.

**भागीदार, जमीन मालक व भाडेकरू, प्रकर्ता व अभिकर्ता यांच्या बाबतीत त्यांच्यामधील संबंधाबाबत शाबितीचा भार.**

११२. जेव्हा व्यक्ती म्हणजे भागीदार, जमीनमालक व भाडेकरू किंवा प्रकर्ता व अभिकर्ता आहेत किंवा कसे असा प्रश्न असतो, आणि त्या तशा नात्याने वागत आल्या आहेत असे दाखवून देण्यात आलेले असते तेव्हा, त्यांच्यामध्ये अनुक्रमे ते नाते नाही किंवा ते संपुष्टात आलेले आहे हे शाबीत करण्याचा भार, तसे म्हणणाऱ्या व्यक्तीवर असतो.

**मालकीसंबंधी शाबितीचा भार.**

११३. जी वस्तू कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात आहे असे दाखवून देण्यात आलेले आहे त्या वस्तूची ती मालक आहे किंवा कसे असा प्रश्न असतो तेव्हा, ती व्यक्ती, मालक नाही हे शाबीत करण्याचा भार, ती मालक नाही असे म्हणणाऱ्या व्यक्तीवर असतो.

**जेव्हा एक पक्ष सक्रीय विश्वासाच्या नात्याने संबंधित असेल तेव्हा संव्यवहारातील सद्भावाची शाबिती.**

११४. जेव्हा पक्षांमधील संव्यवहारातील सद्भावासंबंधी प्रश्न असतो तेव्हा, त्यांच्यापैकी एक पक्ष दुसऱ्याच्या सक्रीय विश्वासाच्या स्थानी असतो तेव्हा, संव्यवहारातील सद्भाव शाबीत करण्याचा भार, सक्रीय विश्वासाच्या स्थानी असलेल्या पक्षावर असतो.

**उदाहरणे.**

(क) अशिलाने अधिवक्त्याला केलेल्या विक्रीमागील सद्भाव हा, अशिलाने आणलेल्या दाव्यात प्रश्नास्पद आहे. संव्यवहारातील सद्भाव शाबीत करण्याचा भार, अधिवक्त्यावर असतो.

(ख) नुकत्याच सज्ञान झालेल्या मुलाने, वडिलांना केलेल्या विक्रीतील सद्भाव हा मुलाने आणलेल्या दाव्यात प्रश्नास्पद आहे. संव्यवहारातील सद्भाव शाबीत करण्याचा भार, वडिलांवर असतो.

**विवक्षित अपराधांसंबंधीचे गृहीतक.**

११५. (१) जेव्हा एखाद्या व्यक्तीने पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कोणताही अपराध,-

(क) अनागोंदी नष्ट करण्यासाठी आणि सार्वजनिक सुव्यवस्था पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी व टिकविण्यासाठी तरतूद करणाऱ्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये 'अशांत क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्रात; किंवा

(ख) जेथे एक महिन्यापेक्षा अधिक काळापर्यंत सार्वजनिक शांततेचा मोठ्या प्रमाणात भंग होत आहे अशा कोणत्याही क्षेत्रात, केला असल्याचा आरोप तिच्यावर असेल,

आणि कोणत्याही सशस्त्र सेनादलांतील किंवा सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सोपवण्यात आलेल्या अशा दलांतील सदस्य आपल्या कर्तव्याचे पालन करीत असताना, त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी किंवा त्यांना प्रतिकार करण्यासाठी अशा क्षेत्रातील ज्या ठिकाणी किंवा ज्या ठिकाणामधून जेव्हा दारूगोळा, हत्यारे किंवा स्फोटके वापरण्यात आली त्या ठिकाणी त्या वेळी अशी व्यक्ती होती असे दाखवून देण्यात येईल त्याबाबतीत, जर विरुद्ध शाबीत करण्यात आले नाही तर, अशा व्यक्तीने अपराध केला आहे असे गृहीत धरण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले अपराध पुढीलप्रमाणे आहेत, ते असे :–

(क) भारतीय न्याय संहिता २०२३ (२०२३ चा ४५) याच्या कलम १४७, कलम १४८, कलम १४९ किंवा कलम १५० खालील अपराध;

(ख) भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याचे कलम १४९ किंवा कलम १५० खालील अपराध करण्यासाठी फौजदारीपात्र कट किंवा तो अपराध करण्याचा प्रयत्न किंवा त्या अपराधास अपप्रेरणा.

**वैवाहिक जीवनाच्या काळात जन्म हा औरसतेचा निर्णायक पुरावा.**

**११६.** कोणतीही व्यक्ती ही, आपली आई व कोणताही पुरुष यांच्या विधिग्राह्य वैवाहिक जीवनाच्या काळात किंवा त्या विवाहाच्या विच्छेदानंतर आई अविवाहित राहिलेली असताना दोनशेऐंशी दिवसांच्या आत जन्मली होती हे तथ्य, ज्यावेळी ती व्यक्ती गर्भधारित होऊ शकली असती अशा कोणत्याही वेळी त्या विवाहित पक्षांना एकमेकांच्या बाबतीत समागमसंधी नव्हती, असे दाखवून दिले जाऊ शकत नसेल तर, ती व्यक्ती, त्या पुरुषाचे औरस मूल आहे याचा निर्णायक पुरावा असेल.

**विवाहित स्त्रीला आत्महत्या करण्यास अपप्रेरणा देण्यासंबंधीचे गृहीतक.**

**११७.** जेव्हा विवाहित स्त्रीने केलेल्या आत्महत्त्येला तिच्या पतीने किंवा तिच्या पतीच्या कोणत्याही नातेवाईकाने अपप्रेरणा दिली होती किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवला असेल आणि तिने आपल्या विवाहाच्या तारखेपासून सात वर्षांच्या कालावधीत आत्महत्या केली आहे व तिचा पती किंवा तिच्या पतीचा असा नातेवाईक याने तिला क्रूर वागणूक दिली होती हे दाखवून देण्यात येईल तेव्हा, त्या प्रकरणाची इतर सर्व परिस्थिती लक्षात घेऊन न्यायालयाला असे गृहीत धरता येईल की, अशा आत्महत्त्येस तिच्या पतीने किंवा तिच्या पतीच्या अशा नातेवाईकाने अपप्रेरणा दिली होती.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनार्थ, "क्रूर वागणूक देणे" यास, भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम ८६ मध्ये जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

**हुंडाबळी बाबतचे गृहीतक.**

**११८.** एखाद्या व्यक्तीने, एखाद्या स्त्रीचा हुंडाबळी घेतला आहे किंवा कसे असा प्रश्न असेल आणि अशा स्त्रीच्या मृत्यूपूर्वी लगेचच असे दर्शविण्यात आले असेल की, हुंड्यासाठी किंवा हुंड्याच्या कोणत्याही मागणीच्या संबंधात, अशा व्यक्तीकडून त्या स्त्रीला क्रूरतेने वागविले जात होते किंवा तिला सतावण्यात येत होते तर, न्यायालय, अशी व्यक्ती, हुंडाबळीला कारणीभूत झाल्याचे गृहीत धरील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "हुंडाबळी" यास भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम ८० मध्ये जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

**न्यायालयाला विवक्षित तथ्यांचे अस्तित्व गृहीत धरता येईल.**

**११९.** (१) नैसर्गिक घटना, मानवी वर्तन आणि सार्वजनिक व खाजगी व्यवहार यांच्या सामान्यक्रमाचा विशिष्ट प्रकरणाच्या तथ्याशी असलेला संबंध लक्षात घेता, जे कोणतेही तथ्य घडून आले असण्याचा संभव आहे असे न्यायालयाला वाटते त्याचे अस्तित्व त्याला गृहीत धरता येईल.

**उदाहरणे.**

(क) चोरी झाल्यानंतर थोड्याच वेळात चोरीचा माल ज्याच्या कब्जात सापडेल तो मनुष्य आपल्या कब्जाबद्दल खुलासा करू न शकल्यास, एकतर तो चोर आहे किंवा तो माल चोरीचा असल्याचे माहीत असताना त्याने तो स्वीकारला आहे;

(ख) सहअपराधीच्या म्हणण्याला महत्त्वाच्या तपशीलाबाबत पुष्टी न मिळाल्यास, तो विश्वासाला अपात्र आहे;

(ग) विनिमयपत्र स्वीकृत किंवा पृष्ठांकित केलेले असल्यास, ते सुयोग्य प्रतिफलार्थ स्वीकारण्यात किंवा पृष्ठांकित करण्यात आले होते;

(घ) एखाद्या वस्तूचे किंवा परिस्थितीचे अस्तित्व सामान्यतः जितक्या अवधीच्या आत

संपुष्टात येते त्याहून अल्प अवधीमध्ये ती अस्तित्वात असल्याचे दाखवून देण्यात आले तर, ती अजूनही अस्तित्वात आहे;

(ङ) न्यायिक व शासकीय कृती नियमितपणे करण्यात आल्या आहेत;

(च) विशिष्ट प्रकरणी सामान्य व्यवहारक्रम अनुसरण्यात आला होता;

(छ) जो पुरावा हजर करणे शक्य असताना, हजर करण्यात आलेला नाही, जर तो हजर केला असेल तर, जिने तो रोखून ठेवला त्या व्यक्तीला तो प्रतिकूल ठरेल;

(ज) एखाद्या माणसावर ज्या प्रश्नाचे उत्तर देण्याची विधितः सक्ती नाही त्याचे उत्तर देण्यास त्याने नकार दिला तर, उत्तर दिल्यास, ते त्याला प्रतिकूल ठरेल;

(झ) आबंधन निर्माण करणारा दस्तऐवज, जेव्हा आबद्ध व्यक्तीच्या हातात असेल तेव्हा, आबंधन नष्ट झाले आहे,

असे न्यायालयाला गृहीत धरता येईल.

(२) न्यायालय, त्याच्यासमोर असलेल्या विशिष्ट प्रकरणाला अशी सूत्रे लागू पडतात किंवा नाही याचा विचार करताना, पुढील तथ्यांसारखी तथ्ये देखील विचारात घेईल :—

(एक) उदाहरण (क) बाबत.- खूण केलेल्या रुपयाची चोरी झाल्यानंतर तो एका दुकानदाराकडे त्याच्या गल्ल्यात सापडतो, आणि त्याच्या कब्जाबद्दल तो स्पष्टपणे खुलासा करू शकत नाही, परंतु आपल्या धंद्याच्या व्यवहारक्रमानुसार तो अनेक रुपये सतत स्वीकारत आलेला आहे;

(दोन) उदाहरण (ख) बाबत. -विवक्षित यंत्रसामग्रीची मांडणी करताना हयगयीच्या कृत्याने एका माणसाच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याबद्दल सर्वोत्तम चारित्र्याच्या एका व्यक्तीची न्यायचौकशी करण्यात येते, तितकेच चांगले चारित्र्य असलेला 'ख' यानेही त्या मांडणीत भाग घेतला होता व नेमके काय करण्यात आले होते याचे तो वर्णन करतो, आणि झालेला निष्काळजीपणा 'क' व तो स्वतः या दोघांचाही मिळून होतो हे कबूल करून त्याबद्दल खुलासा करतो;

(तीन) उदाहरण (ख) बाबत. - एक गुन्हा अनेक व्यक्तींनी केलेला जाहे. गुन्हेगारांपैकी 'क', 'ख' व 'ग' हे तिघेजण जागच्या जागीच पकडले गेले असून त्यांना एकमेकांपासून अलग ठेवण्यात आले आहे. जेणेकरून 'घ' गोवला जाईल अशा प्रकारे प्रत्येकजण गुन्ह्याचा वृत्तांत देतो, आणि ते वृत्तांत एकमेकांना अशा तऱ्हेने पुष्टी देतात की, ज्यामुळे पूर्व संगनमत असणे हे अत्यंत असंभाव्य ठरते;

(चार) उदाहरण (ग) बाबत.- विनिमयपत्राचा विकर्षक 'क' हा धंदेवाला माणूस होता. 'ख' हा स्वीकर्ता अल्पवयीन व अज्ञान असून, तो पूर्णपणे 'क' च्या वर्चस्वाखाली होता;

(पाच) उदाहरण (घ) बाबत.- एक नदी पाच वर्षांपूर्वी विवक्षित मार्गाने वाहत होती, परंतु, त्या वेळेपासून पूर आलेले आहेत असे कळते, त्यामुळे तिचा मार्ग बदलला असण्याची शक्यता आहे;

(सहा) उदाहरण (ङ) बाबत.- जिची नियमितता प्रश्नास्पद आहे त्या न्यायिक कृतीचे पालन अपवादात्मक परिस्थितीत करण्यात आले होते;

(सात) उदाहरण (च) बाबत.- एक पत्र मिळाले होते किंवा कसे हा प्रश्न आहे. ते डाकेत टाकले होते हे दाखवून देण्यात आले आहे, परंतु, अडथळे आल्यामुळे डाकेच्या नित्यक्रमात व्यत्यय आला होता;

(आठ) उदाहरण (छ) बाबत.- जिच्यावरुन एखाद्या मनुष्यावर दावा लावण्यात आला आहे अशा कमी महत्त्वाच्या एखाद्या संविदेशी ज्याचा संबंध पोचू शकेल, परंतु, ज्यामुळे त्याच्या कुटुंबियांच्या भावनांना व लौकिकाला धक्का पोचेल असा दस्तऐवज हजर करण्यास तो नकार देतो;

(नऊ) उदाहरण (ज) बाबत .- एखाद्या माणसावर ज्या प्रश्नाचे उत्तर देण्याची विधितः सक्ती नाही त्याचे उत्तर देण्यास तो नकार देतो, परंतु, ज्या बाबतीत तो प्रश्न विचारला गेला आहे तिच्याशी संबंधित नसलेल्या बाबतीत अशा उत्तरामुळे त्याचे नुकसान होऊ शकेल;

(दहा) उदाहरण (झ) बाबत. -एक बंधपत्र आबंधकाच्या कब्जात आहे, परंतु, प्रकरणाची परिस्थिती अशी दिसते की, ते त्याने चोरलेले असण्याची शक्यता आहे.

**१२०.** भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम ६४ च्या पोट-कलम (२) खालील बलात्काराच्या खटल्यामध्ये, जेव्हा आरोपीने लैंगिक संभोग केल्याचे शाबीत करण्यात आलेले असेल आणि ज्या स्त्रीवर बलात्कार करण्यात आल्याचे अभिकथन करण्यात आले आहे त्या स्त्रीच्या संमतीवाचून तो संभोग झाला होता किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवलेला असेल आणि आपण संमती दिली नव्हती असे त्या स्त्रीने न्यायालयासमोरील तिच्या साक्षीत कथन केलेले असेल तेव्हा, तिने संमती दिली नव्हती, असे न्यायालय गृहीत धरील. **बलात्कारासंबंधीच्या विवक्षित खटल्यामध्ये संमतीच्या अभावासंबंधीचे गृहीतक.**

**स्पष्टीकरण.–** या कलमातील "लैंगिक संभोग" याचा अर्थ, भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याच्या कलम ६३ मध्ये नमूद केलेल्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य, असा असेल.

प्रकरण आठ

## प्रतिष्टंभ

**१२१.** जेव्हा एखाद्या व्यक्तीने स्वतःचे अधिकथन, कृती किंवा अकृती याद्वारे एखादी गोष्ट खरी आहे असा दुसऱ्या व्यक्तीचा समज व्हावा व तिने तशा समजुतीने वागावे असे उद्देशपूर्वक योजून आणले असेल किंवा तिला तसे वागू दिले असेल तेव्हा, पहिल्या व्यक्तीला किंवा तिच्या प्रतिनिधीला ती पहिली व्यक्ती स्वतः व अशी दुसरी व्यक्ती किंवा तिचा प्रतिनिधी यांच्या दरम्यानच्या कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत त्या गोष्टींची सत्यता नाकबूल करू दिली जाणार नाही. **प्रतिष्टंभ.**

### उदाहरण.

विवक्षित जमीन 'क' ची आहे अशी 'क' उद्देशपूर्वक व खोटेपणाने 'ख' ची समजूत होऊ देतो आणि त्याद्वारे, ती विकत घेऊन तिची किंमत देण्यास 'ख' ला प्रवृत्त करतो. त्यानंतर ती जमीन, 'क' ची मालमत्ता होती व आपणास विक्रीच्या वेळी कोणताही मालकीहक्क नव्हता या कारणावरून तो विक्री रद्द करू पाहतो. त्याला स्वतःचा स्वत्वाधिकार नव्हता असे शाबीत करू देता कामा नये.

**१२२.** स्थावर मालमत्तेच्या भाडेकऱ्याच्या जमीनमालकाचा, अशा भाडेदारीच्या प्रारंभी अशा स्थावर मालमत्तेवर मालकीहक्क होता ही गोष्ट, अशा भाडेकऱ्याला किंवा अशा भाडेकऱ्यामार्फत दावा सांगणाऱ्या व्यक्तीला, भाडेदारी चालू असताना किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी नाकबूल करू दिली जाणार नाही; आणि कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या कब्जेदार व्यक्तीच्या अनुज्ञप्तीने त्या मालमत्तेच्या ठिकाणी आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, अशी अनुज्ञप्ती देण्यात आली त्यावेळी अशा मालमत्तेचा कब्जा जिच्याकडे होता त्या व्यक्तीला, अशा कब्जाबाबत मालकीहक्क होता हे नाकबूल करू दिले जाणार नाही. **भाडेकऱ्याला व कब्जाधारक व्यक्तीकडून अनुज्ञप्ती मिळालेल्या व्यक्तीला प्रतिष्टंभ.**

**१२३.** कोणत्याही विनिमयपत्राच्या आदेशकाला ते काढण्याचा किंवा पृष्ठांकित करण्याचा प्राधिकार होता हे अशा विपत्राच्या स्वीकारकर्त्याला नाकबूल करू दिले जाणार नाही; तसेच जेव्हा निक्षेपाचा किंवा अनुज्ञप्तीचा प्रारंभ झाला त्यावेळी असे निक्षेप करण्याचा किंवा अशी अनुज्ञप्ती देण्याचा आपल्या निक्षेपकाला किंवा अनुज्ञापकाला प्राधिकार होता हे कोणत्याही निक्षेपग्राहीला किंवा अनुज्ञप्तिधारकाला नाकबूल करू दिले जाणार नाही. **विनिमयपत्राचा स्वीकारकर्ता, निक्षेपग्राही किंवा अनुज्ञप्तीधारक यांना प्रतिष्टंभ.**

**स्पष्टीकरण १.–** एखादे विनिमयपत्र ज्या व्यक्तीने काढले असल्याचे दिसते ते तिनेच खरोखर काढलेले होते हे त्या विपत्राच्या स्वीकारकर्त्याला नाकबूल करता येईल.

**स्पष्टीकरण २.–** जर निक्षेपग्राहीने, निक्षेपित माल निक्षेपकाव्यतिरिक्त अन्य व्यक्तीकडे सुपूर्द केला तर, अशा व्यक्तीला, निक्षेपकाच्या विरुद्ध त्यावर हक्क होता असे तिला शाबीत करता येईल.

प्रकरण नऊ

## साक्षीदारांसंबंधी

**कोणाला साक्ष देता येईल.**

**१२४.** सर्व व्यक्ती साक्ष देण्यास सक्षम असतील, मात्र त्यांना विचारलेले प्रश्न समजून घेण्यास किंवा त्या प्रश्नांना संयुक्तिक उत्तरे देण्यास कोवळ्या वयामुळे, अतिवार्धक्यामुळे, शारीरिक किंवा मानसिक रोगामुळे अथवा त्याच प्रकारच्या अन्य कोणत्याही कारणाने त्या असमर्थ आहेत असे न्यायालयाला वाटत असेल तर, तो अपवाद समजावा.

**स्पष्टीकरण.** – अविकल मनाची व्यक्ती, जर तिला विचारले जाणारे प्रश्न समजून घेण्यापासून व त्यांची संयुक्तिक उत्तरे देण्यापासून तिच्या अविकल मनामुळे तिला प्रतिबंध होत नसेल तर, ती साक्ष देण्यास अक्षम नसते.

**शाब्दिक संवाद साधण्यास असमर्थ असलेला साक्षीदार.**

**१२५.** जो साक्षीदार बोलू शकत नाही तो साक्षीदार, लिहिणे किंवा खाणाखुणा करणे यासारख्या ज्या इतर कोणत्याही रीतीने आपली साक्ष सुबोध करू शकेल त्या रीतीने त्याची साक्ष देऊ शकेल; परंतु असे लिहिणे हे, लेखी असले पाहिजे आणि खाणाखुणा, खुल्या न्यायालयामध्ये केल्या पाहिजे आणि अशा प्रकारे दिलेली साक्ष ही, तोंडी साक्षीपुरावा असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, जर साक्षीदार शाब्दिक संवाद साधण्यास असमर्थ असेल तर, न्यायालय, कथन नोंदवून घेताना, दुभाषीची किंवा विशेष शिक्षकाची मदत घेईल आणि, अशा कथनाचे दृकश्राव्य चित्रण करण्यात येईल.

**विवक्षित प्रकरणांमध्ये साक्षीदार म्हणून पतीची व पत्नीची सक्षमता.**

**१२६.** (१) सर्व दिवाणी कार्यवाहींमध्ये दाव्यातील पक्षकार व दाव्यातील कोणत्याही पक्षकाराचा पती किंवा पत्नी हे साक्षीदार होण्यास सक्षम असतील.

(२) कोणत्याही व्यक्तीविरुद्ध चाललेल्या फौजदारी कार्यवाहीत, अशा व्यक्तीचा, अनुक्रमे, पती किंवा पत्नी, सक्षम साक्षीदार असेल.

**न्यायाधीश व दंडाधिकारी.**

**१२७.** कोणताही न्यायाधीश किंवा दंडाधिकारी याच्यावर, तो ज्याला दुय्यम असेल अशा एखाद्या न्यायालयाच्या विशेष आदेशाखेरीज, असा न्यायाधीश किंवा दंडाधिकारी म्हणून न्यायालयातील त्याच्या स्वतःच्या वर्तनाच्या अथवा असा न्यायाधीश किंवा दंडाधिकारी म्हणून न्यायालयात त्याला ज्ञात झालेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्याची सक्ती केली जाणार नाही; परंतु, तो ते काम करीत असताना, त्याच्या समक्ष घडलेल्या अन्य गोष्टींबाबत त्याची साक्षतपासणी करता येईल.

### उदाहरणे.

(क) सत्र न्यायालयापुढे स्वतःची न्यायचौकशी झाल्यावर, 'क' म्हणतो की, " 'ख' या दंडाधिकाऱ्याने माझी जबानी अयोग्यपणे घेतली होती." वरिष्ठ न्यायालयाच्या विशेष आदेशाखेरीज, याबाबतच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची 'ख' वर सक्ती करता येत नाही.

(ख) 'ख' या दंडाधिकाऱ्यापुढे खोटा पुरावा दिल्याबद्दल 'क' वर सत्र न्यायालयात आरोप ठेवण्यात आला आहे. 'क' ने काय म्हटले हे, 'ख' ला वरिष्ठ न्यायालयाच्या विशेष आदेशाखेरीज विचारता येत नाही.

(ग) 'ख' या सत्र न्यायाधीशासमोर 'क' ची न्यायचौकशी चालू असताना, एका पोलीस अधिकाऱ्याचा खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल 'क' वर सत्र न्यायालयात आरोप ठेवण्यात आला आहे. काय घडले याबद्दल 'ख' ची साक्षतपासणी करता येईल.

**वैवाहिक जीवनाच्या काळातील संवाद.**

१२८. जी व्यक्ती विवाहित आहे किंवा होती तिच्यावर, जी कोणतीही व्यक्ती तिच्याशी विवाहबद्ध झाली आहे किंवा होती तिने त्या पहिल्या व्यक्तीशी वैवाहिक जीवनाच्या काळात केलेले कोणतेही संभाषण प्रकट करण्याची सक्ती केली जाणार नाही; तसेच विवाहित व्यक्तींमधील दावे किंवा एका विवाहित व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीविरुद्ध केलेल्या कोणत्याही गुन्ह्याबद्दल ज्या कार्यवाहीत फिर्याद मांडली जाईल ती खेरीजकरून एरव्ही, असा कोणताही संवाद करणाऱ्या व्यक्तीने किंवा तिच्या हितसंबंधित प्रतिनिधीने संमती दिल्याशिवाय, तो संवाद, प्रकट करण्यास पहिल्या व्यक्तीला परवानगी दिली जाणार नाही.

**राज्याच्या कारभारासंबंधीचा पुरावा.**

१२९. राज्याच्या कोणत्याही कारभारासंबंधीच्या अप्रकाशित शासकीय अभिलेखामधून उपलब्ध होणारा कोणताही पुरावा देण्यास संबंधित विभागाच्या मुख्याधिकाऱ्याच्या परवानगीखेरीज परवानगी दिली जाणार नाही आणि तो मुख्याधिकारी, स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणे अशी परवानगी देईल किंवा अडवून ठेवील .

**कार्यालयीन निवेदन.**

१३०. कोणत्याही लोक अधिकाऱ्याला, पदजन्य विश्वासाने त्यांच्याकडे केलेले निवेदन प्रकट केल्यामुळे सार्वजनिक हिताला बाध येईल असे जेव्हा वाटत असेल तेव्हा, ते प्रकट करण्याची त्याच्यावर सक्ती केली जाणार नाही.

**अपराध घडल्यासंबंधी माहिती.**

१३१. कोणत्याही दंडाधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला, कोणताही अपराध घडल्याची कोणतीही माहिती कोठून मिळाली हे सांगण्याची त्याच्यावर सक्ती केली जाणार नाही आणि कोणत्याही महसूल अधिकाऱ्याला, सार्वजनिक महसुलासंबंधी कोणताही अपराध घडल्याची कोणतीही माहिती कोठून मिळाली हे सांगण्याची त्याच्यावर सक्ती केली जाणार नाही.

**स्पष्टीकरण.–** "महसूल अधिकारी" याचा अर्थ, सार्वजनिक महसुलासंबंधी कोणत्याही शाखेच्या कामावर किंवा त्यासंबंधात नेमलेला कोणताही अधिकारी, असा आहे.

**व्यावसायिक निवेदन.**

१३२. (१) कोणत्याही अधिवक्त्याला, असा अधिवक्ता म्हणून त्याची सेवा करीत असतानाच्या काळात आणि त्या प्रयोजनार्थ, त्याच्या अशिलाने किंवा अशिलाच्या वतीने केलेले कोणतेही निवेदन, प्रकट करण्यास अथवा आपल्या व्यावसायिक सेवेच्या काळात आणि त्या प्रयोजनासाठी त्याला ज्या कोणत्याही दस्तऐवजाची माहिती करून घ्यावी लागली असेल त्याचा मजकूर किंवा शर्त सांगण्यास, अथवा अशा सेवेच्या काळात व त्या प्रयोजनासाठी त्याने आपल्या अशिलाला दिलेला कोणताही सल्ला प्रकट करण्यास, त्याला त्याच्या अशिलाच्या संमतीशिवाय परवानगी दिली जाणार नाही :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे,–

(क) कोणत्याही अवैध प्रयोजनाच्या पुरःसरणार्थ केलेला असा कोणताही संपर्कव्यवहार;

(ख) असा अधिवक्ता म्हणून त्याची सेवा करीत असतानाच्या काळात त्याची सेवा सुरू झाल्यानंतर कोणताही गुन्हा घडून आल्याचे किंवा कपट करण्यात आल्याचे दर्शविणारे जे कोणतेही तथ्य अधिवक्त्याच्या निदर्शनाला आले असेल ते तथ्य,

प्रकट करण्यापासून संरक्षण मिळणार नाही.

(२) अशा तथ्याकडे पोट-कलम (१)च्या परंतुकांमध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा, अधिवक्त्याचे लक्ष, त्याच्या अशिलाने किंवा त्याच्या वतीने वेधलेले होते किंवा कसे हे गौण आहे.

**स्पष्टीकरण.–** या कलमात नमूद केलेले आबंधन, व्यावसायिक सेवा संपल्यानंतरही चालू राहते.

**उदाहरणे.**

(क) 'क' हा अशील 'ख' या अधिवक्त्याला म्हणतो- "मी बनावट दस्तऐवज केला आहे व तुम्ही माझा बचाव करावा अशी माझी तुम्हाला विनंती आहे." दोषी असल्याचे माहीत असलेल्या माणसाचा बचाव हे गुन्हेगारी प्रयोजन नसल्यामुळे या निवेदनाला प्रकटनावरील बंधनाचे संरक्षण आहे.

(ख) 'क' हा अशील, 'ख' या अधिवक्त्याला म्हणतो— " एका बनावट विलेखाचा वापर करून मालमत्तेचा कब्जा घेण्याची माझी इच्छा आहे व त्या विलेखावरून दावा लावण्याची मी तुम्हाला विनंती करतो." गुन्हेगारी प्रयोजनाच्या पुरःसरणार्थ हे निवेदन केले गेल्यामुळे, त्याला प्रकटनावरील बंधनाचे संरक्षण नाही.

(ग) 'क' वर अफरातफरीचा दोषारोप असून तो आपला बचाव करण्यासाठी 'ख' या अधिवक्त्याला नेमतो. कार्यवाहीच्या ओघात, 'ख' च्या असे नजरेस येते की, 'क' ने तथाकथित अफरातफर केलेली रक्कम 'क' कडून येणे असल्याचे दाखवणारी नोंद 'क' च्या हिशेबवहीत करण्यात आली आहे व ती नोंद त्याच्या व्यावसायिक सेवेच्या प्रारंभी त्या वहीत नव्हती. कार्यवाही सुरू झाल्यानंतर कपट करण्यात आले आहे असे दाखवणारे हे तथ्य त्याच्या सेवेच्या काळात 'क' च्या नजरेस आल्यामुळे ते प्रकटन करण्यापासून संरक्षण नाही.

(३) या कलमाच्या तरतुदी, दुभाष्यांना आणि अधिवक्त्याच्या लिपिकांना किंवा सेवकांना लागू असतील.

**स्वेच्छापूर्वक पुरावा दिल्याने विशेष हक्क वर्जिला जात नाही.**

**१३३.** जर दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने, त्यात स्वतः होऊन किंवा अन्यथा पुरावा दिला तर, त्यामुळे कलम १३२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अशा गोष्टी प्रकट करण्याला त्याने संमती दिली असल्याचे मानले जाणार नाही; आणि जर दाव्यातील किंवा कार्यवाहीतील पक्षकाराने, अशा कोणत्याही अधिवक्त्याला साक्षीदार म्हणून बोलावले तर, प्रश्न विचारण्यात आल्याशिवाय, अधिवक्त्याला ज्या बाबी प्रकट करण्याची मुभा असणार नाही त्यांबाबत त्या पक्षकाराने असे प्रश्न विचारले तरच केवळ त्या याप्रमाणे प्रकट केले जाण्यास त्याने संमती दिली असल्याचे मानले जाईल.

**विधि सल्लागारांकडे केलेली गोपनीय निवेदने.**

**१३४.** एखादी व्यक्ती व तिचा विधि सल्लागार यांच्यामध्ये झालेले कोणतेही निवेदन, तिने साक्षीदार होण्याची तयारी दर्शविल्याशिवाय, न्यायालयाकडे प्रकट करण्याची तिच्यावर सक्ती केली जाणार नाही आणि तिने तसे केल्यास, त्या बाबतीत, तिने दिलेल्या कोणत्याही पुराव्याचा खुलासा होण्यासाठी न्यायालयाला आवश्यक वाटेल असे कोणतेही निवेदन प्रकट करण्याची तिच्यावर सक्ती करता येईल, परंतु, इतर निवेदनांबाबत सक्ती करता येणार नाही.

**पक्षकार नसलेल्या साक्षीदाराने हक्क विलेख हजर करणे.**

**१३५.** जो साक्षीदार दाव्यातील पक्षकार नाही त्याचे कोणत्याही मालमत्तेबाबतचे हक्क-विलेख अथवा ज्याच्या आधारे त्याने एखादी मालमत्ता तारणग्राही किंवा गहाणधारक म्हणून धारण केली असेल असा कोणताही दस्तऐवज अथवा जो कोणताही दस्तऐवज हजर करण्याने तो गुन्ह्यात गोवला जाण्याची शक्यता आहे तो दस्तऐवज हजर करण्याची मागणी करण्याऱ्या व्यक्तीशी किंवा तिच्यामार्फत दावा सांगणाऱ्या एखाद्या व्यक्तीशी त्याने असे विलेख हजर करण्याचा लेखी करार केला असल्याशिवाय, ते हजर करण्याची त्याच्यावर सक्ती केली जाणार नाही.

**जे दस्तऐवज किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेख दुसऱ्या व्यक्तीच्या कब्जात असताना, ते हजर करण्यास ती व्यक्ती नकार देऊ शकली असती ते दस्तऐवज किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेख हजर करणे.**

**१३६.** एखाद्या व्यक्तीच्या कब्जात असलेले जे दस्तऐवज किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेले जे इलेक्ट्रॉनिक अभिलेख, अन्य कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणात असते तर ते हजर करण्याला नकार देण्यास ती हक्कदार झाली असती ते हजर करण्यास, लगतपूर्वी उल्लेखिलेल्या अशा व्यक्तीने संमती दिल्याशिवाय, ते दस्तऐवज किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेख हजर करण्याची पहिल्या व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.

**१३७.** कोणत्याही दाव्यातील अथवा कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीतील वादनिविष्ट बाबीशी संबद्ध अशा कोणत्याही बाबीसंबंधीच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर दिल्याने साक्षीदार गुन्ह्यात गोवला जाईल अथवा तो प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे गोवला जाण्यास ते उत्तर साधक होईल अथवा त्यामुळे असा साक्षीदार कोणत्याही प्रकारच्या शास्तीस किंवा समपहरणास पात्र होईल अथवा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पात्र होण्यास ते उत्तर साधक होईल या कारणावरून, अशा प्रश्नाचे उत्तर देण्यापासून साक्षीदाराला सुट दिली जाणार नाही : **एखाद्या उत्तरामुळे साक्षीदार गुन्ह्यात गोवला जाईल या कारणामुळे उत्तर देण्यापासून सूट नसणे.**

परंतु, जे उत्तर देण्याची साक्षीदारावर सक्ती केली जाईल अशा कोणत्याही उत्तरामुळे, तो कोणत्याही अटकेला किंवा खटल्याला पात्र होणार नाही, अथवा अशा उत्तराच्या रूपाने खोटा पुरावा दिल्याबद्दलचा खटला खेरीजकरून, अन्य कोणत्याही फौजदारी कार्यवाहीत, ते त्याच्याविरुद्ध शाबीत केले जाणार नाही.

**१३८.** सहअपराधी हा आरोपीविरुद्ध सक्षम साक्षीदार असेल; आणि जर दोषसिद्धी ही सहअपराध्याच्या पुष्टीदायक साक्षीवरून निष्पन्न झालेली असेल तर, दोषसिद्धी अवैध होत नाही. **सहअपराधी.**

**१३९.** कोणत्याही तथ्याच्या शाबितीसाठी कोणत्याही प्रकरणी, साक्षीदारांची ठराविक संख्या असण्याची आवश्यकता असणार नाही. **साक्षीदारांची संख्या.**

प्रकरण दहा

## साक्षीदारांच्या साक्षतपासणीविषयी

**१४०.** कोणत्या क्रमाने साक्षीदार हजर केले जातील व त्यांची साक्षतपासणी केली जाईल त्याबाबत अनुक्रमे दिवाणी व फौजदारी प्रक्रियेसंबंधीच्या त्या वेळी असलेल्या कायद्याद्वारे व प्रथेनुसार विनियमन करण्यात येईल आणि अशा कोणत्याही कायद्याच्या अभावी न्यायालयाच्या स्वविवेकानुसार विनियमन करण्यात येईल. **साक्षीदार हजर करण्याबाबतचा व त्यांची साक्षतपासणी करण्याबाबतचा क्रम.**

**१४१.** (१) जेव्हा एखादा पक्षकार कोणत्याही तथ्याबद्दल पुरावा देऊ पाहात असेल तेव्हा, अभिकथित तथ्य शाबीत झाले तर कशा प्रकारे तो संबद्ध होईल ते, न्यायाधीश पुरावा देऊ पाहणाऱ्या पक्षकाराला विचारू शकेल, आणि ते तथ्य शाबीत झाले तर तो पुरावा संबद्ध होईल असे न्यायाधीशाला वाटले तर न्यायाधीश तो पुरावा स्वीकृत करील, मात्र अन्यथा नाही. **पुराव्याच्या स्वीकार्यतेसंबंधी न्यायाधीशाने निर्णय करणे.**

(२) जे शाबीत करावयाचे म्हणून पुढे मांडले आहे असे तथ्य हे जर अन्य एखाद्या तथ्याची शाबिती झाल्यावरच ज्याचा पुरावा स्वीकार्य होतो अशा स्वरूपाचे तथ्य असेल तर, अशा तथ्याचा पुरावा देण्याचे पक्षकाराने अभिवचन दिले नसेल आणि अशा अभिवचनामुळे न्यायालयाचे समाधान झाले नसेल तर, प्रथम उल्लेखिलेल्या तथ्याचा पुरावा दिला जाण्यापूर्वी ते दुसरे तथ्य शाबीत करण्यात आले पाहिजे.

(३) जर एका अभिकथित तथ्याची संबद्धता दुसरे अभिकथित तथ्य आधी शाबीत केले जाण्यावर अवलंबून असेल तर, न्यायाधीश स्वविवेकानुसार एकतर दुसरे तथ्य शाबीत होण्यापूर्वी पहिल्या तथ्याचा पुरावा दिला जाण्यास परवानगी देऊ शकेल, किंवा पहिल्या तथ्याचा पुरावा दिला जाण्यापूर्वी दुसऱ्या तथ्याचा पुरावा देण्यास भाग पाडू शकेल.

### उदाहरणे.

(क) जिचे कथन कलम २६ खाली संबद्ध आहे त्या मृत असल्याचे अभिकथन केलेल्या व्यक्तीने संबद्ध तथ्यासंबंधी केलेले कथन, शाबीत करण्यास सुचविले आहे. ते कथन शाबीत करण्याचे सुचविणाऱ्या व्यक्तीने कथनाचा पुरावा देण्याआधी, ती व्यक्ती मृत आहे हे तथ्य शाबीत केले पाहिजे.

(ख) जो दस्तऐवज गहाळ झाल्याचे सांगण्यात आले आहे त्यातील मजकूर त्या दस्तऐवजाची प्रत हजर करून शाबीत करण्यास सुचविले आहे. प्रत हजर करण्याचे सुचविणाऱ्या व्यक्तीने मूळलेख गहाळ झाला आहे हे तथ्य, प्रत हजर करण्यापूर्वी शाबीत केले पाहिजे.

(ग) एखादी मालमत्ता ही चोरीची आहे हे माहीत असताना ती स्वीकारल्याचा आरोप 'क' वर आहे. ती मालमत्ता आपल्या कब्जात असल्याचे त्याने नाकबूल केले असे शाबीत करण्यास सुचविले आहे. मालमत्ता तीच आहे किंवा काय यावर नाकबुलीची संबद्धता अवलंबून आहे. न्यायालय स्वविवेकानुसार एकतर कब्जाबाबतची नाकबुली शाबीत केली जाण्यापूर्वी मालमत्तेची ओळख पटविणे आवश्यक करू शकेल किंवा मालमत्तेची ओळख पटवली जाण्याआधी कब्जाबाबतची नाकबुली शाबीत करण्यास परवानगी देऊ शकेल.

(घ) 'क' हे तथ्य वादनिविष्ट तथ्याचे निमित्तकारण किंवा परिणाम असल्याचे सांगण्यात आलेले असून ते शाबीत करण्यास सुचविले आहे. ख, ग, घ ही काही दरम्यानची तथ्ये असून 'क' हे तथ्य वादतथ्याचे निमित्तकारण किंवा परिणाम म्हणून मानले जाऊ शकण्यापूर्वी ती अस्तित्वात होती हे दाखवून दिले पाहिजे. न्यायालय एकतर ख, ग किंवा घ शाबीत होण्यापूर्वी क शाबीत करण्यास परवानगी देऊ शकेल किंवा क च्या शाबितीला परवानगी देण्यापूर्वी ख, ग व घ हे शाबीत करणे आवश्यक करू शकेल.

**साक्षीदारांची साक्षतपासणी.**

**१४२.** (१) एखाद्या साक्षीदाराला ज्या पक्षकाराने बोलावले असेल त्या साक्षीदाराने केलेल्या त्याच्या साक्षतपासणीला त्याची 'सरतपासणी' असे म्हटले जाईल.

(२) विरुद्ध पक्षकाराने केलेल्या साक्षीदाराच्या साक्षतपासणीस त्याची 'उलट तपासणी' असे म्हटले जाईल.

(३) एखाद्या साक्षीदाराला ज्या पक्षकाराने बोलवले असेल त्याने साक्षीदाराच्या उलट तपासणीनंतर केलेल्या त्याच्या साक्षतपासणीला, त्याची 'फेरतपासणी' असे म्हटले जाईल.

**साक्षतपासणीचा क्रम.**

**१४३.** (१) साक्षीदाराची प्रथम सरतपासणी होईल, त्यानंतर (विरुध्द पक्षकाराची तशी इच्छा असेल तर) उलट तपासणी होईल, नंतर (त्याला बोलावणाऱ्या पक्षकाराची तशी इच्छा असेल तर) फेरतपासणी होईल.

(२) सरतपासणी व उलटतपासणी संबद्ध तथ्यांशी संबंधित असल्या पाहिजेत, परंतु उलट तपासणी ही, साक्षीदाराने आपल्या सरतपासणीत ज्या तथ्याबद्दल साक्ष दिली त्यांच्यापुरती मर्यादित असण्याची गरज नाही.

(३) उलट तपासणीत निर्दिष्ट केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण करून घेण्याच्या दिशेने फेरतपासणीचा रोख असेल; आणि जर न्यायालयाच्या परवानगीने फेरतपासणीत नवीन बाब प्रस्तुत केली गेली तर, विरुद्ध पक्षकाराला त्या बाबीवर आणखी उलट तपासणी करता येईल.

**दस्तऐवज हजर करण्यासाठी बोलाविलेल्या व्यक्तीची उलट तपासणी.**

**१४४.** दस्तऐवज हजर करण्यासाठी समन्स काढण्यात आलेल्या व्यक्तीने तो हजर केला केवळ एवढ्याच कारणाने ती साक्षीदार होत नाही; आणि तिला साक्षीदार म्हणून बोलावण्यात आल्याशिवाय व येईतोपर्यंत तिची उलट तपासणी होऊ शकत नाही.

**चारित्र्याबाबतचे साक्षीदार.**

**१४५.** चारित्र्याबाबतच्या साक्षीदारांची उलट तपासणी व फेरतपासणी घेता येईल.

**उत्तरसूचक प्रश्न.**

**१४६.** (१) प्रश्नकर्त्या व्यक्तीने, इच्छिलेले किंवा अपेक्षिलेले उत्तरसूचित करणाऱ्या कोणत्याही प्रश्नाला, 'उत्तरसूचक प्रश्न' असे म्हटले जाते.

(२) उत्तरसूचक प्रश्नांना विरुद्ध पक्षकाराने आक्षेप घेतल्यास तसे प्रश्न सरतपासणीत किंवा फेरतपासणीत न्यायालयाच्या परवानगीखेरीज विचारता कामा नयेत.

(३) ज्या बाबी प्रस्तावात्मक किंवा निर्विवाद आहेत अथवा न्यायालयाच्या मते ज्या आधीच पुरेशा शाबीत झालेल्या आहेत त्या बाबीसंबंधीच्या उत्तरसूचक प्रश्नांना न्यायालय परवानगी देईल.

(४) उलट तपासणीत उत्तरसूचक प्रश्न विचारता येतील.

**लेखी बाबीसंबंधी पुरावा.**

**१४७.** कोणत्याही साक्षीदाराची साक्षतपासणी चालू असताना, ज्याविषयी तो पुरावा देत आहे अशी कोणतीही संविदा, देणगी किंवा अन्य संपत्तीव्यवस्था एखाद्या दस्तऐवजात निविष्ट नव्हती किंवा कसे असे त्याला विचारता येईल आणि ती त्यात निविष्ट होती असे जर तो म्हणाला किंवा जो कोणताही दस्तऐवज न्यायालयाच्या मते हजर करावयास हवा होता, त्यातील मजकुरासंबंधी कोणतेही कथन करण्याच्या तो बेतात असेल तर, असा दस्तऐवज हजर केला जाईपर्यंत अथवा त्या साक्षीदाराला बोलावणारा पक्षकार त्या दस्तऐवजाचा दुय्यम पुरावा देण्यास ज्यामुळे हक्कदार होतो ती तथ्ये शाबीत केली जाईपर्यंत विरुद्ध पक्षकार असा साक्षीपुरावा दिला जाण्यास आक्षेप घेऊ शकेल.

**स्पष्टीकरण.–** दस्तऐवजांच्या मजकुरासंबंधी अन्य व्यक्तींनी केलेली कथने हीच नेमकी संबद्ध तथ्ये असतील तर, साक्षीदाराला अशा कथनांचा तोंडी पुरावा देता येईल.

**उदाहरण.**

'क' ने 'ख' वर हमला केला होता किंवा कसे हा प्रश्न आहे. " 'ख' ने माझ्यावर चोरीचा आरोप करणारे पत्र लिहिले आणि मी त्याबद्दल त्याच्यावर सूड उगवणार आहे", असे 'क' हा 'घ' ला म्हणत असताना, आपण ते ऐकले अशी 'ग' अभिसाक्ष देतो. 'क' चा हमल्यामागील हेतू दाखवणारे म्हणून हे कथन संबद्ध आहे, आणि पत्राविषयी अन्य कोणताही पुरावा दिलेला नसला तरी याचा पुरावा देता येईल.

**पूर्वीच्या लेखी कथनासंबंधी उलट तपासणी.**

**१४८.** एखाद्या साक्षीदाराने, पूर्वी जी कथने लेखी रूपात केलेली असतील किंवा त्याची पूर्वीची जी कथने लेखनिविष्ट करण्यात आली असतील व प्रश्नास्पद बाबींशी संबद्ध असतील त्याबाबतीत, असा लेख त्याला दाखविल्याशिवाय किंवा शाबीत करण्यात आल्याशिवाय, त्याची उलटतपासणी करता येईल; परंतु, जर त्या लेखाद्वारे त्याच्या कथनांमधील विरोध दाखवून देणे हा त्यामागील उद्देश असेल तर, लेख शाबीत होऊ शकण्यापूर्वी त्याच्या कथनांतील विरोध दाखवून देण्यासाठी त्या लेखातील जे भाग वापरावयाचे असतील त्यांच्याकडे त्याचे लक्ष वेधले पाहिजे.

**उलट तपासणीत कायदेशीर असलेले प्रश्न.**

**१४९.** जेव्हा साक्षीदाराची उलट तपासणी होईल तेव्हा, यात यापूर्वी निर्दिष्ट केलेल्या प्रश्नाशिवाय, आणखी त्याला पुढील प्रकारचे प्रश्न विचारता येतील, अशा कोणत्याही प्रश्नांचा रोख,-

(क) त्याच्या सत्यवादित्वाची परीक्षा घेण्याकडे; किंवा

(ख) तो कोण आहे व त्याचे जीवनातील स्थान काय आहे याचा शोध घेण्याकडे; किंवा

(ग) त्याच्या चारित्र्याला धक्का पोचवून त्याची विश्वासपात्रता डळमळीत करण्याकडे असतो अशा प्रश्नांची उत्तरे, तो प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे गुन्ह्यात गोवला जाण्यास साधक असली अथवा त्यामुळे तो शास्तीला किंवा समपहरणाला पात्र होणार असला अथवा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे तो त्यास पात्र होण्यास ती उत्तरे साधक असली तरी, असे प्रश्न विचारता येतील :

परंतु, भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याच्या कलम ६४, कलम ६५, कलम ६६, कलम ६७, कलम ६८, कलम ६९, कलम ७० किंवा कलम ७१ या खालील अपराधाच्या किंवा असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न केल्याच्या खटल्यामध्ये, जेव्हा संमतीचा प्रश्न हा वादप्रश्न असेल त्या बाबतीत, अशी संमती किंवा संमतीची गुणवत्ता शाबीत करण्यासाठी, पीडित व्यक्तीच्या सर्वसाधारण अनैतिक चारित्र्याचा पुरावा अथवा अशा पीडित व्यक्तीचा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबरचा पूर्वीचा लैंगिक अनुभवाचा पुरावा दाखल करण्यास किंवा त्या व्यक्तीच्या उलटतपासणीत त्याबाबत प्रश्न विचारण्यास, परवानगी असणार नाही.

**साक्षीदारावर उत्तर देण्याची सक्ती केव्हा करावयाची.**

**१५०.** जर असा कोणताही प्रश्न, दाव्याशी किंवा कार्यवाहीशी संबंध असलेल्या बाबींशी संबंध असेल तर, कलम १३७ च्या तरतुदी, त्याला लागू होतील.

**प्रश्न केव्हा विचारावयाचे व साक्षीदारावर उत्तर देण्याची सक्ती केव्हा करावयाची ते न्यायालयाने ठरवणे.**

**१५१.** (१) जर असा कोणताही प्रश्न दाव्याशी किंवा कार्यवाहीशी संबंद्ध नसलेल्या बाबींशी संबंधित असेल तर, तो प्रश्न जेथवर साक्षीदाराच्या चारित्र्याला धक्का पोहचवून त्याच्या विश्वासपात्रतेला बाधा आणत असेल तेथवर ते खेरीजकरून एरव्ही, साक्षीदारावर त्याचे उत्तर देण्याची सक्ती करावी की नाही हे न्यायालय ठरवील, आणि जर त्याला योग्य वाटले तर, ते साक्षीदाराला, उत्तर देणे त्याच्यावर बंधनकारक नाही असा इशारा देऊ शकेल.

(२) आपल्या विवेकाधिकाराचा वापर करताना, न्यायालय पुढील गोष्टी विचारात घेऊन त्याप्रमाणे विचार करील :—

(क) अशा प्रश्नांनी सूचित होणाऱ्या अभ्यारोपाच्या सत्यासत्यतेमुळे, साक्षीदार ज्या बाबीविषयी साक्ष देतो त्या बाबीपुरता, तो कितपत विश्वासार्ह आहे यासंबंधीच्या न्यायालयाच्या मतावर गंभीर परिणाम होऊ शकेल अशा स्वरूपाचे ते प्रश्न असल्यास, ते प्रश्न योग्य आहेत;

(ख) अशा प्रश्नांनी सूचित होणाऱ्या अभ्यारोपाच्या सत्यासत्यतेमुळे, साक्षीदार ज्या बाबीविषयी साक्ष देतो त्या बाबीपुरता, तो कितपत विश्वासार्ह आहे यासंबंधीच्या न्यायालयाच्या मतावर त्यामुळे परिणाम होऊ शकणार नाही किंवा अगदी अल्पसा परिणाम होऊ शकेल इतक्या दीर्घ काळापूर्वीच्या किंवा अशा स्वरूपाच्या बाबींशी तो अभ्यारोप संबंधित असल्यास, ते प्रश्न अयोग्य आहेत;

(ग) जर साक्षीदाराच्या चारित्र्यावर केलेल्या अभ्यारोपाचे महत्त्व व त्याच्या साक्षीचे महत्त्व यांत फार मोठी तफावत असेल तर, असे प्रश्न अयोग्य आहेत;

(घ) न्यायालय, उत्तर देण्यास साक्षीदाराने दिलेल्या नकारावरून त्याला योग्य वाटल्यास, उत्तर दिले गेल्यास, ते प्रतिकूल ठरण्याची शक्यता आहे असे अनुमान काढू शकेल.

**सम्यक आधार कारणांशिवाय प्रश्न विचारावयाचा नाही.**

**१५२.** कलम १५१ मध्ये निर्दिष्ट केलेला असा कोणताही प्रश्न, तो विचारणाऱ्या व्यक्तीला, त्या प्रश्नातून सूचित होणाऱ्या अभ्यारोपाला सम्यक आधार आहे असे मानण्यास वाजवी आधारकारणे असल्याशिवाय, विचारला जाऊ नये.

**उदाहरणे.**

(क) एक महत्त्वाचा साक्षीदार हा एक डाकू आहे अशी माहिती एका अधिवक्त्याने दुसऱ्या अधिवक्त्याला दिलेली आहे. साक्षीदार स्वतः डाकू आहे किंवा कसे असे त्याला विचारण्यासाठी हे वाजवी आधारकारण आहे.

(ख) एक महत्त्वाचा साक्षीदार डाकू आहे असे न्यायालयातील एका व्यक्तीकडून अधिवक्त्याला सांगण्यात आले आहे. अधिवक्त्याने, खबर देणाऱ्याला प्रश्न विचारला असता, तो आपल्या कथनाबद्दल समाधानकारकपणे कारणे देतो. साक्षीदार स्वतः डाकू आहे किंवा कसे असे त्याला विचारण्यासाठी हे वाजवी आधारकारण आहे.

(ग) ज्या साक्षीदारासंबंधी कसलीच माहिती नाही त्याला तो स्वतः डाकू आहे किंवा कसे याबद्दल स्वैरपणे विचारण्यात आले. या प्रश्नामागे कोणतीही वाजवी आधारकारणे नाहीत.

(घ) ज्या साक्षीदारासंबंधी कसलीच माहिती नाही त्याच्या जीवनपद्धतीविषयी व उपजीविकेच्या साधनाविषयी प्रश्न विचारण्यात आल्यावर तो असमाधानकारक उत्तरे देतो. तो स्वतः डाकू आहे किंवा काय असे त्याला विचारण्यास हे वाजवी आधारकारण होऊ शकेल.

**१५३.** असा कोणताही प्रश्न वाजवी आधारकारणांशिवाय विचारण्यात आला असे न्यायालयाचे मत असेल तेव्हा, जर तो प्रश्न कोणत्याही अधिवक्त्याने विचारलेला असेल तर, ते न्यायालय असा अधिवक्ता त्याचा व्यवसाय चालवण्याच्या बाबतीत ते ज्याला अधीन असेल त्या उच्च न्यायालयाला किंवा अन्य प्राधिकरणाला त्या प्रकरणाची परिस्थिती प्रतिवेदित करू शकेल. **वाजवी आधारकारणांशिवाय प्रश्न विचारण्यात आला असता त्याबाबतीत न्यायालयाने अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**१५४.** जे कोणतेही प्रश्न किंवा ज्या चौकशी, न्यायालयाला असभ्य किंवा अपप्रवादात्मक वाटतात त्यांचा न्यायालयासमोर असलेल्या प्रश्नांशी संबंध असला तरी, ते प्रश्न किंवा त्या चौकशा, वादनिविष्ट तथ्यांशी किंवा वादनिविष्ट तथ्ये अस्तित्वात होती किंवा नव्हती हे ठरविण्यासाठी ज्या बाबी माहीत असणे आवश्यक आहे त्या बाबींशी संबंधित नसतील तर, न्यायालय त्यांना मनाई करू शकेल. **असभ्य व अपप्रवादात्मक प्रश्न.**

**१५५.** एखादा प्रश्न अपमान करण्याच्या किंवा त्रास देण्याच्या इराद्याने योजलेला आहे असे न्यायालयाला वाटले किंवा एखादा प्रश्न केवळ प्रश्न म्हणून योग्य असला तरी त्याचे स्वरूप अकारण क्षोभक आहे असे न्यायालयाला वाटले तर, न्यायालय त्याला मनाई करील. **अपमान करण्यासाठी किंवा त्रास देण्यासाठी योजिलेले प्रश्न.**

**१५६.** साक्षीदाराच्या चारित्र्याला धक्का पोहचवून त्याची विश्वासपात्रता डळमळीत करण्याकडे ज्या प्रश्नाचा रोख असेल तेथवरच केवळ जो चौकशीशी संबद्ध असेल असा कोणताही प्रश्न त्याला विचारण्यात आला असेल आणि त्याने त्याचे उत्तर दिलेले असेल तेव्हा, त्याच्या कथनांतील विरोध दाखवून देण्यासाठी कोणताही पुरावा देता येणार नाही; परंतु, जर त्याने खोटे उत्तर दिले तर, खोटा पुरावा दिल्याबद्दल नंतर त्याच्यावर दोषारोप ठेवता येईल. **सत्यवादित्वाची परीक्षा करणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरांना विरोध करणाऱ्या पुराव्याचे अपवर्जन.**

**अपवाद १. –** जर साक्षीदाराला, एखाद्या गुन्ह्याबद्दल त्याला पूर्वी दोषसिद्ध ठरविण्यात आले होते किंवा कसे असा प्रश्न विचारला आणि त्याने ते नाकबूल केले तर, त्याच्या पूर्व दोषसिद्धीचा पुरावा देता येईल.

**अपवाद २. –** जर साक्षीदाराला त्याच्या निःपक्षपातीपणाबद्दल शंका व्यक्त करू पाहणारा असा कोणताही प्रश्न विचारला असेल आणि सूचित केलेली तथ्ये नाकबूल करून त्याने त्याचे उत्तर दिले तर, त्याच्या कथनांतील विरोध दाखवून देता येईल.

**उदाहरणे.**

(क) हमीदाराविरुद्ध करण्यात आलेल्या मागणीला, तिच्यात कपट आहे या कारणावरून विरोध करण्यात आला आहे. "आधीच्या एका संव्यवहारात कपटपूर्ण मागणी केली नव्हती किंवा कसे?" असा प्रश्न मागणीदाराला विचारण्यात येतो. तो नाही म्हणतो. त्याने अशी मागणी केली होती हे दाखविण्यासाठी पुरावा पुढे करण्यात येतो. पुरावा अस्वीकार्य आहे.

(ख) "अप्रामाणिकपणाबद्दल तुला एका पदावरून काढून टाकण्यात आले नव्हते किंवा कसे?" असा प्रश्न साक्षीदाराला विचारण्यात येतो. तो नाही म्हणतो. अप्रामाणिकपणाबद्दल त्याला काढून टाकलेले होते हे दाखवून देण्यासाठी पुरावा पुढे करण्यात येतो. पुरावा स्वीकार्य नाही.

(ग) विवक्षित दिवशी आपण गोवा येथे 'ख' ला पाहिले होते असे 'क' दृढकथन करतो. "तू त्या दिवशी वाराणसी येथे नव्हतास काय?" असे 'क' ला विचारण्यात येते. तो नाही म्हणतो. 'क' त्या दिवशी वाराणसी येथे होता हे दाखवून देण्यासाठी पुरावा पुढे करण्यात येतो. ज्या तथ्यामुळे 'क' च्या विश्वास पात्रतेवर परिणाम होतो त्याबाबत त्याच्या कथनांतील विरोध दाखवणारा म्हणून नव्हे तर, विवादित दिवशी 'ख' गोव्यामध्ये दिसला होता या अभिकथित तथ्याला विरोध करणारा पुरावा म्हणून तो स्वीकार्य आहे. यांपैकी प्रत्येक प्रकरणांमध्ये, साक्षीदाराची नाकबुली खोटी असती तर, खोटा पुरावादिल्याबद्दल त्याच्यावर दोषारोप ठेवता आला असता.

(घ) 'क' ज्याच्याविरुद्ध साक्ष देत आहे त्याच्या कुटुंबाचे 'ख' च्या कुटुंबाशी हाडवैर नव्हते किंवा कसे असा त्याला प्रश्न विचारण्यात येतो. तो नाही म्हणतो. त्याच्या निःपक्षपातीपणाबद्दल संशय व्यक्त करण्याकडे त्या प्रश्नाचा रोख आहे या कारणावरून 'क' ला विरोध करता येईल.

**पक्षकाराने स्वतःच्या साक्षीदाराला प्रश्न करणे.**

**१५७.** (१) विरुद्ध पक्षकार उलटतपासणीमध्ये जे कोणतेही प्रश्न विचारू शकेल ते प्रश्न आपल्या साक्षीदाराला विचारण्यासाठी, साक्षीदाराला बोलावणाऱ्या व्यक्तीला न्यायालय, त्याच्या स्वेच्छाधिकारात, परवानगी देऊ शकेल.

(२) या कलमातील कोणतीही गोष्ट, पोट- कलम (१) अन्वये अशा प्रकारे परवानगी दिलेल्या व्यक्तीचा, असा साक्षीदाराच्या साक्षीच्या कोणत्याही भागावर विसंबून राहण्याचा हक्क काढून घेणार नाही.

**साक्षीदाराच्या विश्वास पात्रतेबाबत संशय व्यक्त करणे.**

**१५८.** साक्षीदाराच्या विश्वासपात्रतेबाबत, साक्षीदाराला बोलावणाऱ्या पक्षकाराला, न्यायालयाच्या संमतीने, अथवा विरुद्ध पक्षकाराला, पुढील प्रकारे संशय व्यक्त करता येईल.-

(क) साक्षीदाराबद्दल त्यांना असलेल्या माहितीवरून तो विश्वासाला अपात्र आहे असा आपला समज आहे अशी साक्ष देणाऱ्या व्यक्तींच्या साक्षीवरून;

(ख) स्वतःची साक्ष देण्याबद्दल साक्षीदाराला लाच देण्यात आलेली आहे किंवा लाच देऊ करण्याचा प्रस्ताव त्याने स्वीकारला आहे किंवा त्यासाठी अन्य कोणतेही भ्रष्टकारी प्रलोभन त्याला दाखवण्यात आले आहे हे शाबीत करून;

(ग) त्याच्या साक्षीचा जो कोणताही भाग विरोध केला जाण्यास पात्र असेल त्याच्याशी विसंगत अशी पूर्वीची कथने शाबीत करून.

**स्पष्टीकरण.-** जो साक्षीदार, दुसरा साक्षीदार विश्वासाला अपात्र असल्याचे सांगतो त्याने त्याच्या सरतपासणीच्या वेळी, त्याच्या समजुतीची कारणे दिली पाहिजेत असे नाही. परंतु, त्याला उलट तपासणीत त्याची कारणे विचारली जाऊ शकतील आणि तो जी उत्तरे देईल ती जर खोटी असतील तर, त्यामुळे नंतर त्याच्यावर खोटा पुरावा दिल्याचा दोषारोप ठेवता येत असला तरी, त्याने दिलेल्या उत्तरांना विरोध करता येणार नाहीत.

**उदाहरणे.**

(क) जो माल 'ख' ला विकून त्याच्याकडे पोचवण्यात आला त्याच्या किंमतीसाठी 'क' हा, 'ख' विरुद्ध दावा लावतो. आपण 'ख' कडे माल पोचवला असे 'ग' म्हणतो. आपण 'ख' कडे माल पोचवला नव्हता असे तो पूर्वी एका प्रसंगी म्हणाला होता हे दाखवून देण्यासाठी पुरावा पुढे करण्यात येतो. पुरावा स्वीकार्य आहे.

(ख) 'ख' चा खून केल्याचा 'क' वर आरोप आहे. 'क' ने आपणांस केलेल्या जखमेमुळे आपले मरण ओढावले असे 'ख' ने मृत्युसमयी कथन केले असे 'ग' म्हणतो. 'क' ने आपणांस केलेल्या जखमेमुळे आपले मरण ओढावले असे 'ख' ने मृत्युसमयी कथन केले नव्हते असे 'ग' पूर्वी एका प्रसंगी म्हणाला होता हे दाखवून देण्यासाठी पुरावा पुढे करण्यात येतो. पुरावा स्वीकार्य आहे.

**संबद्ध तथ्याला पुष्टी मिळण्याकडे रोख असलेले प्रश्न स्वीकार्य.**

**१५९.** एखाद्या साक्षीदाराने कोणत्याही तथ्याविषयी दिलेल्या साक्षीला परिपुष्टी मिळावी असा इरादा असेल तर, असे संबद्ध तथ्य घडले त्यावेळी किंवा त्या वेळेच्या आसपास अथवा त्या ठिकाणी किंवा त्याच्या आसपास जी अन्य कोणतीही परिस्थिती त्याला आढळली असेल ती शाबीत झाल्यास, साक्षीदार, ज्या संबद्ध तथ्याविषयी साक्ष देत आहे त्याबाबत साक्षीदाराने दिलेल्या साक्षीला ती परिपोषक होईल असे न्यायालयाचे मत असेल तर, साक्षीदाराला, अशा परिस्थितीबाबत प्रश्न विचारले जाऊ शकतील.

**उदाहरण.**

'क' हा सहअपराधी, ज्या जबरी चोरीत त्याने भाग घेतला तिचा वृत्तांत देतो. ज्या ठिकाणी ती घडली तेथे व तेथून तो जाण्याच्या मार्गावर असताना, जबरी चोरीशी संबंध नसलेल्या ज्या विविध घटना घडल्या त्यांचे तो वर्णन करतो. नुसत्या जबरी चोरीविषयीच्या त्याच्या साक्षीला परिपुष्टी देण्यासाठी त्या तथ्यांचा स्वतंत्र पुरावा देता येईल.

**१६०.** साक्षीदाराच्या साक्षीला परिपुष्टी देण्यासाठी अशा साक्षीदाराने, तथ्य घडून आले त्यावेळी किंवा त्या सुमारास अथवा तथ्याचे अन्वेषण करण्यासाठी विधितः सक्षम असलेल्या कोणत्याही प्राधिकरणासमोर त्याच तथ्यासंबंधी पूर्वी केलेले कोणतेही कथन शाबीत करता येईल.

**साक्षीदाराची आधीची कथने त्याच तथ्यासंबंधी त्याने नंतर दिलेल्या साक्षीला परिपुष्टी देण्यासाठी शाबित करता येतील.**

**१६१.** जेव्हा जेव्हा कलम २६ किंवा २७ खाली संबद्ध असे कोणतेही कथन शाबीत केले जाईल तेव्हा, ज्या व्यक्तीने ते कथन केले तिला साक्षीदार म्हणून बोलावले असते आणि सूचित तथ्यातील सत्य तिने उलट तपासणीच्या वेळी नाकबूल केले असते तर, ज्या बाबी शाबीत करता आल्या असत्या अशा सर्व बाबी त्या कथनास विरोध करण्यासाठी किंवा त्याला पुष्टी देण्यासाठी किंवा त्या व्यक्तीच्या विश्वास पात्रतेबाबत संशय व्यक्त करण्यासाठी किंवा त्याच्या विश्वास पात्रतेबद्दल खात्री करून घेण्यासाठी शाबीत करता येतील.

**कलम २६ किंवा २७ खाली संबध्द असलेल्या शाबित केलेल्या कथनांसंबंधी कोणत्या बाबी शाबीत करता येतील.**

**१६२.** (१) साक्षीदाराची तपासणी चालू असताना, त्याला ज्या घडामोडीबाबत प्रश्न विचारले जातील ती घडण्याच्या वेळी किंवा त्यानंतर, जोवर ती त्याच्या स्मरणात ताजी राहिली असण्याचा संभव आहे असे न्यायालयाला वाटते इतक्या अल्पावधीतच त्याने स्वतः लिहून ठेवलेले लिखाण पाहून तो आपल्या स्मृतीस उजाळा देऊ शकेल :

**स्मृतीला उजाळा देणे.**

परंतु, इतर कोणत्याही व्यक्तीने लिहिलेले व साक्षीदाराने पूर्वोक्त कालावधीत वाचलेले असे कोणतेही लिखाण, त्याने ते वाचले त्यावेळी ते बरोबर असल्याचे त्याला माहीत असल्यास ते देखील त्याला पाहता येईल.

(२) जेव्हा जेव्हा साक्षीदाराला कोणताही दस्तऐवज पाहून त्याच्या स्मृतीला उजाळा देता येईल तेव्हा, न्यायालयाच्या परवानगीने, त्याला अशा दस्तऐवजाची प्रत पाहता येईल :

परंतु, मूळलेख हजर न करण्यास पुरेसे कारण आहे याबाबत न्यायालयाचे समाधान झाले पाहिजेः परंतु आणखी असे की, व्यावसायिक विवेचकग्रंथ पाहून तज्ज्ञाला स्वतःच्या स्मृतीला उजाळा देता येईल.

**१६३.** कलम १६२ मध्ये उल्लेखिलेल्या अशा कोणत्याही दस्तऐवजात नमूद केलेली प्रत्यक्ष तथ्ये, साक्षीदाराला निश्चित आठवत नसली तरी, जर ती तथ्ये दस्तऐवजात अचूकपणे नमूद केलेली आहेत याबद्दल त्याची खात्री पटली असेल तर, त्या तथ्यांविषयी त्याला तोंडी साक्ष देता येईल.

**कलम १६२ मध्ये उल्लेख केलेल्या दस्तऐवजात नमूद केलेल्या तथ्यासंबंधी तोंडी साक्ष.**

**उदाहरण.**

एखाद्या लेखाकाराने व्यवहारक्रमानुसार नियमितपणे ठेवलेल्या चोपड्यांमध्ये नोंदी बरोबर लिहिल्या जात होत्या हे त्याला स्वतःला माहीत असेल तर, नोंद केलेले विशिष्ट संव्यवहार तो विसरला असला तरीही, त्याने त्या चोपड्यांमध्ये नमूद केलेल्या तथ्यांबद्दल त्याला तोंडी साक्ष देता येईल.

**स्मृतीला उजाळा देण्यासाठी वापरलेल्या लिखाणाबाबत विरुद्ध पक्षकाराचा हक्क.**

**१६४.** लगतपूर्वीच्या दोन कलमांच्या तरतुदींन्वये पाहिलेले कोणतेही लिखाण हजर करण्यात येईल आणि विरुद्ध पक्षकाराने ते मागितल्यास त्याला ते दाखवण्यात येईल; असा पक्षकार, जर त्याला वाटले तर, त्यावरून साक्षीदारांची उलटतपासणी घेऊ शकेल.

**दस्तऐवज हजर करणे.**

**१६५.** (१) दस्तऐवज हजर करण्यासाठी समन्स पाठवण्यात आलेल्या साक्षीदाराला, जर तो दस्तऐवज त्याच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असेल तर, तो हजर करण्यास किंवा त्याच्या स्वीकार्यतेला कोणताही आक्षेप असला तरीही, तो न्यायालयात आणावा लागेल :

परंतु, अशा कोणत्याही आक्षेपाच्या विधिग्राह्यतेबाबत न्यायालय निर्णय करील.

(२) त्या दस्तऐवजात राज्यविषयक बाबीचा निर्देश नसेल तर, न्यायालय, त्याला योग्य वाटल्यास, त्याचे निरीक्षण करू शकेल, किंवा त्याच्या स्वीकार्यतेसंबंधी निर्णय करणे त्यास शक्य व्हावे यासाठी अन्य पुरावा घेऊ शकेल.

(३) अशा प्रयोजनाकरिता, कोणत्याही दस्तऐवजाचा अनुवाद करून घेणे आवश्यक असेल तर, न्यायालय, जर दस्तऐवज पुराव्यात द्यावयाचा नसेल तर त्याला योग्य वाटल्यास, त्यातील मजकूर गुप्त ठेवण्याबद्दल अनुवादकाला निदेश देऊ शकेल, आणि जर अनुवादकाने अशा निदेशाची अवज्ञा केली तर, त्याने भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम १९८ खाली अपराध केला असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, न्यायालय, मंत्री व भारताचे राष्ट्रपती यांच्यामधील कोणताही पत्रव्यवहार त्याच्यासमोर हजर करण्यास भाग पाडणार नाही.

**नोटिशीवरून मागविलेला आणि सादर केलेला दस्तऐवज पुरावा म्हणून देणे.**

**१६६.** जो दस्तऐवज हजर करण्यासाठी एखाद्या पक्षकाराने दुसऱ्या पक्षकाराला नोटीस दिलेली असेल तो दस्तऐवज, जेव्हा तो मागवतो, आणि असा दस्तऐवज सादर करण्यात येतो आणि तो सादर करण्याची मागणी करणारा पक्षकार त्याचे निरीक्षण करतो तेव्हा, तो सादर करणाऱ्या पक्षकाराने त्याच्याकडे तशी मागणी केल्यास, तो दस्तऐवज पुरावा म्हणून देण्यास दुसरा पक्षकार बांधील असतो.

**नोटीशीवरून जो दस्तऐवज हजर करण्यास नकार देण्यात आला होता तो दस्तऐवज पुरावा म्हणून वापरणे.**

**१६७.** जो दस्तऐवज हजर करण्याबद्दल एखाद्या पक्षकाराला नोटीस मिळालेली असेल, तो दस्तऐवज हजर करण्यास तो नकार देतो तेव्हा, नंतर तो, दुसऱ्या पक्षकाराच्या संमतीशिवाय किंवा न्यायालयाच्या आदेशाशिवाय, तो दस्तऐवज पुरावा म्हणून वापरू शकत नाही.

**उदाहरण.**

'क' एका करारावरून 'ख' विरुद्ध दावा लावतो आणि तो हजर करण्यासाठी 'ख' ला नोटीस देतो. न्यायचौकशीच्या वेळी, 'क' दस्तऐवजाची मागणी करतो आणि तो हजर करण्यास 'ख' नकार देतो. 'क' त्यातील मजकुराचा दुय्यम पुरावा देतो. 'क' ने दिलेल्या दुय्यम पुराव्याला विरोध करण्यासाठी किंवा करारावर मुद्रांक नाही हे दाखविण्यासाठी 'ख' तो दस्तऐवज हजर करू पाहतो. तो तसे करू शकणार नाही.

**१६८.** न्यायाधीश, संबद्ध तथ्ये शोधून काढण्याच्या किंवा त्यांचा योग्य पुरावा मिळण्याच्या दृष्टीने कोणत्याही साक्षीदाराला किंवा पक्षकारांना कोणत्याही तथ्याविषयी, त्याला आवश्यक वाटेल असा कोणताही प्रश्न, कोणत्याही स्वरूपात, कोणत्याही वेळी विचारू शकेल; आणि कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्याचा आदेश देऊ शकेल; आणि पक्षकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांपैकी कोणीही, अशा कोणत्याही प्रश्नाला किंवा आदेशाला आक्षेप घेण्यास अथवा अशा कोणत्याही प्रश्नाच्या उत्तरात दिलेल्या कोणत्याही उत्तरावर न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही साक्षीदाराची उलट तपासणी करण्यास हक्कदार असणार नाहीत : **प्रश्न विचारण्याचा किंवा दस्तऐवज हजर करण्याचा आदेश देण्याचा न्यायाधीशाचा अधिकार.**

परंतु, न्यायनिर्णय या अधिनियमाद्वारे संबद्ध म्हणून घोषित केलेल्या आणि रीतसर शाबीत केलेल्या तथ्यांवर आधारलेला असला पाहिजे :

परंतु आणखी असे की, ज्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास, अथवा जो कोणताही दस्तऐवज हजर करण्यास नकार देण्यास एखादा साक्षीदार कलमे १२७ ते १३७ (दोन्ही धरून) या अन्वये हक्कदार होऊ शकेल तो प्रश्न, जर विरुद्ध पक्षकाराने विचारला असेल तर किंवा तो दस्तऐवज विरुद्ध पक्षकाराने मागितला असेल तर, त्या प्रश्नाचे उत्तर देण्याची किंवा तो दस्तऐवज हजर करण्याची साक्षीदारावर सक्ती करण्यास कोणताही न्यायाधीश या कलमामुळे प्राधिकृत होणार नाही; तसेच अन्य कोणत्याही व्यक्तीने कलम १५१ किंवा १५२ अन्वये जो प्रश्न विचारणे अनुचित होईल असा कोणताही प्रश्न, न्यायाधीश विचारणार नाही; त्याचप्रमाणे, यात यापूर्वी अपवाद केलेल्या प्रकरणांखेरीज, कोणत्याही दस्तऐवजाचा अव्वल पुरावा हजर करण्याबाबत तो माफ करणार नाही.

प्रकरण अकरा

## पुराव्याची अयोग्य स्वीकृती व अस्वीकृती

**१६९.** पुराव्याची अयोग्य स्वीकृती किंवा अस्वीकृती हे, जर असा आक्षेप ज्या न्यायालयापुढे घेण्यात आला असेल त्या न्यायालयाला असे वाटेल की, आक्षेप घेतलेला व स्वीकृत केलेल्या पुराव्यावर विसंबून न राहता, त्या निर्णयाचे समर्थन करण्याइतपत पुरेसा स्वतंत्र पुरावा होता, अथवा अस्वीकृत केलेला पुरावा स्वीकारण्यात आला असता तरी, त्यामुळे निर्णय बदलणे भाग पडले नसते तर, कोणत्याही प्रकरणी नवीन न्यायचौकशी करण्याचे किंवा कोणताही निर्णय फिरवण्याचे कारण होणार नाही. **पुराव्याच्या अयोग्य स्वीकृतीबद्दल किंवा अस्वीकृतीबद्दल नवीन न्यायचौकशी न करणे.**

प्रकरण बारा

## निरसन व व्यावृत्ती

**१७०.** (१) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १), याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. **निरसन व व्यावृत्ती.**

(२) असे निरसन झाले असले तरी, ज्या दिनांकास हा अधिनियम अंमलात येत आहे त्या दिनांकाच्या लगतपूर्वी, जर कोणताही अर्ज, न्यायचौकशी, चौकशी, अन्वेषण, कार्यवाही किंवा अपील प्रलंबित असेल तर, असा अर्ज न्यायचौकशी, चौकशी, अन्वेषण, कार्यवाही किंवा अपील या संबंधात, जणू काही हा अधिनियम अंमलात आलेला नव्हता असे समजून, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १)याच्या तरतुदींन्वये कार्यवाही करण्यात येईल.

## अनुसूची

[कलम ६४ (४) (ग)]

### प्रमाणपत्र

भाग अ

(पक्षकाराने भरावयाचे)

मी,----------------------------(नाव),----------------------------चा मुलगा / ची मुलगी /ची पत्नी / चा पती, ------------------------------------------------------------------------------ येथे रहात असून/नोकरी करीत असून, याद्वारे, पुढीलप्रमाणे, गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो/ करते आणि प्रामाणिकपणे कथन व सादर करतो/ करते की :

मी, पुढील साधनामधून/ डिजिटल अभिलेख स्त्रोतामधून घेतलेला इलेक्ट्रॉनिक अभिलेख/ डिजिटल अभिलेखाचा आउटपुट सादर केलेला आहे. (खूण करा) :–

संगणक/साठवण माध्यम ☐ डीव्हीआर ☐ भ्रमणध्वनी ☐ फ्लॅश ड्राईव्ह ☐

सीडी/डीव्हीडी ☐

सर्व्हर ☐ क्लाऊड ☐ इतर ☐.

इतर :-----------------------------------------------

बनावट व मॉडेल :------------ रंग :------------

अनुक्रमांक :------------------------

आयएमइआय/युआयएन/युआयडी/एमएससी/क्लाऊड आयडीः--------------------------------- (लागू असेल त्याप्रमाणे)

आणि साधनाच्या/ डिजिटल अभिलेखाच्या बद्दल असलेली अन्य कोणतीही संबध्द माहिती, कोणतीही असल्यासः---------------------(विनिर्दिष्ट करा).

डिजिटल साधन किंवा डिजिटल अभिलेख स्त्रोत, नियमितपणे माहिती तयार करण्यासाठी, साठविण्यासाठी किंवा प्रक्रिया करण्यासाठी कायदेशीर नियंत्रणाखाली होते आणि या कालावधीत, संगणक किंवा संसूचन उपकरण योग्यरीत्या काम करीत होते आणि संबंधित माहिती, कामकाजाच्या सामान्य क्रमात संगणकामध्ये नियमितपणे अंतर्भूत केली जात होती. जर कोणत्याही विशिष्ट वेळी, संगणक/डिजिटल साधन योग्यरीत्या काम करीत नसेल किंवा कार्य करत नसेल तर, त्याचा इलेक्ट्रॉनिक/डिजिटल अभिलेखावर किंवा त्याच्या अचूकतेवर परिणाम झालेला नाही. डिजिटल साधन किंवा डिजिटल अभिलेखाचा स्त्रोत पुढीलप्रमाणे आहे :-

स्वतः च्या मालकीचा ☐ परिरक्षित ☐ व्यवस्थापित ☐ कार्यान्वित ☐

माझ्याकडून (लागू असेल त्याप्रमाणे निवड करा).

मी असे कथन करतो/ करते की, पुढील अल्गोरिदममार्फत मिळविलेले, इलेक्ट्रॉनिक/डिजिटल अभिलेखाचे/ अभिलेखांची एचएएसएच मूल्य/ मूल्ये,---------------- इतके आहे/आहेत :–

☐ एसएचए १ः

☐ एसएचए २५६ः

☐ एमडी ५ः

☐ इतरः---------(कायदेशीरदृष्ट्या स्वीकारण्यायोग्य मानक).

(एचएएसएचचा अहवाल प्रमाणपत्रासोबत जोडावयाचा आहे).

(नाव व स्वाक्षरी)

दिनांक (तारीख/ महिना/ वर्ष):---------------------

वेळः (आयएसटी):--------- तास (२४ तासांच्या स्वरूपात).

ठिकाणः ---------------------

**भाग ब**

(तज्ज्ञाने भरावयाचे)

मी,----------------------------(नाव),----------------------------चा मुलगा / ची मुलगी /ची पत्नी / चा पती, -------------------------------------------------------------------------------- येथे रहात असून/नोकरी करीत असून, याद्वारे, पुढीलप्रमाणे, गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो/ करते आणि प्रामाणिकपणे कथन व सादर करतो/ करते कीः-

सादर केलेला इलेक्ट्रॉनिक अभिलेख/ डिजिटल अभिलेखाचा आउटपुट, पुढील साधनामधून/ डिजिटल अभिलेख स्त्रोतामधून मिळविलेला आहे. (खूण करा) :–

संगणक/साठवण माध्यम ☐ डीव्हीआर ☐ भ्रमणध्वनी ☐ फ्लॅश ड्राईव्ह ☐ सीडी/डीव्हीडी ☐ सर्व्हर ☐ क्लाऊड ☐ इतर ☐.

इतर :---------------------------------------------------

बनावट व मॉडेल :------------ रंग :------------

अनुक्रमांक :------------------------

आयएमइआय/युआयएन/युआयडी/एमएससी/क्लाऊड आयडी :-------------------------------- (लागू असेल त्याप्रमाणे)

आणि साधनाच्या/ डिजिटल अभिलेखाच्या बद्दल असलेली अन्य कोणतीही संबध्द माहिती, कोणतीही असल्यास :---------------------(विनिर्दिष्ट करा).

मी असे कथन करतो/ करते की, पुढील अल्गोरिदममार्फत मिळविलेले, इलेक्ट्रॉनिक/डिजिटल अभिलेखाचे/ अभिलेखांची एचएएसएच मूल्य/ मूल्ये,---------------- इतके आहे/आहेत :–

☐ एसएचए १:

☐ एसएचए २५६:

☐ एमडी ५:

☐ इतरः---------(कायदेशीरदृष्ट्या स्वीकारण्यायोग्य मानक).

(एचएएसएचचा अहवाल, प्रमाणपत्रासोबत जोडावयाचा आहे).

(नाव, पदनाम व स्वाक्षरी)

दिनांक (तारीख/ महिना/ वर्ष):---------------------

वेळ (आयएसटी):--------- तास (२४ तासांच्या स्वरूपात).

ठिकाण : ---------------------

**डॉ. राजीव मणि,**
सचिव,
भारत सरकार.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.